

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.

# तुकारामबोवा.





वा० अ० भिडे.

REFBK-0001517

किंमत ८ आणे

सं. पि. ७८

स्वागत
म. सं. सं. आधे.

REFBK-0001517

९५९६

श्रीसरस्वतीमंदिर

मासिकपुस्तकांत छापलेलें प्रकरण.

# तुकारामबोवा.

( वृत्त व ग्रंथ. )

हें पुस्तक

## रा. बाळकृष्ण अनंत भिडे, बी. ए.,

यांनीं लिहिलें,

तें,

**महादेव केशव काळे, यांनीं**

मुंबईंत ' तत्त्वविवेचक ' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

---

भाद्रपद, शके १८३०.

---

**किंमत ८ आणे.**

# विषयानुक्रमणिका.


| विषय. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १. | विषयप्रवेश.... .... .... .... .... | १ |
| २. | मूळपीठिका, जन्म. .... .... .... .... | ७ |
| ३. | संसाराचा गुंता, दुर्धर प्रसंग.... .... .... | १८ |
| ४. | संक्रमण. .... .... .... .... .... | ३२ |
| ५. | पूर्णावस्था, कवित्वस्फूर्ति, व गुरूपदेश. .... | ५४ |
| ६. | कठिण कसोटी. .... .... .... .... | ७२ |
| ७. | अंतर्धान. .... .... .... .... .... | ९६ |
| ८. | कवित्व, रचनाविशेष, सामाजिक व धार्मिक मतें. | १११ |

नाहीं. प्रपंच व परमार्थ यांची उत्तम सांजेशी सांगड घाल-णाऱ्यांपैकीं ते होते. त्यांनीं जसा परमार्थ आपलासा केला होता, तसा प्रपंचही चांगला थाटला होता. त्यांचे पूर्वज उदीमव्यापार करीत असत व यांनींही तोच व्यवसाय पुढें चालू ठेविला. बोल्होबांनीं सचोटीनें, नेकीनें व टापटिपीनें वागून, आपला धंदा चांगलाच रंगारूपास आणिला. त्यांचें देहू येथील दुकान उत्तम भरभराटीस आलें होतें व चारचौघांत त्यांची फार पत होती. व्याप पुष्कळ वाढला, संपत्ति बरीच जमली, लोकांत बोलबलायही चांगली झाली ; तरी पण, बोल्होबा आत्मभान विसरण्याइतके त्या गुंत्यांत गुरफटले गेले नाहींत किंवा त्यांच्या आचरणाचें पावित्र्य रेंसमात्र ढळलें नाहीं. कणकाई ही सुद्धां त्यांना विचारानें व आचारानें साजेशीच गृहिणी होती. तेव्हां अशा मातापितरांच्या पोटीं आल्यामुळें आनुवंशिक संस्कारानें व गुरुजनांच्या प्रत्यक्ष आचरणानें तुकारामबोवांच्या अंतःकरणांत जें संस्कारबीज पेरलें गेलें, तेंच पुढें प्रौढपणीं परिस्थितिप्रभावानें व्यक्तरूपास येऊन तुकारामबोवा हे जगद्वंद्य विभूति झाले, असें अनुमान करण्यास कांहींएक हरकत नाहीं.

तुकारामबोवांचा जन्मशक कोणता या संबंधानें बराच घोंटाळा आहे. 'हिंदुस्तानकथारस' या ग्रंथाच्या कर्त्यांनीं शा. शक १५१० म्हणजे इ. स. १५८८ हा तुकारामबोवांचा जन्मशक दिला आहे. परंतु यास त्यांनीं कोणताही आधार दिलेला नाहीं. निरंजनबोवा, महीपति, किंवा रामदासस्वामींची बखर लिहिणारे हनुमंतस्वामी, यांनीं तुकारामबोवांच्या जन्म-

शकाचा उल्लेख केलेला नाहीं. परंतु महीपतिबोवांनीं भक्तविजयांत—

> " एकविसाव्यांत विपरीत काळ।
> तुकयासी पातला तत्काळ।"

व

> ' पूर्वार्ध संपलें ऐशा रीती।
> दुःखें देखिलीं नानारीतीं।'

असा उल्लेख केला आहे. त्यावरून तुकारामबोवांचें निम्मे वय संपलें, तेव्हां ते एकवीस वर्षांचे होते, म्हणून त्यांचें मरणसमयीं वय बेचाळीस वर्षांचें असलें पाहिजे असें अनुमान काढण्यांत आलें. बोवांचा मृत्युशक शा. श. १५७१ हा सिद्ध आहे. तेव्हां शा. श. १५३० चे सुमारास त्यांचें जन्म झालें, असें चरित्रकारांनीं ठरविलें व तोच शक आज बरींच वर्षें सर्वमान्य होता.

परंतु रा. वि० का० राजवाडे यांनीं या गोष्टीचा उत्तम शहानिशा करून शा. श. १४९० हा तुकारामबोवांचा जन्मशक होय असें सिद्ध केलें आहे. यास प्रमाणें अशीं आहेत:—

(१) तुकारामबोवांना गुरूपदेश कधीं झाला याविषयीं महीपति ताऱ्हाबादकरांचा एक अभंग प्रसिद्ध आहे. तो असा:—

> बाबाजी चैतन्य योगीराज धन्य।
> तुकयालागून प्रकटले.॥ १॥
> शालिवाहन शके चौदाशें *त्र्याणव।
> प्रजापति नाम संवत्सरीं॥ २॥

---

*' केशवचैतन्यकथातरु ' या ग्रंथांत निरंजनबोवांनीं केशवचैतन्य ऊर्फ बाबाचैतन्य यांच्या समाधिशकाचा उल्लेख असा केला आहे:— "शके तेराशें त्र्याणव,। प्रजापति संवत्सराचें नांव,। वैशाख-

वैशाख वद्य द्वादशीचे दिनीं ।
समाधि स्वामींनीं घेतलीसे. ॥ ३ ॥
तेथुन *तीस वर्षी भेटी तुकयासी ।
देऊनी तयासी पूर्णपण. ॥ ५ ॥

---

वद्य द्वादशी पर्व, । गुरुवासर ते दिनीं. ॥ ( ४।१२१ ). यांतील मास व तिथि हीं महीपतीनें दिलेल्या मासतिथींशीं जुळतीं आहेत. परंतु शकामध्यें बरोबर एका शतकाचा फरक आहे. तथापि शके १२९३ त प्रजापति संवत्सर येत नसल्यामुळें व शके १४९३ त तो येत असल्यामुळें निरंजनबोवांच्या शक चुकीचा व टाकाऊ ठरतो, हें उघड आहे. तसेंच, केशवचैतन्यचरित्रांत अहमदनगरचा निजामशहा याचा उल्लेख आलेला आहे. राघवचैतन्य व केशवचैतन्य हे कल्बुर्ग्यास गेले असतां त्यांचा सिद्धिप्रताप निजामशहाच्या प्रत्ययास आला, अशी हकीकत आढळते. अहमदनगरच्या निजामशहाच्या कबजांतून कल्बुर्गा शके १४८५ च्या सुमारास विजापूरच्या अदिलशहाच्या हातीं गेला. तेव्हां शा. शकाच्या पंधराव्या शकाच्या उत्तरार्धांत केशवचैतन्य हयात होते, हें सिद्ध आहे. म्हणून निरंजनबोवांनीं दिलेला शक खोटा ठरून, महीपतिबावांचा शक उघड खरा होतो.

* निरंजनबोवांनीं तुकारामबोवांच्या उपदेशकालाचा असा उल्लेख केला आहे:– 'केशवचैतन्याची समाधी । झालियावरी शतावे अब्दीं । तुकारामाचें ज्ञान समृद्धि । प्रत्यक्ष येऊन पैं केली.' ॥ ( ६।१०९ ). वरील टीपेंत केशवचैतन्याच्या समाधिशक १४९३ आहे, तेव्हां तेथून बरोबर शंभराव्या वर्षी तुकारामबोवांना उपदेश झाला असें म्हटलें, तर उपदेशशक १५९३ हा येतो. परंतु तुकारामबोवांचा निर्याणकाल शक १५७१ हा सिद्ध असल्यामुळें शक १५९३ हा उपदेशकाल ठरणें वस्तुगत्याच अशक्य आहे. तेव्हां, तुकारामबोवांचा उपदेशकाल व चैतन्यांच्या समाधिकाल, यांतील अंतरही निरंजनबुवांनीं चुकीनेंच दिलें आहे. पहिल्या चुकीमुळें दुसरी चुकी घडून आली असेंही म्हणतां येत नाहीं. कारण, जर वादविवादार्थ घटकाभर केशवचैतन्यांचा

महीपति म्हणे, जाले समाधिस्थ, ॥
तुकयास क्रीडत ब्रह्मानंदें. ॥

या अभंगावरून तुकारामबोवांना शके १५२३चे सुमारास दृष्टांत होऊन गुरूपदेश झाला हें उघड आहे. तुकारामबोवांनीं आपल्याला गुरूपदेश कोणत्या दिवशीं व कोणत्या तिथीला झाला, हें पुढील अभंगांत सांगितलें आहे.—

सद्गुरुरायें कृपा मज केली, ।
परी नाहीं घडली सेवा कांहीं. ॥ १ ॥

राघवचैतन्य, केशवचैतन्य, ।
सांगितली खूण मालिकेची. ॥ ६ ॥

बाबाजी आपलें सांगितलें नाम, ।
मंत्र दिला 'राम, कृष्ण, हरी.' ॥ ७ ॥

माघ, शुद्ध दशमी, पाहुनी गुरुवार, ।
केला अंगीकार, तुका म्हणे. ॥ ८ ॥

---

समाधिशक १३९३ व तुकारामबोवांचा उपदेशकाल शके १४९३ धरला, तर एक नवीनच असंबद्धता उद्भवते. तुकारामबोवांना संसाराचा वीट एकविसाव्या वर्षी आला व त्यानंतर कांहीं वर्षांनीं त्यांना स्वप्नांत गुरूपदेश झाला. तेव्हां उपदेशकालीं तुकारामबोवा अदमासें २६—२८ वर्षांचे असावेत. पण त्यांचा निर्याणशक १५७१ हा कायम आहे, तेव्हां तुकारामबोवा निर्याणकालीं निदान १०४—१०६ वर्षांचे होते, असें फलित होऊं पहातें. परंतु त्यांचें वय इतक्या अपवादक रीतीनें लांबलें होतें, असें मानण्याला कांहींएक प्रमाण नाहीं. एकंदरींत 'केशवचैतन्यकथातरूंतील चैतन्यसमाधिकाल व तुकारामबोवांचा उपदेसकाल हे दोन्ही चूक व असंबद्ध आहेत.

आतां शके १५२० विलंबसंवत्सरांत माघ शुद्ध दशमी गुरुवारीं येते; पण शके १५२१, १५२२, १५२३ या संवत्सरांत ती गुरुवारीं येत नाहीं. तेव्हां तुकारामबोवांचा उपदेशकाल शके १५२२ च्या सुमारास म्हणजे शके १५२० विलंबसंवत्सरीं माघ शु. १०, गुरुवार, हा खास ठरतो. आतां तुकारामबोवांना एकविसाव्या वर्षी पूर्ण उपरति होऊन ते खरोखर विरागी झाले, व त्यानंतर कांहीं वर्षांनीं त्यांना गुरुप्रसाद लाभला. तेव्हां उपदेशकालीं त्यांचें वय २९–३०चे सुमारास असावें हें उघड आहे. यावरून तुकारामबोवांचा जन्म शा. श. १४९०-१४९१ चे सुमारास झाला असावा असें ठरतें.

( २ ) रा. वि. का. राजवाडे यांस पंढरींतील तुकारामबोवांच्या वंशाचें शिष्यत्व पतकरणाऱ्या एका वारकऱ्याजवळ एक तुकारामबोवांची वंशावळ सांपडली, तींत तुकारामबोवांचा जन्म शा. श. १४९० त झाला असें स्पष्ट लिहिलें आहे.

तुकारामबोवांचा जन्म शके १४९० धरिला, म्हणजे निर्याणकालीं ( शा. श. १५७१ त ) ते ८१ वर्षांचे होते असें ठरतें; व त्याचा

‘ जराकर्णमूळीं सांगों आली गोष्टी, ।
मृत्यूचिये भेटी जवळ आली ’ ।

व

‘ बहुकाळ माझा केलासे सांभाळ ’ ।
पांडुरंगें मूळ पाठविलें ॥

अशा प्रकारच्या तुकारामबोवांच्या *उक्तींशीं चांगला जम

---

*बोवांनीं छत्रपतींस पाठविलेल्या पत्रांतही,
‘ घेऊनियां भेटी, कोण हा संतोष ? । आयुष्याचे दीस गेले गेले. ॥
एक दोन्ही कर्में जाणोनियां वर्मे । आपुलिया श्रमें राहूं आतां ॥ ’
असे उद्गार काढून आपला वृद्धापकाळ सूचित केला आहे.

बसतो. 'तुकारामबोवांना एकविसाव्या वर्षीं विपरीत काळ येऊन, त्यांच्या आयुष्याचें पूर्वार्ध संपलें,' हें भक्तविजयांतील महीपतिबोवांचें वचन संदिग्ध आहे, व त्यावरून निर्याणसमयीं तुकारामबोवा ४२ वर्षांचे होते, असें अनुमान काढणें निर्धास्त नव्हतें, हें उघड आहे. परंतु या अनुमानाला विघातक असें स्वतंत्र, निःसंदेह व विश्वासार्ह प्रमाण जोंपर्यंत उपलब्ध नव्हतें, तोंपर्यंत तें प्रमाण सामान्यतः ग्राह्य होणें, हें साहजिक होतें. पण महीपतीच्या अभंगानें व त्या अभंगाला रा. राजवाड्यांजवळील वंशावळीची पुस्ती मिळाल्यानें, आणि या दोहोंचा तुकारामबोवांच्या स्वतःच्या उक्तींशीं बरोबर जम बसल्यानें, वरील अनुमानाचा पूर्ण निरास होतो, व याउपर त्या अनुमानाला चिकटून राहणें दुराग्रहद्योतक होईल असें आमच्या बुद्धीस वाटतें.

## ३. संसाराचा गुंता, दुर्धर प्रसंग.

( शा. स. १४९०–१५११. )

संसारें जालों अतिदुःखें दुःखी, ।
मायबाप सेखीं क्रमलिया. ॥
दुष्काळें आटिलें द्रव्य, नेला मान, ।
स्त्री एकी 'अन्न अन्न' करितां मेली. ॥
लज्जा वाटे जीवा, त्रासलों या दुःखें, ।
वेवसाय देखें तुटी येतां. ॥

तुकारामबोवांना बाळपणीं कोणत्या तऱ्हेचें शिक्षण मिळालें होतें याची माहिती जरी कोठें आढळत नाहीं, तरी त्या संबंधानें कांहीं ठोकळ अनुमानें करण्यास पुष्कळ जागा आहे. बोवांचीं माता-

पितरें फार भाविक होतीं व भागवतधर्मास अनुसरून तीं परमार्थसाधन करीत असत. तेव्हां भगवद्भक्तीचें बाळकडूच तुकारामबोवांना मिळालें होतें, हें उघड आहे. साधुसंतांची सेवा करण्याची गोडी त्यांना लहानपणापासूनच लागलेली होती. ते जातीनें शूद्र असल्यामुळें त्यांचें वाङ्मयात्मक शिक्षण फारच कोतें असणार, हें साहजिकच आहे. वेदशास्त्राचा अभ्यास तर त्यांना घडणें अशक्यच होतें. पण या गोष्टीचें तुकारामबोवांना एक प्रकारें समाधानच वाटत होतें. ज्ञानेश्वरांच्या काळापासून तों अगदीं मोरोपंतमहीपतींच्या काळापर्यंत, वेदशास्त्रप्रवीण, कर्मठ, कठोर बुद्धीचे, शब्दच्छळ करणारे, आत्म्याच्या उन्नतीपेक्षां बाह्य कसरतीलाच जास्त किंमत देणारे, अहंमन्यतेनें ताठलेले, असे ब्राह्मण व बाह्योपाधींना विसरून ईशभक्तीच्या रंगांत एकतानतेनें रंगून जाणारे भागवत साधुसंत, या दोघांमध्यें सारखा झगडा चाललेला महाराष्ट्र वाङ्मयांत दृष्टीस पडतो. पण या झगड्यांत अजूनपर्यंत अमुक एक पक्षाचा म्हणजे खास जय झाला आहे, असें सांगणें अशक्य आहे.

व्यक्तिविशेषासंबंधानें पाहतां कर्मठ वैदिकपंडितांचे छळ सहन करून अखेर त्यांना संतजनांनीं आपल्या सत्त्वस्थ वृत्तीनें व भक्तीच्या जोरावर शरण आणिलें आहे. वेदशास्त्राच्या शाब्दिक ज्ञानानें अहंमन्य झालेले व जिव्हाळ्याचा पाझर नसतां केवळ बाह्य कसरतींत गुंतलेले, असे जे कर्मठ, त्यांची या साधुसंतांनीं तिळमात्र पर्वा केली नाहीं, असें वारंवार आढळतें.

'शब्दज्ञानी येऊं नेदीं दृष्टीपुढें, ।
छळवादी कुढे अभक्त ते, ॥ १

जळो ते जाणीव, जळो त्यांचे दंड, ।
जळो त्यांचें तोंड दुर्जनांचें. ॥ २
तुका म्हणे, येती दाटूनी छळाया, ।
त्यांच्या बोडूं डोया, न धरूं भीड.' ॥ ३

अशा तऱ्हेचे बेपर्वाईचे ठांसून काढलेले उद्गार सर्व संतांच्या कवितांत आढळतात. तेव्हां अशा अहंकाराचा आविर्भाव करणारें व वरपांगीं नसत्या भेदभावाच्या भरीस पाडणारें वेद-शास्त्राध्ययनाचें लटांबर आपल्या शूद्रत्वामुळें आपल्या पाठीशीं लागलें नाहीं, म्हणून तुकारामबोवांनीं—

'बरा कुणबी केलों, । नाहीं तरी दंभें असतों मेलों. ॥ १
भलें केलें, देवराया ! । नाचे तुका, लागे पायां. ॥ २
विद्या असती कांहीं, । तरी पडतों अपायीं. ॥ ३
सेवा चुकतों संतांची, । नागवण हे फुकाची. ॥ ४
गर्व होतां ताठा, । जातों यमपंथें वाटा. ॥ ५
तुका म्हणे, थोरपणें । नरक होती अभिमानें. ॥ ६

अशा प्रकारें औपरोधिक, पण एका प्रकारें समाधानाचे, उद्गार काढले, तर त्यांत आश्चर्य मानण्यासारखें कांहींच नाहीं.

वर सांगितलेंच आहे कीं, अशा प्रकारें कर्मकांडांत मोठ्या अभिमानानें पडलेल्या दुराग्रही शब्दज्ञान्यांचा व भक्तिभावापुढें सर्व बाह्य भेदांना तुच्छ मानणाऱ्या साधुसंतांचा अनेक शतकेंपर्यंत जोरानें कलह चालू आहे, तरी त्याचा स्पष्ट निकाल अजूनपर्यंत लागलेला नाहीं. वेळोवेळीं अशा कर्मठांना संतांनीं वठणीस आणलेलें आहे; तरी पण कर्मठपणाच्या बाण्यांतही एक प्रकारचें असें कांहीं विलक्षण तेज आहे कीं, त्याचा ठसा सामान्य समाजावरून साफ असा कधींच नाहींसा झालेला दिसत नाहीं. इतकेंच नव्हे,

द्वा. क्र. ............


तर, त्याचो प्रभाव शास्त्रांकित संतश्रेष्ठांच्या शिष्यमंडळ्यांतही त्यांच्या मागें घुसलेला व कमीअधिक अशानें अनर्थावहही झालेला आढळांत येतो. अस्तु.

तुकारामबोवांना वस्तुस्थित्याच जरी वेदशास्त्राध्ययन अशक्य होतें व दांभिक वेदांत्यांचा आणि शब्दज्ञान्यांचा अभिमान त्यांना गर्ह्य वाटत होता, तरी खरे शास्त्रज्ञ व वेदज्ञ यांस मान दिला पाहिजे व वेदशास्त्रांनीं केलेले विधिनिषेध हे पाळलेच पाहिजेत, असें त्यांनीं मोठ्या एकनिष्ठभावानें सांगितलें आहे:—

‘ वेदशास्त्र नाहीं पुराणप्रमाण, ।
तयाचें वदन नावलोका. ।। १
तार्कियाचें अंग आपणा पारिखे, ।
माजिऱ्या सारिखें वाईचाळे. ।। २
माता निंदी तया कोण तो आधार ? ।
भंगलें खापर याचे नांवें. ।। ३
तुका म्हणे, आड–रानें ज्याची चाली, ।
तयाची ते बोली झिंडवीण.’ ।। ४

एकंदरींत वेदशास्त्रपुराणांनीं घालून दिलेलें शासन योग्य रीतीनें पाळिलें पाहिजे, पण दंभ, ताठा, कपट, दुराग्रह, निव्वळ शब्दज्ञान व केवळ बाह्याकाराचे भेदभाव नकोत, अशा प्रकारचे संस्कार उत्पन्न करणारें नैतिक गृहशिक्षण तुकारामबोवांना प्रत्यक्ष उदाहरणांवरून लाभलें होतें. वामनस्वामींसारखे विद्यासंपन्न ब्राह्मण तुकारामबोवांजवळ उपदेशार्थ आले असतां, ‘ आपण शूद्र आहों; तुम्हांला उपदेश करण्याचा अधिकार आम्हांला नाहीं;’ असें सांगून बोवांनीं त्यांना जें रामदासस्वामींकडे धाडिलें, त्याचें कारण वरील शिक्षणांतच आहे.

तुकारामबोवांचे वडील पंढरीचे वारकरी होते. तेव्हां तुकारामबोवांना लिहिण्यावाचण्याचा संस्कार होऊन, ज्ञानदेवनामदेवादि साधुसंतांच्या अभंगात्मक व ओवीछंदात्मक वाङ्मयाचा सहजच परिचय झाला होता.

बोल्होबा जसे परम भगवद्भक्त होते, तसे प्रपंचांतही हुशार व टापटिपीचे होते. त्यांचा वडील मुलगा सावजी हा लहानपणापासूनच विरक्त बुद्धीचा होता; तेव्हां आपल्या प्रपंचाचा भार तुकारामावरच पडणार हें ते जाणून होते. त्यामुळें त्यांनीं उदीमव्यापाराचें शिक्षण तुकारामबोवांना चांगलें दिलें होतें. हिशोबठिशोब ठेवणें, माल नेणें आणणें, विक्रीखरेदी करणें, व्याजबट्टा चालविणें, वगैरे गोष्टींची माहिती तुकारामबोवांना चांगली झालेली होती. आपला संसार तुकारामानें यथायोग्य पद्धतीनें चालवून, व्यापारव्यवहार भरभराटीस आणावा, अशी इच्छा धरून, मातापितरांनीं तुकारामबोवांना त्या कामीं तरबेज केलें होतें. पुढें संसारांतील प्रत्येक गोष्टीनें उलट खाऊन, जेव्हां तुकारामबोवांवर दुर्धर प्रसंग कोसळले, तेव्हां त्यांना, लौकिकाचा व संसाराचा पूर्ण तिटकारा आला व आपल्या वडिलांनीं नसतेंच शिक्षण देऊन आपल्यास मलत्याच भरीस पाडलें, अशा तऱ्हेचे उद्गार त्यांनीं काढले आहेत:—

"हित नाहीं ठावें जननीजनका, ।
दाविला लौकिकाचार तींहीं. ॥ १
आंधळ्याचें पाठी लागले आंधळे, ।
घात एका वेळे पुढेंमागें. ॥ २
न धरावी चाली, करावा विचार, ।
वरील आहार गळीं लावी. ॥ ३

तुका म्हणे, केला निवाडा लोकडा,
राऊत हा घोडा हातोहातीं. ॥ ४ ॥

बोल्होबाच्या तिन्ही मुलांचा कल स्वभावतः भगवत्सेवेकडे होता. पण त्यांतल्या त्यांत मोठा मुलगा जो सावजी, यानें आपलें अंग संसारांतून आरंभापासूनच काढून घेतलें होतें. त्याचें लग्न जरी झालें होतें, तरी त्याच्या योगानें त्याच्या वैराग्याला मुळींच आळा पडला नाहीं. त्याचें शरीर मात्र घरांत होतें, पण त्याचें मन निरंतर त्याच्यापासून अलिप्त राहून विरक्तिसुखांत मग्न असे. बोल्होबांचा वृद्धापकाळ झाल्यामुळें, उत्साह व बळ हीं आटून गेलीं, व ह्यांना प्रपंचाचें ओझें आतां असह्य होऊं लागलें. आतां हें संसाराचें जूं आपल्या कोणत्या तरी मुलानें स्वतःच्या शिरावर घ्यावें, अशी त्यांना उत्कट आशा लागून राहिली. तेव्हां त्यांनीं सावजीला आपल्याजवळ बोलावून सांगितलें कीं, "बाबारे! उतारवयामुळें आतां माझ्या अंगांत त्राण राहिलें नाहीं व ही संसाराची दगदग मला होत नाहीं. तूं माझा वडील मुलगा आहेस. तेव्हां माझें ओझें हलकें करणें हें तुझें कर्तव्य आहे. इतके दिवस तूं फटकून होतास, तें कसेंतरी चाललें. पण यापुढें असें करून कसें चालणार? तूं या विरक्तीच्या बंडाला आतां दूर कर, आणि थाटलेला प्रपंच नीट आवरून यांत परमार्थसाधन कर." पण सावजी पुरा मख्ख होता; त्यानें बापाचें म्हणणें मुळींच मनावर घेतलें नाहीं. त्यानें सांगितलें कीं, "तुम्ही वडील माणसें घरांत आहां, म्हणूनच केवळ मी येथें राहिलों आहें; पण तुम्ही जर मला संसारांत गुंतवूं पहाल, तर मी येथून तडक चालता होऊन कोठें तरी क्षेत्रवास करीन अगर तीर्थाटनांत आयुष्य घालवीन."

सावजीनें असा रोकडा जबाब दिला, तेव्हां बोल्हावांची त्याच्या संबंधानें अगदींच निराशा झाली. अर्थात् तुकाराम हाच काय तो आतां त्यांच्या आशेचा आधारस्तंभ राहिला. तुकारामबोवांचें वय या वेळीं केवळ तेरा वर्षांचें होतें; कान्होबा तर अगदींच लहान होता. तेव्हां बोल्हाबांनीं संसाराचें सर्व ओझें तुकारामबोवांच्याच अंगावर टाकिलें. तुकारामबोवांचा ओढा मूळापासूनच जरी वैराग्याकडे व ईशभक्तीकडे होता, तरी सावजीएवढी त्यांची अद्याप तयारी झाली नव्हती. शिवाय व्यावहारिक शिक्षण त्यांना मिळालें असल्यामुळें संसाराचा गाडा आपण हांकून आईबापांचा भारउतार केला पाहिजे अशी त्यांची भावना झालेली होती. तेव्हां बोल्हाबांनीं प्रपंचाचा आटोप करण्याविषयीं बोवांना गळ घातली असतां, त्यांचा निषेध करून एकदम साफासाफी करणें त्यांना कोणत्याही प्रकारें इष्ट दिसलें नाहीं. आईबापांची योग्य आज्ञा पाळून त्यांना सुखी करणें, हें सामान्य तत्त्व तुकारामबोवांच्या मनावर उत्तम ठसलेलें होतें.—

"मायबापें केवळ काशी, । तेणें नवजावें तीर्थासी. ॥१॥
पुंडलीकें काय केलें? । परब्रह्म उभें ठेलें. ॥ २ ॥
तैसा होई सावधान, । हृदयीं धरीं नारायण. ॥ ३ ॥
तुका म्हणे, मायबापें । अवघीं देवाचीं स्वरूपें." ॥ ४ ॥

असे उद्गार त्यांनीं काढलें आहेत. तेव्हां सावजींचें कृत्य त्यांना त्या वेळीं योग्य वाटलें नाहीं, असेंच म्हणणें प्राप्त आहे. तुकारामबोवांनीं प्रपंचाचा भार आपल्या शिरावर घेतला व बापाच्या देखरेखीखालीं संसाराचा आटप चांगलाच केला. तुकारामबोवांचें याच्या पूर्वींच पहिलें लग्न झालें होतें. या लग्न-

कोचें नांव *रखमाई होतें. ही बाई दमेकरी असल्यामुळें संसार-कृत्याला बहुतेक नालायक होती. ह्मणून बोल्होबांनीं दुसरी चांगली धनधाकट मुलगी पाहून, तुकारामबोवांचा दुसरा संबंध जुळवून दिला. ही पुण्यांतील आपाजी गुळवे नांवाच्या सावकाराची मुलगी होती व ती अवलाई ऊर्फ जिजाबाई या नांवानें प्रसिद्ध आहे.

तुकारामबोवांच्या दुकानावर गिऱ्हाईक अतिशय लोटत असे; याचें मुख्य कारण बोवांचा गोड, परोपकारी स्वभाव व सात्त्विक आचार हेंच होय. लांडीलबाडी किंवा खोटेंनाटें तुकारामबोवांच्या हातून होणार नाहीं, अशी सर्वांची बालंबाल खात्री असल्यामुळें, बोवांचा उदीम चांगलाच तेजीला आला. अहंभाव, राग, अनावर लोभ, दुष्टबुद्धि व कपट, यांचा तुकारामबोवांना कधींच विटाळ झाला नाहीं. पदराला खार लावून दुःखितांचें दुःख कमी करण्याच्या कामांत त्यांच्याकडून कधींही कसूर झाली नाहीं. दानधर्म करण्याची व साधुसंतांचा परामर्श घेण्याची त्यांना नेहमींच उत्कट हौस असे. आपला व्यवसाय संभाळून जो रिकामा वेळ सांपडे, तो सर्व बोवा ईश्वरसेवेंत व नामसंकीर्तनांत घालवीत असत.

याप्रमाणें भवसमुद्रांतील यात्रा मोठ्या मजेनें चालली असतां, तुकारामबोवांना मानवी जिण्याच्या क्षणभंगुरत्वाविषयीं थोडाबहुत विसर पडून, ते सुखसमाधानांत गर्क होण्याचा फार संभव होता; आणि तसें झालें असतें, म्हणजे त्यांच्या हातून पुढें जें अलौकिक कार्य घडून आलें व त्यांनीं जो दिव्य संदेश जनतेच्या हृदय-

*हिचें माहेर लोहगांवीं होतें असें समजतें. लोहगांव देहूच्या नजीकच आहे व या गांवीं बोवांचें वारंवार जाणेंयेणें घडत असे.

पटावर दिव्यवर्णांनीं ठसविला, त्याला मुळींच संधी मिळतीना. परंतु ईश्वरीसंकेत व दैवाचे योगायोग कांहीं निराळेच होते. कारण एकाएकीं तुकारामबोवांच्या संसारसमुद्रामध्यें भयंकर वादळ उत्पन्न झालें व या वादळांत ऐहिक सुखें, विषयोपभोग, धनधान्य-संपात्ति, इत्यादिकांसह त्यांच्या प्रपंचनौकेस जलसमाधि मिळाली. या वादळास तुकारामबोवांच्या वडिलांच्या मृत्यूपासून आरंभ झाला. तुकारामबोवांचे वडील एकाएकीं वारले व संसारांत पुढारीपण पत्करलेल्या तुकारामबोवांवर हा एक मोठाच कठीण प्रसंग कोसळला. बोल्होबा जिवंत होते, तोंपर्यंत संसाराचें धोरण त्यांच्या अनुभविक सल्ल्यानें चालत असे. केव्हां कसाही प्रसंग आला तरी बोल्होबांचा आपल्याला पूर्ण आधार आहे असें मनांत आलें, ह्मणजे तुकारामबोवांना संसार-कृत्यें करण्यांत उल्हास वाटत असे व फार धीर येत असे. उत्तम थाटलेला संसार आपल्या हातीं दिला व पुढें वेळोवेळीं अडीअडचणीला हितावह उपदेश करून योग्य मार्ग दाखविला, ह्मणून आपल्या वडिलांविषयीं तुकारामबोवांच्या हृदयांत अत्यंत कृतज्ञता वसत असे:—

“ बाप करी जोडी लेंकराचे ओढीं, ।
आपली करवंडी वाळवून. ॥ १
एकाएकीं केला मिरासीचा धनी, ।
कडिये, वागवूनी भार, खांदीं. ॥ २
लेववूनी, पाहे डोळां, अळंकार; ।
ठेवा दावी थोर करूनीयां. ॥ ३
तुका ह्मणे, नेदी गांजूं आणिकांसी, ।
उदार जीवासी आपुलिया. ॥ ४ ॥ ”

असे उद्गार ज्या जनकाविषयीं तुकारामबोवांच्या तोंडून निघाले आहेत, त्याचा आकस्मिक अंत झाला असतां, बोवांना किती उदास व निराश्रित वाटलें असेल, याची कल्पना वाचकांनींच आपल्या मनाशीं करावी. वडील वारले, ज्येष्ठ बंधु संसाराविषयीं उदासीन, आई म्हातारी, एक बायको सदाची दुखणेकरी, दुसरी बायको तापट व फटकळ, धाकटा भाऊ अगदींच पोरवयाचा, अशी परिस्थिति असतांना, तुकारामबोवांचा धीर सुटून त्यांचें अंतःकरण दडपून गेलें असलें, तर त्यांत फारसें नवल नाहीं. तरी पण, संसार पूर्वीप्रमाणेंच हांकण्याचें त्यांनीं आपलें व्रत ढळूं दिलें नाहीं व कुटुंबांतील माणसांस उणेपणा भासूं दिला नाहीं. पण हें फार दिवस टिकलें नाहीं. तुकारामबोवांवर एकावर एक दुर्दैवाचे आघात झाले व चारपांच वर्षांतच त्यांच्या संसाराची धूळदाण झाली. बापाच्या मागून लगेच आईचाही काळ झाला. पुढें व्यापाराला बराचसा धक्का बसून आंतसवाई होऊं लागली. लोकांकडे येणें बरेंच थकलें; बाकी फेडण्याबद्दल तगादा लावणें किंवा दिवाणदरबार करणें हें तुकारामबोवांच्या भाविक व दयाळू बुद्धीस पटेना, म्हणून वसूल मंदावून गेला; आणि सावकारांच्या देण्याची धोंड उरावर येऊन पडली. इतक्यांत देशांत भयंकर दुष्काळ पडला. त्यामध्यें तुकारामबोवांच्या घराण्याची अशी कांहीं विलक्षण दैना उडाली, कीं पुसूंच नये. बोवांचें दिवाळें वाजलें. मध्यान्हाचीही भ्रांत पडूं लागली. घरांत धान्याचा कण नाहीं व पदरीं विष खायालाही दमडी नाहीं. आपण उजेडामधून एकदम काळोखांत आलों, म्हणजे तो काळोख जसा विशेषच दाट भासतो, त्याप्रमाणें भरभराटीचा उपभोग घेऊन दारिद्र्याच्या

अंधकूपांत पडलेल्या तुकारामबोवांच्या दुःखाला व लाजेला पारच नाहीं असें झालें. इतक्यांत त्यांची पहिली बायको रखमाबाई दुष्काळांत 'अन्न अन्न' करून मेली. त्यांचा मोठा मुलगा शिवाजी हाही गुदरला. ज्येष्ठ बंधु सावजी याचीही बायको वारली व तो स्वतः संसारावर तुळशीपत्र ठेवून जो कोठें परागंदा झाला, तो कांहीं पुन्हां आला नाहीं. असा संकटांचा पाऊस कोसळल्यावर तुकारामबोवांच्या मनानें संसाराविषयीं पूर्ण उलट खाल्ली. आपण आजपर्यंत ज्यांत सुख मानून गुंतलों होतों, तो केवळ सुखाभास होता, खरें सुख नव्हतें, अशी त्यांची खात्री पटली. त्यांचें मन आतां खऱ्या सुखाचा ठाव पाहण्यासाठीं तळतळूं लागलें. संसारदुःखानें पोळून ते मुमुक्षूच्या पदवीस पोहोंचले व त्यांच्या आयुष्याच्या दुसऱ्या आणि अत्यंत महत्त्वाच्या अर्धास सुरुवात झाली. या वेळीं त्यांचें वय एकवीस वर्षांचें होतें.

तुकारामबोवांसारख्या संतजनांच्या चरित्राचें विवरण करितांना त्यांना काय सुख लाभलें, त्यांना आनंदाचा वांटा किती मिळाला, त्यांचा संसारांत भाग्योदय कसा झाला, त्यांनीं किती संपत्ति सांठवली, इत्यादि गोष्टींचा विचार करून बरोबर—किंबहुना मुळींच—भागणार नाहीं. तर, त्यांनीं कायकाय संकटें भोगलीं, त्यांच्यावर कोणकोणते प्रसंग कोसळले, दुःखाच्या भट्टींत हीणकस खाक होऊन सुवर्णधातूचें उजळ स्वरूप कसकसें ठळक होत गेलें, दुर्दैवाच्या घनप्रहारांनीं त्यांची मनोरचना कसकशी बनत गेली, या गोष्टींचा आढावा काढणें ही महत्वाची बाब आहे. *दुष्ट व पापी प्रकृतींना ताळ्यावर

* ग्रे कवीच्या पुढील पंक्ति या विषयासंबंधानें वाचनीय आहेतः—

आणण्यासाठींच संकटांची आवश्यकता असते असें नाहीं. दुराग्रही, अहंमन्य व गर्वाढ्य प्रकृतीच्या ठिकाणीं सरलता, लीनता, सौम्यपणा, व सदयता, यांचा ठसा उमटविण्यासाठीं दुर्दैवाचे निर्घृण निर्घात अवश्य आहेत, हें तत्व आम्हांला कबूल आहे. परंतु ज्या सुशील सज्जनांना वांकडा शब्द लावण्यास किंवा यत्किंचित्‌ही अपाय करण्यास आपलें मन धजणार नाहीं, त्यांचेंही सत्त्व व तेज हीं पारखण्यास व उजळ करण्यास ईश्वरीसत्ता, संकट, दुःख, इत्यादि परंपरांचीच योजना करते. अगदीं निर्दोष, निःस्वार्थ व नवजात बालकाप्रमाणें शुद्ध अशा सदाचारी व्यक्तींचें खरें तेज, गुण, प्रभाव, व पवित्रता, हीं व्यक्त करून त्यांना परमावधीला नेण्याला—त्यांची पराकाष्ठा करण्याला—क्लेश व अनर्थपात यांचा बिनमोल उपयोग झालेला आहे. या व्यक्तींचें वास्तविक स्वरूप प्रकट होऊन, त्यांच्या उदाहरणीय चारित्र्याचें योग्य महत्त्व जगाच्या डोळ्यांत भरण्याला क्लेश व दुःख हेच राजमार्ग होत, असें म्हटलें असतांही साजण्यासारखें आहे. जर मानवी आत्म्याच्या उन्नतीला दृश्य मर्यादाच बांधतां येत नाहीं, तर मग ती उन्नति अमुक एक मार्गानेंच झाली पाहिजे, ती सुखभोगापासूनच व्हावी, दुःखक्लेशांपासून होऊं नये, अशा तऱ्हेचा सिद्धांत तरी आपल्याला कसा घालतां येईल ? तुकारामबोवांसारख्या लोकोत्तर महात्म्यांची प्रकृतिच अशी कांहीं विलक्षण असते कीं, तिला

So each his sufferings; all are men
Condemned alike to groan,
The tender for another's pain,
The unfeeling for his own.

जितकी आंच पोंचेल, जितकें घर्षण, उच्छेदन, व ताडन, होईल, तितकी तिची तेजस्विता अधिक चकाकूं लागते, असें जर म्हणूं नये, तर पुढील उद्गारांची कशी बरें फोड करितां येईल:—

"बाप मेला न कळतां, । नव्हती संसाराची चिंता. ॥१॥
बाईल मेली, मुक्त झाली, । देवें माया सोडविली. ॥ २ ।
विठो! तुझें माझें राज्य, । नाहीं दुसऱ्याचें काज. ॥ ३ ॥
पोर मेलें, बरें झालें, । देवें मायाविरहित केलें. ॥ ४ ॥
माता मेली मज देखतां, । तुका म्हणे, हरिली चिंता." ॥५

"बरें झालें, देवा! निघालें दिवाळें. ।
बरी या दुष्काळें पीडा केली. ॥ १ ॥
अनुतापें तुझें राहिलें चिंतन, ।
जाला हा वमन संवसार. ॥ २ ॥
बरें झालें, देवा! बाईल कर्कशा, ।
बरी ही दुर्दशा जनांमध्यें. ॥ ३ ॥
बरें झालें, जगीं पावलों अपमान, ।
बरें गेलें धन, ढोरें, गुरें. ॥ ४ ॥
बरें झालें, नाहीं धरिली लोकलाज, ।
बरा आलों तुज शरण, देवा! ॥ ५ ॥
बरें झालें, तुझें केलें देवाईल, ।
लेंकरें बाईल उपेक्षलीं. ॥ ६ ॥
तुका म्हणे, बरें व्रत एकादशी, ।
केलें उपवासीं जागरण. ॥ ७ ॥

हे उद्गार म्हणजे मूर्तिमंत विरक्ति व शांततेची परमावधि आहेत. भक्तिपूर्ण, वैराग्यशील, टक्केटोणपे खाऊन

शाहाणें झालेलें, व विश्वात्म्यांत पूर्णता पावून आत्मानंदाचा व चित्समाधानाचा अखंड अनुभव घेणारें, जें मन, त्याच्या जिव्हाळ्यांतून निघालेले हे पाझर आहेत. लोण्याहूनही मऊ असणारें विष्णुदासांचें मन संकटांचे निर्वात सोसण्यांत लोखंडाच्या कांबीपेक्षांही कणखर व्हावें, हें केवढें आश्चर्य आहे? भवभूतीनें म्हटलें आहे तेंच खरें, कीं,

*वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि ।
लोकोत्तराणां चेतांसि को हि विज्ञातुमर्हति ॥

तुकारावोवांचे वरील उद्गार निर्दय मनाचे नसून, निर्मोह, आत्मसंस्थ, व क्षोभाच्या पार गेलेल्या समाहित अंतःकरणाचे आहेत. अस्तु. टांकीचे घाव सोसल्यावांचून जशी देवकळा येत नाहीं, गारेवर लोखंडाचा कठोर आघात झाल्यावांचून जशी ठिणगी चमकत नाहीं, किंवा पक्कें दधिमंथन झाल्यावांचून जशी सत्त्वनिष्पत्ति होत नाहीं, त्याप्रमाणेंच लोकोत्तर विभूतींचें तेज व सत्त्व हीं क्लेशदुःखांच्या झटक्यावांचून यथार्थरूपानें व्यक्त होत नाहींत. कित्येक वेळां मनुष्याच्या आयुष्यांतील प्रत्येक †क्षणास युगाचें मोल येतें. तुकारामबोवांचें एकविसावें वर्ष याच मासल्याचें होतें. वैशाखज्येष्ठांतील अतिशय कडक तापानें तापलेली जमीनच जशी बीज धारण करून आषाढश्रावणांतील पावसाच्या सरींनीं भावी पीक देण्यास लायक

---

* याचा मराठी तर्जुमाः—

वज्राहुनही कणखर, कुसुमाहुनही परी लुसलुशीत, ।
लोकोत्तर पुरुषांचीं चित्तें विज्ञानसाधनातीत. ॥

† वर्डस्वर्थ कवीचें पुढील वचन मोठें आवडतें होतें:—

In human life there are moments worth ages.

होते, त्याप्रमाणेंच संसारतापानें होरपळलेली तुकारामबोवांची मनोभूमि, वैराग्याचें उत्तम बीज धारण करून, ईशभक्तीच्या अमृतानें लोकोपकाराचें भावी पीक पिकविण्यास तयार झाली.

परंतु तुकारामबोवांच्या मनःस्थितीमध्यें ही जी क्रांति घडून आली, ती एकाएकींच पूर्ण घडून आली, असें नाहीं. ही क्रांति हळूहळू बरेच दिवस घडत होती; व जसजसे दुर्धर प्रसंगाचे टोले मिळत गेले, तसतशी तिची पूर्णत्वस्थितीकडे प्रगति होत गेली. परंतु या संक्रमणावस्थेचें साग्र वर्णन करण्याला एक स्वतंत्र भागच देणें अवश्य आहे.

---

## ४ संक्रमण. (शा. श. १५११–१५१९.)

आतां बरें झालें, । माझें मज कळों आलें. ॥ १ ॥
खोटा ऐसा संवसार, । मज पायीं द्यावा थार. ॥२॥
उघडले डोळे, । भोग देता काळीं कळे. ॥३॥
तुका म्हणे, जीवा । होतां तडातोडी देवा. ॥४॥

माझे तों स्वभाव मज अनावर, ।
तुजही देतां भार कांहीं नव्हे. ॥ १ ॥
ऐसें कळों आलें मज, नारायणा ! ।
जागृति स्वपना ताळ नाहीं. ॥ २ ॥
संपादितों तो हा अवघा बाह्यरंग, ।
तुझा नाहीं संग अभ्यंतरीं. ॥ ३ ॥
तुका म्हणे, सत्या नाहीं पाठी पोट, ।
असतें निघोट एकी जाती. ॥ ४ ॥

तुकारामबोवांवर जी संकटपरंपरा येऊन आदळली, तिनें त्यांचें मन जागें झालें व खरें सुखसमाधान कोठें आहे, हें

शोधूं लागलें. संसाराचा खोटेपणा प्रत्यक्ष अनुभवास आल्या-मुळें, त्याकडे त्यांचें मन आतां मुळींच लागेना. भयं-कर वणव्यानें रान खाक होऊन गेलेलें आहे व आतां आश्रयाचें कोठेंही ठिकाण दिसत नाहीं, अशा स्थितींत जसें एकादें हरिण तळतळत असावें, तशीच हुबेहूब अवस्था तुकारामबोवांच्या मनाची कांहीं काळपर्यंत झाली. प्रपंच हातचा गेला, परमार्थ तर कोठेंच सांप-डेना. आठदहा वर्षेंपर्यंत ज्या प्रापंचिक गोष्टींचा परिचय झाला होता, त्यांमुळें त्यांच्या स्वाभाविक वैराग्यशुद्धीवर असा कांहीं दाट सारा चढला होता कीं, त्या प्रपंचाचा घात झाल्यावर आतां काय करावें, याविषयीं त्यांना कांहींच सुचेना व ते केवळ भ्रमिष्ठासारखेच वागूं लागले.

परंतु अशा प्रकारची भ्रांत स्थिति झाली असतांही व खऱ्या सौख्याचा ध्यास लागला असतांही, तुकारामबोवांची परोपकारबुद्धि, औदार्य, व सद्वासना, हीं जागृत होतीं. कोणी दीनभणंग दृष्टीस पडला म्हणजे आपल्याजवळ असेल नसेल तें देऊन ते त्याचें दुःख निवारण करीत असत. अशा रीतीनें औदार्य प्रकट करितांना, तुकारामबोवांच्या हातून कधीं कधीं अपात्रीं दान व स्वतःच्या कुटुंबाची हयगय हीं घडत असत यांत शंका नाहीं. त्यांच्या भोळेपणाचा, अम-र्याद औदार्याचा, व सद्वासनेचा, फायदा अनेक वेळां कार्यसाधू लफंग्यांनाही मिळत असे, ही गोष्ट आम्हांला लपवितां येत नाहीं. परंतु यावरून एक गोष्ट चांगली सिद्ध होतें कीं, तुकारामबोवांची परोपकारबुद्धि अगदीं निरपेक्ष व निःस्वार्थ होती. तुकाराबोवांना पोटाकरितांही याचना करण्याचा मोठा

तिरस्कार असे, पण त्यांच्यापुढें आलेला याचक ते कधींही परत धाडीत नसत. आपली स्थिति सुधारावी म्हणून तुकारामबोवा, कधीं बायकोच्या व भावाच्या आग्रहानें, तर कधीं स्वतःच्या खुषीनेंही, कांहीं कामधंदा किंवा व्यापारउदीम करीत. परंतु त्यांचें चित्त एकंदरींत उदास व बेचैन झाल्यामुळें त्यांचें त्या कृत्यांत लक्ष लागत नसे व प्रत्येक गोष्ट अंगाशीं येई. कित्येक वेळां रंगारूपास आलेलें कामही त्यांच्या अनावर परोपकारबुद्धीनें भलत्याच शेंवटाला लागून, ते व्यवहार व लौकिकाचार यांत वाकबगार असलेल्या लोकांच्या दोषास पात्र होत असत. पण तुकारामबोवांना प्रपंचांत जसजशी माघार येत चालली व विपत्ति वाढत चालली, तसतशी त्यांची वैराग्यबुद्धि दृढ होत चालली व आत्मचिंतनाचा आणि भगवद्भजनाचा नाद जोरावत चालला. मग जवळ जें कांहीं उरलेंसुरलें होतें तें गोळा करून, त्याचा विनियोग त्यांनीं आपलें वडिलार्जित विठोबाचें देऊळ दुरुस्त करण्याकडे केला. नंतर त्यांनीं त्या देवळांत भजनाचा तडाका सुरू केला. याचा उल्लेख बोवांनीं आपल्या आत्मचरित्रांत असा केला आहे:—

“ संवसारें झालों अति दुःखें दुःखी, ।
मायबापें सेखीं क्रमलिया. ॥ ३ ॥
दुष्काळें आटलें द्रव्य, नेला मान, ।
स्त्री एकी ‘ अन्न, अन्न, ’ करितां मेली. ॥ ४ ॥
लज्जा वाटे जीवा, त्रासलों या दुःखें, ।
वेवसाय देखें तुटी येता. ॥ ५ ॥

देवाचें देऊळ होतें तें भंगलें, ।
चित्तासी जें आलें करावेसें. ॥ ६ ॥
आरंभीं कीर्तन करी एकादशीं, ।
नव्हतें अभ्यासीं चित्त आधीं. ॥ ७ ॥
कांहीं पाठ केलीं संतांचीं उत्तरें, ।
विश्वासेंआदरेंकरोनियां. ॥ ८ ॥
गाती पुढें त्यांचें धरावें ध्रुपद, ।
भावें चित्त शुद्ध करोनियां. ॥ ९ ॥
संतांचें सेविलें तीर्थ पायवणी, ।
लाज नाहीं मनीं येऊं दिली. ॥ १० ॥
ठाकला तो कांहीं केला उपकार, ।
केलें हें शरीर कष्टवूनी. ॥ ११ ॥

अशा प्रकारें काम चाललें असतां, तुकारामबोवांना मधून मधून प्रपंचाचा उपसर्ग होतच असे. त्यांच्या अशा वृत्तीनें घरांत वारंवार उपास पडत असत. त्यांची स्त्री अवलाई ही महासाध्वी होती. तिचें नवऱ्यावर प्रेम फारच होतें. परंतु त्यांची ही वृत्ति तिला मुळींच पसंत नसे व ती यासंबंधानें त्यांच्यावर वारंवार कठीण वाग्बाण हाणीत असे. घरांत एक दमडीही नाहीं, पोराबाळांचा पाठीशीं लकडा, पति आत्मचिंतनांत दंग, अशी विलक्षण परिस्थिति झाल्यामुळें लहानपणापासून माहेरीं सुखांत वाढलेल्या अवलाईला वैताग येऊन तिनें नवऱ्याला चिडीच्या भरांत उणेंउत्तर केलें, तर तें क्षम्य नाहीं, असें कोणीही सांसारिक मनुष्य म्हणणार नाहीं, अशी आम्हांस खात्री आहे. अवलाई एकीकडे चरफडत असे, पण एकीकडे कधीं कावाडकष्ट करून, तर कधीं माहेरचा पैका आणून, तर कधीं तुकारामबोबांना कांहीं धंदा करण्याला आग्रहानें लावून

संसाराचा गाडा कसाबसा हांकीत असे. तिनें नवऱ्याला व संसाराला विटून माहेरवास केला नाहीं, किंवा ती स्वैरवृत्ति झाली नाहीं. उलट अखेरपर्यंत तिनें आपल्या कुटुंबांतच राहून, आपल्या विरक्त पतीची सेवाचाकरी केली. बोवांची स्वारी देवळांत, गांवाबाहेर, किंवा रानावनांत, जेथें असेल तेथून हुडकून काढून त्यांना अन्नपाणी पुरविल्यावांचून ती कधींही स्वस्थ राहिली नाहीं. बोवा जेवल्यावांचून आपण अन्नग्रहण करावयाचें नाहीं, असा तिचा निर्धार होता. ती तोंडाची जरा कठोर होती, हें खरें. तुकारामबोवाच म्हणतात कीं,

" बरें झालें, देवा बाईल कर्कशा, ।
बरी ही दुर्दशा मनामध्यें." ॥

परंतु ती जरी तोंडाची कठोर होती, तरी मनाची कठोर नव्हती, हें तिच्या वर सांगितलेल्या चरित्रावरून सिद्ध होत आहे. घरांत फारच जाच झाला, म्हणजे मात्र अवलाईच्या तोंडाची तोफ दणादण शब्दगोळ्यांचा भडिमार करीत असे. तुकारामबोवांनीं तिच्या शाब्दिक दणदणाटाचा नमुना आपल्या गाथेंत गोंविलेला आहे:—

" मजची भोंवतां केला येणें जोग, ।
काय याचा भोग अंतरला ? ॥ १ ॥
चालोनियां घरा सर्व सुखें येती, ।
माझी तों फजिती चुकेचिना. ॥ २ ॥
कोणाची बाईल होऊनियां वोढूं, ।
संवसारीं काढूं आपदा किती ? ॥ ३ ॥
काय तरी देऊं ? तोडितील पोरें, ।
मरतीं, तरी बरें होतें आतां ! ॥ ४ ॥

> कांहीं नेदी वांचो, धोवियेलें घर, ।
> सारवावया दोर शेण नाहीं. ॥ ५ ॥
> तुका म्हणे, रांड न करितां विचार ।
> वाहुनियां भार कुंथे माथां." ॥ ६ ॥

वरील उतारा नीट वाचला म्हणजे असें दिसतें कीं, तुकारामबोवांजवळ कोणी गरजू याचक आला, म्हणजे घरांत कांहीं असेल नसेल तें ते देऊन टाकीत असत. अवलाईनें मोठ्या कष्टानें किंवा काटकसरीनें पोरांबाळांच्या पोटाकरितां, संसाराच्या गरजा भागविण्याकरितां, किंवा आपल्या विरक्त नवऱ्याच्या अन्नपाण्याकरितां, कांहीं तरी संग्रह करावा, आणि तुकारामबोवांनीं अकस्मात् कोणाला तरी तो देऊन टाकावा. ही स्थिति पाहिली म्हणजे अवलाईचा क्षणैक तिळपापड होऊन जाई व ती नवऱ्याला दुरुत्तरें बोले. परंतु तुकारामबोवा तिचें हें तुफान पाहून किंचित् हंसत, व 'वेडी आहे बेटी ! आपण होऊन प्रपंचाचे निखारे पदरीं बांधून घेते, आणि मग तळमळत राहाते,' असें म्हणत व गप्प रहात. अवलाईची तेवढी लहर गेली, म्हणजे ती आपली पुन्हा संसाराचा आटोप मोठ्या धीरानें करीत असे.

असो; कुटुंबपोषणासाठीं लहर आल्यास एकादा उद्योग किंवा धंदाउदीम करावयाचा असा बोवांचा या संक्रमणस्थितींत क्रम होता. परंतु '*भिक्षांदेही'चा अवलंब करावयाचा

---

* भिक्षावृत्तीसंबंधानें एका आंग्ल कवीचे पुढील विचार वाचनीय आहेत:—

> Art thou a man, and sham'st thou not to beg,—
> To practice such a servile kind of life ?

नाहीं—आपला भार दुसऱ्यावर टाकून त्यास कष्टवावयाचें नाहीं—असा त्यांचा बाणा होता:—

भिक्षापात्र अवलंबणें, । जळो जिणें लाजिरवाणें. ।
ऐशियासी नारायणें, । उपेक्षिजे सर्वथा. ॥ १ ॥
देवा पायीं नाहीं भाव, । भक्ति वरीवरी वाव, ।
समर्पिला जीव । नाहीं, तों हा व्यभिचार. ॥ २ ॥
जगा घालावें सांकडें, । दीन होऊनी बापुडें, ।
हेंची अभाग्य रोकडें; । मूळ आणि विश्वास. ॥ ३ ॥
काय न करी विश्वंभर ? । सत्य करितां निर्धार. ।
तुका म्हणे, सार । दृढ पाय* धरावे. ॥ ६४ ॥

तेव्हां बायकोनें किंवा भावानें 'कुटुंबाची कांहीं सोय लावा'

---

Why, were thy education ne'er so mean.
Having thy limbs, thousand fairer courses
Offer themselves to thy election.
Either the wars might still supply thy wants,
Or service of some virtuous gentleman,
Or honest labour; nay, what can I name
But would become thee better than to beg?
But men of thy condition feed on sloth,
As doth the beetle on the dung she breads in;
Not caring how the metal of your minds
Is eaten with the rust of idleness.

—Ben Jonson.

* तुकारामबोवांनीं या ठिकाणीं ज्या भिक्षेचा निषेध केला आहे ती भिक्षा, व तुकारामरामदासस्वामींसारखे महंत जी भिक्षा मागत असत ती भिक्षा, यांत फारच अंतर आहे. पहिलीच्या मूळाशीं स्वार्थ व आळस आहे, तर दुसरीच्या मूळाशीं निःस्पृहता व देशसमाजकार्याची खरी कळकळ आहे. दुसऱ्या प्रकारच्या भिक्षेचा बोवांना अभिमान होता. ते छत्रपतींस लिहिलेल्या पत्रांत म्हणतात:—

म्हणून तगादा लाविला म्हणजे स्वारी एकादा धंदाबिंदा पत्क रण्याच्या भरीस पडे.

एकदां अशा स्थितींत तुकारामबोवा इंद्रायणीच्या तीरीं विठोबाच्या देवळांत भजन करीत असतांना, एक शेतकरी आला व त्यानें बोवांस सांगितलें कीं, "बोवा! मला मालाची खेप आणण्याकरितां बाहेरगांवीं जावयाचें आहे. तेथें माझा एक महिना मोडेल. पण इकडे माझें शेत पिकाला आलें आहे, त्याची राखण करण्याला कोणी नाहीं, त्यामुळें जरा पेंचांत आहें. तुम्ही शेताची राखण करीत असलां, तर माझें काम होईल व तुम्हांलाही अर्धा मण धान्य मिळेल." बोवांना वाटलें कीं, आपण शेतावर बसूनच एकीकडे राखण करूं व एकीकडे

---

मागावें हें अन्न तरी भिक्षा थोर; । वस्त्रासी हे थार चिंध्या विदी.॥१॥
निद्रेसी आसन उत्तम पाषाण, । वरी आवरण आकाशाचें. ॥ २ ॥

अशाच प्रकारच्या निःस्पृह भिक्षेची थोरवी समर्थांनीं आपल्या दासबोधांत (दशक १४, समास २-३,) गायिली आहे. ते म्हणतातः—

" भिक्षेविषयीं लाजूं नये, । बहुत भिक्षा घेऊं नये, ।
पुसतांही देऊं नये । ओळखी आपुली. ॥
आपली भिक्षा सोडूं नये । बा! रे! अन्न खाऊन पडूं नये, ।
निःस्पृहासि घडूं नये । मोलें यात्रा. ॥
ब्राह्मणाची मुख्य दीक्षा । मागितली पाहिजे भिक्षा, ।
'ओं भवति' या पक्षा । रक्षिलें पाहिजे. ॥
नित्य नूतन हिंडावें, । उदंड देशाटण करावें, ।
तरीच भिक्षा मागतां बरवें । श्लाघ्यवाणें. ॥
अखंड भिक्षेचा अभ्यास, । तयास वाटेना परदेश, ।
जिकडे तिकडे स्वदेश । लोकत्रयीं. ॥
'कांहीं भिक्षा आहे?' म्हणावें । अल्पसंतोषी असावें; ।
बहुत आणितां घ्यावें । मुष्टी एक. ॥
सुखरूप भिक्षा मागणें, । ऐसीं निःस्पृहतेचीं लक्षणें, ।
मृदु वाग्विलास करणें, । परम सौख्यकारी. ॥

भजन करूं; म्हणजे थोडेंसें धान्य मिळालें, तर बायकोचेंही मन जरा गार होईल. असा विचार करून बोवांनीं शेतकऱ्याची कामगिरी पत्करली. बोवा माळावर राखण करायला बसले; पण भगवद्भजनांत त्यांची ब्रम्हानंदीं इतकी टाळी लागूं लागली कीं, पांखरांचे थवेच्या थवे शेतावर येऊन पडूं लागले, तरी तें बोवांच्या गांवींही नाहीं! पुढें महिन्याभरानें शेतकरी बाहेर-गांवाहून आला व पहातो तों, शेत पाखरांनीं फुललें आहे! मग अधिक पाहणी करण्याचे भरीस न पडतां, त्यानें बोवांना धक्काबुक्की व शिवीगाळ करीत खेंचीत गांवांत आणिलें व पंचाईत करून नुकसानीच्या भरपाईसाठीं कसा तरी दोन खंडी दाण्याचा रोखा त्यानें बोवांजवळून करून घेतला व शेतांतील उभें पीक त्यांच्या स्वाधीन केलें. शेतामध्यें पांखरांची पखरण पाहिल्यामुळें त्या शेतांत पिकाचा दाणाही शपथ वाहायाला हातास लागावयाचा नाहीं, अशी त्या शेतकऱ्याची पक्की भावना झाली होती. परंतु देवाची योजना कांहीं निराळीच होती! त्या सालीं शेतांतील तणाची मळणी काढल्यावर गल्ह्याची उभी रास दरवर्षापेक्षां अतिशयच मोठी झाली. एकंदर पीक १७ खंडी उतरलें! मग मात्र त्या शेतकऱ्याच्या तोंडाला पाणी सुटलें; परंतु गांवकऱ्यांनीं त्याची मात्रा चालूं दिली नाहीं व दोन खंडींच्या वर एक दाणाही त्याला कपाळीं लावावयास मिळाला नाहीं. सतरा खंडी गल्ला घरीं आला, तेव्हां अवलाईस फार समाधान व कौतुक वाटलें व तिनें समाधानाचे उद्गार काढले कीं,

"*बरें झालें गेलें! । आजी अवघें मिळालें. ॥ १

*इंदुप्रकाश छापखान्यांतील गाथेंत या अभंगाचा कांहीं विलक्षणच अर्थ

आतां खाईन पोटभरी । ओल्या कोरड्या भाकरी. ॥२
किती तरी तोंड । याशीं वाजवूं मी रांड ?" ॥ ३

---

केला आहे. 'बरें झालें गेलें,' म्हणजे 'आजपर्यंत झालें तें नीट झालें; त्या झाल्यागेल्या गोष्टींचा विचार नको,' असा याचा अर्थ आहे. परंतु याचा अर्थ उपरी निर्दिष्ट गाथेंतील चरित्रकार रा. जनार्दन सखाराम गाडगीळ यांनीं असा केला आहे कीं, 'तुकारामासारखें पिसाट एकदांचें गेलें—नाहींसें झालें-हें बरें झालें. सुटलें एकदाची !' म्हणजे अवलाई ही आपल्या नवऱ्याच्या प्राणावर जशी काय तिळांजळीच धरून बसली होती! तुकारामबोवांची पत्नी म्हणजे एक अलौकिक राक्षसीण होती, अशी रा. गाडगिळांची कल्पना होती, व 'बरें झालें देवा ! बाईल कर्कशा,' या बोवांच्या उक्तीनें ही कल्पना अगदीं वज्रलेपाप्रमाणें त्यांच्या अंतःकरणावर खिळून गेली होती, असें दिसतें. 'बरें झालें गेलें' अशी नपुंसकलिंगी भाषा तुकारामांसंबंधानें अवलाईनें कां योजली आहे, याचाही उलगडा रा. गाडगिळांनीं टीपेंत केला आहे:—In the original, the neuter pronoun is used, instead of the masculine to indicate that she held him in extreme contempt. रा. गाडगीळ यांनीं वरील समजूत करून घेऊन एकंदर अभंगाचा जो अर्थ लाविला आहे तो उघड असंबद्ध दिसतो. वाचकांकरितां तो अर्थ येथें सबंध उतरून घेतों:—

"It is all right that he is gone; in losing him I get everything. I shall now eat my belly-full of bread, coarse though it be. How much had I to scold him, accursed that I am; 'Tuka's wife loves him, though she uses scornful words.'"

रा. गाडगिळांचा अर्थ खरा मानल्यास, पहिल्या पंक्तीचा अर्थ व शेवटल्या पंक्तीचा अर्थ, यांची संगति कशी घालावयाची, याचें आम्हांस मोठें कोडें पडलें आहे. अवलाईची प्रकृति अशा मासल्याची नव्हती—ती आपल्या नवऱ्याच्या जीवावर उठली नव्हती—हें मागें दाखविण्यांत आलेंच आहे व पुढेंही याचें स्पष्टीकरण ओघाओघानें येणार आहे.

तुका बाईले मानवला, । चीथू करूनिया बोला. ॥ ४

परंतु अवलाईचें हें समाधान व कौतुक फारच थोडा वेळ टिकावयाचें होतें. तुकारामबोवांनीं, सतरा खंडी धान्यापैकीं शेतकऱ्याला दोन खंडी देऊन जें शिल्लक राहिलें, तें बहुतेक सर्व धर्मादायांत व विठोबाच्या देवळाचा जीर्णोद्धार करण्यांत खरचून टाकिलें. हें पाहतांच अवलाईच्या काळजाचें अगदीं पाणी झालें. घरीं आलेलें धान्य गेलें, तोंडांतला घांस काढून तो होळीच्या होळकरांना तुकारामबोवांनीं देऊन टाकला, म्हणून तिच्या अंगाची लाही झाली. ती म्हणूं लागली:—

"गोणी आली घरा, । दाणे खाऊं नेदी पोरा. ॥१॥
भरी लोकांची पांटोरी, । मेला चोरटा खाणोरी."॥२॥

असें म्हणून ती संतापाच्या व त्राग्याच्या अवेशांत वेडी होऊन, जराशी हातवाईवरही आली:—

"खवळली पिसी, । हाता झोंबे जैसी लांसी. ॥ ३ ॥
तुका म्हणे, खोटा । रांडे संचिताचा वांटा." ॥ ४ ॥

तुकारामबोवांनीं देवभजन सोडावें व संसारकृत्यांत गुंतावें म्हणून अवलाईची नेहमीं घरांत जशी टकळी चालू असे कीं:—

"आतां पोरा! काय खासी? । गोहो जाला देवलसी. ॥ १
डोंचकें तिंबी, घातल्या माळा, । उदमाचा सांडी चाळा. ॥२
आपल्या पोटा केली थार, । आमचा नाहीं येसपार. ॥३
हातीं टाळ, तोंड वासी, । गाय देवळीं देवापाशीं. ॥४
आतां आम्ही करूं काय? । न वसे घरीं राना जाय." ॥५
तुका म्हणे, आतां धीरी, । आजुनी नाहीं जालें तरी! ॥६

तशीच बोवांचा भाऊ कान्होबाही सारखी तक्रार करीत असे. तो लोकांजवळ यासंबंधानें खलबतें करी व बोवांनीं

संसाराला लागावें व पूर्वींप्रमाणें व्यवहार करावा म्हणून अनेक युक्त्या योजी. कित्येक वेळां गांवचे शेजारीपाजारी व आप्तइष्ट येऊन बोवांना लौकिक उपदेश करीत. कोणी कोणी कुटाळ लोक त्यांचा छळ करीत किंवा त्यांना दुरुत्तरें बोलत. कांहीं आपस्वार्थी व मतलबी लोक त्यांच्या भोळेपणाचा व दयाळू परोपकारबुद्धीचा दुरुपयोग करून त्यांना वेठीला धरीत, बाजारांतून तेल आणण्याला नळे घेऊन पाठवीत, किंवा दैन्य भाकून त्यांजवळ असेल नसेल तें उपटीत. असो.

अशी स्थिति चालली असतां एकदा अवलाईनें *माहेराहून दोनशें रुपयांची रक्कम आणली व कान्होबानें गांवकरी व्यापारी मालाची खेप करण्यास निघाले असतां बोवांनीं त्यांच्याबरोबर जावें असें ठरविलें. त्यानें खेपकऱ्यांना सांगितलें कीं,

"†आमुचे दादासी सांगातें हो! न्यावें ।
वाटेनें आणावें सांभाळोनी." ॥

तेव्हां,

" हांसोनियां सर्व म्हणती तयासी, ।
'हा काय उदिमासी करील नीट'? ॥
बरें, असो; आतां लवकरी धाडावें, ।
उमजोनी सांगावें तयालागीं. " ॥

नंतर कान्होबानें

' दोनशें रुपये दिलें भांडवल, ।
स्वाधीन हो! सकल त्याचे केलें. ॥

---

* खंडेरायकवीनें या प्रसंगावर एक लहानसें अभंगात्मक प्रकरण रचिलें आहे. त्यांत ही रक्कम कान्होबानें कशीबशी उभी केली असें म्हटलें आहे

† या पंक्ती खंडेरायकृत तुकारामचरित्रांतील आहेत.

बहुतां रीतीनें सांगे तुकोबासी, ।
लागला पायासी कान्होबा तो.' ॥

तुकारामबोवांनीं 'काय पंढरीनाथ करील तें खरें,' असें म्हणून ही कामगिरी अंगावर घेतली. मालाची नेआण करण्यासाठीं बैल घेऊन तुकारामबोवांची स्वारी खेपकर बैलक्यांबरोबर निघाली, ती सुप्यांत आली. तेथें एक विठ्ठल नांवाचा ब्राह्मण ब्रह्मस्वानें नाडला होता. कर्ज फेडलें नाहीं तर बायकोचीही इज्जत जाणार, अशा प्रकारच्या विलक्षण पेंचांत तो बिचारा ब्राह्मण पडला. ही बातमी तुकारामबोवांस लागली, तेव्हां:—

" सोबत्यांहातीं बैल लावोनियां दिले ।
तुकोबा चालिले गांवामध्यें. ॥
तयासी येवोनी तुकोबा पुसत, ।
' कां तुम्ही दुःखित बैसलांसां ? ' ॥
सर्व वर्तमान सांगे तुकोबाला, ।
तत्काळची दिला कसा तेणें." ॥

नंतर त्या ब्राह्मणास बरोबर घेऊन तुकारामबोवा पंढरीस गेले व त्या 'भूतळींच्या वैकुंठां'त ते अकुंठपणें भगवद्भजनांत गर्क झाले. त्यांना बैलांची मुळींच शुद्धि राहिली नाहीं. तेव्हां बोवांचे सोबती अगदीं कंटाळून गेले व त्यांनीं:—

" पंढरींत बैल सोडोनीयां दिले, ।
हिंडूं ते लागले गल्लोगल्लीं. ॥
सोबती ते खेप भरोनियां गेले, ।
गांवासी ते आले आपुलिया. ॥
तयांसी येवोनी कान्होबा पुसत, ।
' दादाची ते मात सांगा' तुम्ही." ॥

त्यावर त्यांनीं सांगितलें:—

“ सुप्यांत जातांना तुकोबा तो गेला, ।
नाहीं तो देखिला पुन्हां आम्हीं. ॥
पंढरींत बैल सोडुनियां दिले, ।
कोणीकडे गेले ठाव नाहीं.” ॥

परंतु पुढें केशवशेटी नांवाच्या एका ईश्वरावतारीं व्यापाऱ्यानें तुकारामाचे बैल व माल परत आणला व त्यांत कान्होबाला पुष्कळच फायदा झाला, असें खंडेराय कवि म्हणतो. नंतर तुकारामबोवा जेव्हां परत घरीं आले व एकंदर व्यापाराची बरकत त्यांनीं पाहिली, तेव्हां हें सर्व आपल्या कष्टाचें व मालकीचें द्रव्य नाहीं, तर देवाचें देणें आहे, असें मनांत आणून,

“ खर्च जावोनियां, सवाई घेतली, ।
अवघी जमा दिली धर्मालागीं.” ॥

असो. अशा रीतीनें मधून मधून उपसर्ग उत्पन्न होत गेल्यामुळें बोवांचें भगवद्भजन व आत्मचिंतन यथास्थित रीतीनें चालेना. त्यांची तर आत्मसमाधानाविषयीं उत्कंठा वाढत चालली व हृदयाची तळमळ जोरावर येऊं लागली. तशांत कांहीं लोकांनीं त्यांना वेडे ठरवून त्यांचा विलक्षणच छळ केला. एकदां तर त्यांनीं बोवांची धिंड काढली व या कृत्यानें त्यांनीं जशी आपली स्वतःची पाशवीबुद्धि प्रकट केली, तशीच बोवांची सहिष्णुता कठीण कसोटीस लावून त्यांच्या विरक्तीस उजळा आणिला. या प्रसंगाविषयीं तुकारामबोवांनीं अभंग केले आहेत, ते असे:—

“ दरिद्रही आम्हां सुख ते सोहाळे, ।
झालेंसें गबाळें लंगणाचें. ॥ १ ॥

कोण तेथें काय करितसे कोड ? ।
जन्मीं आम्हां घोडं ठावें नाहीं. ॥ २ ॥
फार दिस हौस राहिली अंतरीं, ।
पुरवितां हरी ऐसें झालें. ॥ ३ ॥
जन साधू तुम्हीं केलें असें कोड, ।
गाढवाचें घोडं दिलें ऐसें. ॥ ४ ॥
तुका म्हणे, आतां बैसों द्यावें वर, ।
सर्व चला स्थिर मागें पुढें. ॥ ५ ॥
गावांच्या प्रभूनें बोलउनी, वरी ।
हजामत बरी केली माझी. ॥ १ ॥
माझ्या मायबापें नव्हतें केलें कोड, ।
गाढवाचें घोडं देवें दिलें. ॥ २ ॥
कंदर्पाच्या माळा घालुनियां गळां. ।
ऐसा हा सोहळा नव्हता झाला. ॥ ३ ॥
सोईरेधाईरे आणि सहोदर ।
धरियलें छत्र मजवरी. ॥ ४ ॥
मायबापें दोन्ही आणि करवली, ।
वरात मिरविली ऐसी नव्हती. ॥ ५ ॥
तुका म्हणे, तुम्ही हळूहळू चला, ।
उगाच गलबला करूं नका." ॥ ६ ॥

वरील अभंग वाचला म्हणजे तुकारामबोवांची विरक्ति व सुखदुःखसमता वाढत वाढत कोणत्या अंशाला जाऊन पोंचली होती, हें ध्यानीं येतें. बोवा ही व्यक्ति या सामान्य जगांतील नसून, ही दिव्य, अपर जगांतील, अलौकिक प्रकृति आहे, अशी जगावर छाप पडण्याला या गोष्टीपासून आरंभ झाला, असें म्हणण्यास हरकत नाहीं. लोकांनीं केलेल्या

निंदास्तुतीविषयीं त्यांचे कान जणूं काय *बधिर होत चालले, व त्यांनीं केलेले छळप्रकार सहन करण्याच्या कामीं त्यांचें हाडमांस जणूं काय घडींव लोखंडाप्रमाणें कणखर बनलें.

लोकांच्या उपसर्गानें आपला छळ व जाच होतो, याबद्दल बोवांना मुळींच पर्वा वाटत नव्हती. निंदास्तुतीसंबंधानें ते बेफिकीर झाले होते. त्यांनीं आपले मनोभाव परमेश्वरभक्ति व भूतदया यांना वाहिल्यामुळें, त्यामध्यें कामक्रोधलोभादि दुष्ट षड्विकारांना आपलें बिऱ्हाड ठेवण्याला जागाच नाहीं, अशी स्थिति झाली होती. ते म्हणत:—

" माझी आतां लोक सुखें निंदा करू; ।
म्हणती 'विचारू सांडियेला.' ॥ १
कारण होय तो करावा विचार; ।
काय भीडभार करूं ? देवा ! ॥ २
तुका म्हणे, काय करूं लोकनिंदे ? ।
जनाचा संबंध नाशवंत." ॥ ३

ते आत्मचरित्रांत म्हणतात:—

वचन मानिलें नाहीं सुहृदांचें; ।
समूळ प्रपंचें वीट आला. ॥ १२
सत्याअसत्यासी मन केलें ग्वाही, ।
मानियलें नाहीं बहुमता. ॥ १३

परंतु लोकांच्या कटकटीनें बोवांच्या आत्मचिंतनांत व भग-

---

* वर्डस्वर्थ कवीवर अनेक टीकाकारांनीं व कवींनीं खरमरीत व मर्मभेदक टीका केल्या. परंतु त्या कवीनें त्यांना कधींही उत्तर दिलें नाहीं किंवा त्यांच्या टीका त्यानें आपल्या हृदयास झोंबूं दिल्या नाहींत. तो शांतपणें म्हणत असे, 'My ears are stone-deaf to this idle buzz, my flesh as insensible as iron to these petty things.'

वद्धृत्तींत विघ्नें येऊं लागलीं, व त्यामुळें मात्र बोवांना फारच वाईट वाटूं लागलें. अद्याप त्यांचें मन आत्मसुखाच्या—चित्स-माधानाच्या—भक्तिजन्य आनंदाच्या—परमावधीला पोंचलें नव्हतें. ती पूर्णता यावी, मनाची तळमळ व चलबिचल साफ मोडावी, विश्वात्म्याशीं एकत्व पावून विश्वैकरूप होऊन जावें, अशी त्यांना हुरहूर लागली होती, व गांवांत राहून ती हुरहूर दूर होण्याचें चिन्ह दिसेना. या अस्वस्थतेचें—मनाच्या तळमळीचें—चित्र बोवांनीं अनेक अभंगांत वर्णिलेलें आहे. त्यावरून त्यांची मुमुक्षुस्थिति व ईशप्रसादाविषयीं उत्कंठा ह्या उत्तम तऱ्हेनें व्यक्त होतात:—

“ नका मजपाशीं । वदों प्रपंचाचे विशीं. ॥ १
आतां नाइकावी कानीं । मज देवाविण वाणी. ॥ २
येऊनियां रूपा, । कोण पाहे पुण्यापापा ? ॥ ३
मागें आजिवरी । जालें पाप नेलें चोरीं. ॥ ४
सांडियेलीं पानें । पुढें पिका अवलोकनें. ॥ ५
पडों नेदी तुका । आड गुंपूं कांहीं चुका. ॥ ६

---

माझे मज कळों येती अवगुण, ।
काय करूं मन अनावर ? ॥ १
आतां आड उभा राहें, नारायणा ! ।
दयासिंधुपणा साच करीं. ॥ २
वाचा वदे, परी करणें कठीण, ।
इंद्रियांआधीन जालों देवा ! ॥ ३
तुका म्हणे, तुझा जैसातैसा दास, ।
न धरीं उदास, मायबापा ! ॥ ४

---

आतां येथें लाजे ! नाहीं तुझें काम, ।
'जय राम राम' आठवूं दे. ॥ १ ॥
तुझे भिडे माझे बहु जाले घात, ।
केलों या अंकित दुर्जनाचा. ॥ २ ॥
माझें केलें मज पारिखें माहेर, ।
तटोनी साचार चाळवीलें ॥ ३ ॥
सुखासाठीं एक वाहियेलें खांदीं, ।
तेणें बहु मांदी मेळविली. ॥ ४ ॥
केला चौघाचार, नेलों पांचांमधीं, ।
नाहीं दिली शुद्धि धरूं आशा. ॥ ५ ॥
तुका म्हणे, आतां घेईन कांटीवरी, ।
धनी म्यां कैवारी, केला देव. ॥ ६ ॥

---

कधीं कृपा करिसी नेणें, । मज दीनाचें धांवणें. ॥ १
भेटीलागीं पंढरीनाथा ! । जीवीं लागली मळमळव्यथा. ॥ २
सिणलें माझें मन, । वाट पाहतां लोचन. ॥ ३
तुका म्हणे, लागली भूक । तुझें पाहवया श्रीमुख. ॥ ४

---

भागल्यांचा तूं विसांवा, । करीं नांवा लिंबलोण. ॥ १
परमानंदा ! पुरुषोत्तमा ! । हरीं या श्रमापासूनी. ॥ २
अनाथांचा अंगीकार । करितां, भार न मानिसी. ॥ ३
तुका म्हणे इच्छा पुरे । ऐसे धुरे, गे ! विठ्ठले ! ॥ ४

---

घालूनियां कास, । बळें आलों मागायास. ॥ १
प्रेमें देई पाठवूनी, । पांडुरंगा ! सेवाऋणी ! ॥ २
होई रे ! शाहाणा, । कळों नेदीं या जना. ॥ ३
तुका म्हणे, पाई । जडलों, मग उरलें काई ? ॥ ४

---

सांडियेली काया । वरी ओंवाळूनी पायां. ॥ १
शरण, शरण, नारायणा ! । मज अंगीकारा दीना. ॥ २
आलों लोटांगणीं, । रुळें तुमचे चरणीं. ॥ ३
तुका म्हणें, कई । डोई ठेवीन हे पाई ? ॥ ४

---

तुझे पाईंचा कुतरा । नको मोकलूं, दातारा ! ॥ १
धरणें घेतलें दारांत, । नको धरून उठवूं हात. ॥ २
घेतली मुरकुंडी, । थोर झालों मी लंडी. ॥ ३
तुका म्हणे, जगजीवना ! । ब्रीदें पाहें, नारायणा ! ॥ ४

---

पडिलों बाहेरीं आपल्या कर्तव्यें, ।
संसाराचा जीवें वीट आला ! ॥ १
एकामध्यें एक नाहीं मिळों येत, ।
ताक नवनीत निवडलिया. ॥ २
दोनी जालीं नांवें एकाच्या मंथनें, ।
भूस सार गुणें वेगळालीं. ॥ ३
तुका म्हणे, कोठें वसे मुक्ताफळ, ।
सिंपल्याचें स्थळ खंडलिया ? ॥ ४

---

कन्या सासुऱ्यासी जाये, । मागें वळोनियां पाहे. ॥ १
तैसें झालें माझे जीवा, । कधीं भेटशी ? केशवा ! ॥ २
चुकलिया माये । बाळ हुरू हुरू पाहे. ॥ ३
जीवनावेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी." ॥ ४

अशा प्रकारें मुमुक्षुस्थितींतील शेंकडों अभंग देतां येतील. अखेर तुकारामबोवांनीं एकांतवासांत जाऊन आत्मचिंतन व सतत अभ्यास केल्यावांचून खरें तत्व आपल्या हातीं येणार नाहीं, असा सिद्धांत निश्चित केला व ते गांव सोडून

सुमारें दहा कोसांच्या पल्ल्यावर असणाऱ्या भांबनाथाच्या डोंगरावर ध्यानस्थ राहिले. परंतु तेथें कान्होबानें त्यांना हुडकून काढिलें, व परत देहूस आणिलें. मग तुकारामबोवांनीं संसाराचा सर्व गुंता ताडकन तोडून टाकण्याचें मनांत आणिलें व कान्होबाला घरांतील सर्व दस्तैवज आणून इंद्रायणींत बुडविण्यास सांगितलें. पण कान्होबा कांहीं बोवांइतका विरक्त व निर्लोभ झाला नव्हता. तेव्हां त्याच्या आग्रहावरून बोवांनीं खतपत्रांचे बरोबर दोन वांटे केले व त्यांतील एक वांटा भावास देऊन, दुसरा नदीला अर्पण केला व द्रव्याच्या लोभांतून ते कायम मुक्त झाले.

नंतर बोवांनीं देहूच्या पश्चिमेस सुमारें तीन कोशांवर भांडार नांवाच्या डोंगरावर जाऊन एकांत वास करण्यास आरंभ केला. या ठिकाणीं ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, अमृतानुभव, वगैरे ग्रंथांचें वाचनचिंतन करण्यांत व नामदेवादि संतांचीं पदें व अभंग गाण्यांत, व आत्मचिंतनांत, वेळ घालविण्याचा क्रम त्यांनीं सुरू केला. या अभ्यासानें, एकांतवासानें, व आत्मचिंतनानें, तुकारामबोवांच्या आत्म्याची तळमळ कमी होत चालली व हृदयांत अखंडानंदाचा उदय होऊं लागला. ते या आत्मध्यानामृतांत इतके मग्न होऊन जात कीं, पांचपांच सातसात दिवस त्यांना खाण्यापिण्याचेंही भान नसे. परंतु बिचाऱ्या अवलाईला मात्र बोवा रानांत गेल्यापासून फार कष्ट पडूं लागले. ती दररोज कांहींतरी अन्न तयार करून, शिदोरी बरोबर घेऊन उन्हातान्हांत खड्याकांट्यांतून व रानावनांतून बोवांचा माग काढीत भटकत असे. बोवा आढळले म्हणजे ती त्यांना खाऊं घालीत असे, पण एकीकडे तिचें टुमणें चालतच असे कीं:—

"न करवे धंदा, । ऐता तोंडीं पडे लोंदा. ॥ १ ॥
उठितें तें कुटितें टाळ, । अवघा मांडिला कल्होळ. ॥ २ ॥
जीवंतची मेले, । लाजा वाटुनियां प्याले. ॥ ३ ॥
संवसाराकडे । न पाहती, ओस पडे. ॥ ४ ॥
तळमळती यांच्या रांडा,। घालिती जीवा नांवें धोंडा."॥५
तुका म्हणे, "बरें झालें, । घे गे ! बाइले ! लिहिलें." ॥६॥

एकंदरींत तुकारामबोवांना भांडारडोंगरावरील पुरश्चरणानें बरेंच सुखसमाधान लाभलें. पाठीमागचा सर्व घोळ व उपसर्ग नाहींसा झाल्यामुळें, त्यांचें मन एकाग्र झालें व तें विश्वात्मकल्पनेशीं समरसून अद्वैतानंदाचा अनुभव त्यांना जातीनें स्वतः घेतां येऊं लागला. त्यांची मोठी इच्छा अशी होती कीं,

"एकांताचें सुख देईं मज, देवा !
आघात या जीवा चुकवोनी. ॥ १ ॥
ध्यानीं रूप, वाचे नाम निरंतर, ।
आपुला विसर पडों नेदीं. ॥ २ ॥
मायबाळा भेटी सुखाची आवडी, ।
तैशी मज गोडी देईं, देवा ! ॥ ३ ॥
कीर्ति ऐकोनियां आलों शरणागत, ।
दासाचें तूं हित करितोसी. ॥ ४ ॥
तुका म्हणे, मी तों दीन पापराशी, ।
घालावें पाठिशीं, मायबापा ! ॥ ५ ॥

ही त्यांची उत्कट इच्छा आतां पूर्ण झाली. एकांतामध्यें चिंतनाच्या सुखानें त्यांचें दुःख दूर होऊन ईश्वरसाक्षात्कार अखंड परमानंदरूपानें झाला. बोवांनींच स्वतः हें सांगितलें आहे:—

नेणें फुंकों कान, । नाहीं एकांतींचें ज्ञान. ॥ १ ॥
तुम्ही आईका, हो संत ! । माझा सादर वृत्तांत. ॥ २ ॥
नाहीं देखिला तो डोळां, । देव दाखवूं सकळां. ॥ ३ ॥
चिंतनाच्या सुखें, । तुका म्हणे, नेणें दुःखें. ॥ ४ ॥

तुकारामबोवांनीं प्रथमतः संसारांतून-जगिक व्यापांतून-अंग काढलें, याचें कारण इतकेंच कीं:—

" प्रियापुत्रबंधू । यांचा तोडिला संबंधू, ।
सहज जालों मंदू, । भाग्यहीन, करंटा. ॥ ५ ॥
तोंड न दाखवे जनां, । शिरे सांदीं, भरे रानां, ।
एकांत तो जाणा । तयासाठीं लागला. ॥ ६ ॥
सहज वडिलां होती सेवा, । म्हणोनी पूजितों या देवा, ।
तुका म्हणे भावा-। साठीं झणीं घ्यावा कोणीं. " ॥ ८ ॥

परंतु संसार सोडल्यावर जी देवसेवा आनुवंशिक संस्कारानेंच त्यांनीं चालविली होती, तींतच त्यांचें मन विलक्षण गोडी अनुभवूं लागलें; मग ही गोडी पूर्णपणें अनुभवास यावी म्हणून त्यांनीं डोंगरावर एकांतवास केला व थोड्याच काळांत ते पूर्णावस्थेला पोंचले. पहिला एकांतवास लोकलज्जेचें कार्य होता, दुसरा एकांतवास भगवत्प्रसादलालसेचें कार्य होता. पहिल्यांत ऐहिक दुःखाविषयीं भयाला महत्व होतें, दुसऱ्यांत अध्यात्मिक अखंड सौख्याची उत्कंठा भरलेली होती. पहिला एकांत स्मशानवैराग्याचा होता, दुसरा एकांत अंगांत बाणून पूर्णपणें मुरलेल्या विरक्तीचा होता. तुकारामबोवा म्हणतात, या विरक्तीनें व एकांतचिंतनानें असा चमत्कार घडून आला कीं:—

" मीची मज व्यालों, । पोटा आपुलिया आलों. ॥ १ ॥
आतां पुरले नवस, । निरसोनी गेली आस. ॥ २ ॥
जालों बरा बळी, । गेलों मरोनी ते काळीं. ॥ ३ ॥
दोहींकडे पाहे, । तुका आहे तैसा आहे. ॥ ४ ॥

## ५ पूर्णावस्था, कवित्वस्फूर्ति, व गुरूपदेश.
### ( शा. श. १५२०. )

मागील प्रकरणांत तुकारामबोवांचें अंतर्बाह्य स्वरूप पूर्णपणें बदलून ते मुमुक्षुस्थितींतून निसटून मुक्तस्थितींत आले, म्हणून लिहिलें. आतां यापुढील बोवांचें चरित्र म्हणजे त्यांची अस्सल महत्वाची कामगिरी होय. ज्या चरित्राच्या योगानें व उपदेशपर अधिकारप्रयुक्त अंभगवाणीनें ते महाराष्ट्रांत अजरामर होऊन राहिले आहेत, त्यांचा आरंभ या काळापासून होतो.

तुकारामबोवा भांडारडोंगरावर असतांना अवलाई त्यांच्याकरितां नेमानें शिदोरी घेऊन जात असे. एकदां ती नित्याप्रमाणें शिदोरी घेऊन जात असतां, तिच्या पायांत एक मोठा करवंदीचा कांटा रुतला. वेळ दुपारची, पोटांत भुकेनें कळवळलेलें, चालण्याचे श्रम झालेले, व पायांत आरपार कांटा बोंचलेला; अशा अवस्थेंत तिला मूर्च्छा आली व ती धाडकन जमिनीवर कोसळली. ती अशी पडली असतां एका वाटसराला आढळली; तेव्हां त्यानें तिच्या तोंडावर पाणीबिणी शिंपून तिला सावध केलें. नंतर कांहीं वेळानें ती पाणीभाकर घेऊन तुकारामबोवांकडे लंगडत लंगडत गेली व तिनें त्यांना सर्व हकीकत सांगितली. ती ऐकून

बोवा हळहळले व त्यांनीं याउप्पर गांवांतच राहण्याचा निश्चय केला. यापुढें त्यांनीं वनवास कधींही पत्करला नाहीं. त्यांनीं आपलें पुढील सर्व आयुष्य भगवद्भक्ति, साधुसेवा, कवित्व, व कथाकीर्तन, यांतच घालविलें.

तुकारामबोवा परत देहूस आल्यावर, त्यांनीं आतां स्वत: कीर्तन करण्यास आरंभ केला. यापूर्वी कोणी हरिदास आला असतां, त्याच्या कीर्तनाची तयारी करणें, त्याच्या मागें उभें राहून साथ करणें, ध्रुपद म्हणणें, भजन करणें, वगैरे कामें ते करीत असत. परंतु त्यांचा अधिकार, अनुभव, व आत्मतुष्टि, हीं जशीं वाढत चाललीं, तसतशी स्वत: कीर्तन करण्याची त्यांस अनावर इच्छा झाली. गीताकार भगवंतांनीं आपल्याला अवतार घेण्याचें केव्हां कारण पडतें, हें गीतेंत चवथ्या अध्यायांत नमूद केलें आहे. भगवान् म्हणतात:—

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥ ७
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ ८

तुकारामबोवांचेंही कीर्तनादिकांचा खटाटोप करण्याचें कारण अशाच प्रकारचें आहे:—

" धर्म रक्षावयासाठीं । करणें आटी आम्हांसी. ॥ १
वाचा बोलों वेदनीती, । करूं संतीं केलें तें. ॥ २
न वाणतां स्थिति अंगीं, । कर्म त्यागी लंड तो. ॥ ३
तुका म्हणे, अधम त्यासी । भक्ति दूषी हरीची. ॥ ४
आम्ही वैकुंठवासी । आलों याची कारणासी, ।
बोलिले जे ऋषी । साच भावें वर्ताया. ॥ १

झाडूं संतांचे मारग, । आडरानीं भरलें जग, ।
उच्छिष्टाचा भाग । शेष उरलें तें सेवूं. ॥ २
अर्थे लोपलीं पुराणें, । नाश केला शब्दज्ञानें, ।
विषयलोभी मनें । साधनें बुडविलीं. ॥ ३
पिटूं भक्तीचा डांगोरा, । कळिकाळासी दरारा, ।
तुका म्हणे, करा । 'जयजय'कार आनंदें. ॥ ४

संसारतप्तांचा ताप दूर करावा, चुकलेल्यांना मार्ग दाखवावा, विषयांध जनांचा रेंच उतरून त्यांना निष्काम कर्माकडे वळवावें, ज्याचा जसा अधिकार असेल त्याप्रमाणें त्याला नीतीचा उपदेश करून समाजांतील सर्व थरांचें संशोधन करावें, पाखंड मोडून सद्धर्माचा प्रसार करावा, दंभाचें बंड मोडून भक्तिमार्ग निष्कंटक चोखाळावा, एकंदरींत पूर्वीच्या संतजनांनीं जो मार्ग स्वीकारला, तोच पुढें चालवून लोकांची उन्नति साधावी, हा उदात्त हेतु आतां तुकारामबोवांच्या पुढें रात्रंदिवस ढळढळीत उभा होता. ते स्वतः अत्यंत स्थितप्रज्ञ कर्मातीत झाले होते. भगवंत गीतेंत म्हणतातः—

नं मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन ।
नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ॥

त्याप्रमाणेंच तुकारामबोवा म्हणतात, 'आम्हांला या जगांत कांहींच मिळवावयाचें राहिलें नाहीं. मोक्षाची तर आमच्या जवळ गांठोडीच बांधलेली आहे. धनद्रव्यादिकांची आम्हांला मुळींच पर्वा नाहीं. आम्ही तर अखंड सुखामध्यें निरंतर मग्न आहों. सुखदुःखांचीं वारीं आमच्या अंगावरून कितीही वाहात गेलीं, तरी तीं आम्हांस भासमानही होत नाहींत.'—

" काय उणें मज पांडुरंगापायीं , ।
रिद्धिसिद्धि ठायीं वोळगती. ॥ १
कोण पाहे सुखा नासिवंताकडे ? ।
तृष्णेचे बापुडे नव्हों आम्ही. ॥ २
स्वर्गसुखें आम्हीं केलीं पावटणीं, ।
पापपुण्यें दोन्ही उलंडलीं. ॥ ३
तुका म्हणे, घरीं आणिलें वैकुंठ, ।
वसविली पेठ वैष्णवांची. ॥ ४

परंतु आपल्याला जें लाभलें आहे, ज्यानें आपण अगदीं भरपूर भरून गेलों आहों, तें इतरांच्या भागाला आणण्याविषयीं खटपट करणें, ही परोपकाराची इच्छा त्यांच्या हृदयांत उत्पन्न झाली, आणि त्या कार्याप्रीत्यर्थच त्या 'उदार संतांनीं अनंत भांडारानें भरलेलें दुकान उघडलें व जें गिन्हाईक येईल त्याला सर्वथैव संतुष्ट करून सोडिलें. त्यांच्या भक्तिभावाचें व अस्खलित वाणीचें पोतें ईश्वरकृपेनें कधींही रितें पडलें नाहीं.' ते म्हणतातः—

" सेवितों हा रस, वांटितों आणिकां, ।
घ्या रे ! होऊं नका रानभरी. ॥ १
विटेवरी ज्याचीं पाउलें समान, ।
तोची एक दानशूर दाता. ॥ २
मनाचे संकल्प पाववील सिद्धी, ।
जरी राहे बुद्धी याचे पायीं. ॥ ३
तुका म्हणे, मज धाडिलें निरोपा, ।
मारग हा सोपा सुखरूप. " ॥ ४

इतकेंच नव्हे, तर पूर्वसंतांनीं सुरू केलेलें धर्मप्रसाराचें

व नित्युपदेशाचें कार्य जसें आम्ही पुढें चालवीत आहों, त्याप्रमाणेंच हें कार्य आपल्यामागें सतत चालू राहावें म्हणून शिष्यमेळा जमवावा, अशीही हौस तुकारामबोवांच्या हृदयांत उदय पावली. आपल्याला शिष्य कोणच्या तऱ्हेचे पाहिजेत, हेंही त्यांनीं एके ठिकाणीं सांगितलें आहे. बोवांच्या जवळ राहून मेवामिठाईवर ताव मारणारे व दंभाचा टेंभा पाजळून लोकांना भुरळ पाडणारे लड्डूनिरंजन चेले बोवांना नको होते. ते म्हणतातः—

**" कृपा करावी भगवंतें, । ऐसा शिष्य द्यावा मातें. ॥ १ ॥**
**माझें व्रत जो चालवी, । त्यासीं द्यावें त्वां पालवीं. ॥२॥**
**व्हावा ब्रह्मज्ञानी गुंडा, । तिहीं लोकीं ज्याचा झेंडा. ॥३॥**
**तुका, तुका, हांका मारी । माझ्या विठोबाच्या द्वारीं." ॥४**
**" देवा ! ऐसा शिष्य देईं । ब्रह्मज्ञानीं निपुण, पाहीं. ॥१॥**
**जो का भावाचा आगळा, । भक्तिप्रेमाचा पुतळा. ॥२॥**
**ऐशा युक्ति ज्याला बाणे, । तेथें वैराग्याचें ठाणें. ॥ ३ ॥**
**ऐसा झाला हो ! शरीरी, । तुका लिंबलोण करी. " ॥४॥**

यावरून निरिच्छ व कर्मातीत तुकारामबोवांचा शिष्यपरंपरा स्थापण्यांत व कीर्तनकाराचा पेशा घेण्यांत किती निर्मळ व उच्च हेतु होता, हें उघड होत आहे. अद्वैतबुद्धि मनांत बाणल्यामुळें, अज्ञ जनांची निकृष्ट व भ्रांत स्थिति पाहून कळवळल्यामुळें, व समाजाचें अंतरंग निर्मळ व उज्वळ करण्याचें महत्व हृदयाला पटल्यामुळें, विश्वकुटुंबी तुकारामबोवा या खटपटीस लागले.

**" देवाच्या संबंधें विश्वची सोयरें, ।**
**सूत्र ओढे दोरें एका एक. ॥ १ ॥**

आहाच हें नव्हे विटायासारखें, ।
जीव जीवनीं देखे समावलें. ॥ २ ॥
आणिकांचें सुख दुःख उमटे अंतरीं, ।
एथील इतरीं तेणें न्यायें. ॥ ३ ॥
तुका म्हणे, ठसावलें शुद्ध जाती, ।
शोभाची पुढतीं विशेषता. " ॥ ४ ॥

अशा प्रकारें विश्वकुटुंबवृत्तीचा चेव अंतःकरणांत येऊन, तुकारामबोवांनीं कीर्तनाचा तडाखा सुरू केला, व शिष्यमंडळ जमवून भजनाचा फड तयार केला. बोवा आपल्या शिष्यमंडळाजवळून कोणतीही सेवा घेत नसत. आपल्या सेवेकरितां, स्वतःचें देव्हारें माजविण्याकरितां, स्वतःचा लौकिक वाढविण्याकरितां, किंवा भोळ्याबापड्यांस फसवून आपल्या पोटाची चैनचंगळ उडविण्याकरितां, शिष्य गोळा करावयाचे, अशी क्षुद्र व नीच बुद्धि तुकारामबोवांच्या सात्विक व शुद्ध मनाला क्षणमात्रही शिवली नाहीं. त्यांनीं या बुद्धीचा उघडपणें निषेध करून, अशा बुद्धीनें शिष्यपरिवार बरोबर बाळगणाऱ्या अधम गुरूंचा स्पष्ट धिक्कार केला आहे. बोवा म्हणतातः—

" शिष्याची जो नेघे सेवा, । मानीं देवासारिखें. ॥ १ ॥
त्याचा फळे उपदेश, । आणिकां दोष उफराटे. ॥ २ ॥
त्याचें खरें ब्रह्मज्ञान, । उदासीन देहभावीं. ॥ ३ ॥
तुका म्हणे, सत्य सांगें, । योत रागें, येती ते. ॥ ४ ॥
" शिष्या सांगे उपदेश, । गुरुपूजा हे विशेष. ॥ १ ॥
दावी आचार, सोवळें, । दंड, कमंडलु, माळे. ॥ २ ॥
छाटी भगवी मानसीं, । व्यर्थ म्हणवी संन्यासी. ॥ ३ ॥
तुका म्हणे, लोभ । न सुटे, नाहीं लाभ. " ॥ ४ ॥

तुकारामबोवांनीं ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, इत्यादि पूर्वकालीन संतकर्त्यांचीं प्रेमभक्तिभावानें ओथंबलेलीं पदें, अभंग व ओंव्या, हीं असंख्य पाठ केलीं होतीं, व त्यांना त्यांचीं चरित्रें व आख्यायिका हींही अवगत होतीं. त्यांत बोवांच्या जातीच्या अनुभवाची, भक्तीची, व कळकळीची भर पडली. त्यांची वाणी रसाळ व जोरदार; वृत्ति निःस्पृह व भाविक; आचरण सरळ व निर्मळ; मूर्ति केवळ भक्तीची व प्रेमाची मूसच. मग श्रीहर्षदेवाप्रमाणें,

"वस्त्वैकैकमपीह वांच्छितफलप्राप्तेः पदं किं पुन-
र्मद्भाग्योपचयादयं समुदितः सर्वो गुणानां गणः" ।

असे समाधानाचे व अभिमानाचे उद्गार त्यांनीं काढले, तर त्यांत आश्चर्य वाटण्याचें काय कारण आहे? बोवांचें कीर्तन प्रेमरसानें थबथबलेलें असे. विषयप्रतिपादन सर्व उघडपणें सरळ प्राकृत ग्रंथांच्या आधारें चालावयाचें, लोकांना प्रिय झालेल्या संतचरित्रांतील दृष्टांत घ्यावयाचे, मग त्यांच्या कीर्तनाला विलक्षण रंग चढून श्रोत्यांच्या उड्या पडल्या, तर त्यांत मुळींच नवल नाहीं. यामुळें बोवांची कीर्ति सर्वांमुखीं होऊं लागली व त्यांच्या भक्तांची संख्या वाढत चालली. परंतु बोवांची निःस्पृह, निराश, व विरक्त वृत्ति तिळमात्रही ढळली नाहीं. कीर्तनकार आशावियुक्त नसेल, तर त्याचें कधींही तेज पडणार नाहीं व त्याचा उपदेश फिका पडल्यावांचून राहणार नाहीं, हें ते पूर्ण जाणत होते. ते म्हणतातः—

आशाबद्ध वक्ता, । धाक श्रोतयाच्या चित्ता. ॥ १ ॥
वायां गेलें तें भजन, । उभयतां लोभी मन. ॥ २ ॥

बहिरे मुके एके ठायीं, । तैसें जालें तयां दोहीं. ॥ ३ ॥
माप तैसी गोणी, । तुका म्हणे, रितीं दोन्ही." ॥ ४ ॥

बोवांनीं कीर्तनाच्या विक्रयाचा ठिकठिकाणीं फार आवेशानें निषेध केलेला आहे. पोट जाळण्याकरितां ईश्वरी चरित्राचीं दशावतारी नाटकें करणारे नाटकी आणि लोकांना रिझवून पैसे उकळण्यासाठीं भक्तिप्रेमाचें अवडंबर घालून कथा करणारे कथेकरी, या दोघांची किंमत बोवा सारखीच लेखीत:—

"पोटाचे ते नट, पाहों नये छंद, ।
विषयाचे भेद विषयरूप. ॥ १ ॥
अर्थी परमार्थ कैसा घडों शके ? ।
चित्त लोभी भिके, सोंग वायां. ॥ २ ॥
देवाचीं चरित्रें दाखवी तीं लीळा, ।
लाघवाच्या कळा मोहवाया. ॥ ३ ॥
तुका म्हणे, चित्तीं राहे अभिलाष, ।
दोघां नरकवास सारिखाची." ॥ ४ ॥

म्हणून तुकारामबोवा देवाजवळ नेहमीं मागणें मागत असत कीं:—

"मोल घेऊनियां कथा जरी करीं, ।
तरी भंगो हरी ! देह माझा. ॥ १ ॥
'माझी कथा करा,' ऐसें म्हणें कोणा, ।
तरी नारायणा! जिव्हा झडो. ॥ २ ॥
साह्य तूं झालासी, काय उणें तूपें ? ।
आणिक भूतांपें काय मागों ? ॥ ३ ॥
तुका म्हणे, सर्व सिद्धि तुझे पायीं, ।
तूं माझा गोंसायी, पांडुरंगा ! ॥ ४ ॥

वरील सर्व गोष्टी लक्ष्यांत घेतल्या म्हणजे मोरोपंतांनीं

बोवांविषयीं जे पुढील उद्गार काढले आहेत, त्यांचें सार्थत्व तत्काळ मनाला पटतें:—

'भक्तिरसाचि मूर्त,' असा
करिति बृहस्पति शतक्रतु *कयास, ।
कीं वाटे भगवद्यश
सुरभीपय, अमृत तक्र, तुकयास. ॥
विमद, विराग, विमत्सर,
तृप्ति, सदा सुगुण हे तुकारामीं, ।
ते कैंचे स्वर्गींच्या
विविधविषयलाभहेतुकारामीं ? ॥

यावेळीं सिद्ध पुरुषांचीं सर्व लक्षणें तुकारामबोवांच्या अंगीं मुरून, ते भूतमात्राविषयीं किती समचित्त झाले होते, याविषयीं दोनतीन चमत्कारिक आख्यायिका आहेत, त्या येथें नमूद करितों:—

(अ) एकदां पितरांची श्राद्धतिथि असल्यामुळें तुकारामबोवांनीं कोणाएका कुणब्याकडून कांहीं गव्हाच्या पेंढ्या घेतल्या. वाटेनें येत असतां त्यांचा मधमाशांच्या मोहोळास ढका लागला. त्याबरोबर माशा चवताळून तुकारामबोवांच्या अंगावर येऊन पडल्या व मांस तोडूं लागल्या; परंतु तुकारामबोवांनीं त्यांस हांकालिलें नाहीं. उलट,

"†मग अंगावरील वस्त्र टाकून, ।
तेंथें उभा राहिला आपण, ।
म्हणे, 'माझ्या विठोबालागून ।

---

* तर्क, होरा. † केशवचैतन्यकथातरु.

दु:ख जालें मजयोगें.' ॥
नखशिखांत माशा बैसून, ।
तोडित्या जाल्या तुकयालागून,।
परी तितुकें केलें सहन, ।
हिंसा न व्हावी याकरितां." ॥

(आ) तुकारामबोवांनीं आपल्या सरळ वृत्तीनें आडदांड, रागीट पशूलाही वळणीस आणल्यासंबंधानें पुढील आख्यायिका आहे:—

मार्गीं जातां मेंढवाड्यांत, । धनगराचा कुत्रा भुंकत ।
आला तुकयावरी चवताळत । चावाया कारणें. ॥
त्यासी तुकया बोले उत्तर,। 'तुम्ही कशासी करितां गुरगुर ?
येथें कांहीं नसतां गुरगुर.' । मग तो मुकाट्या राहिला. ॥
इतुकें सरळ अंतःकरण, । जें पशूकडून धरविलें मौन, ।
'सर्वीं वासुदेव,' हें भावन । दृढ असे जयाचें. ॥

बहुधा याच प्रसंगाला उद्देशून मोरोपंत लिहितात:—

केलाचि गुरु तुकोबा, जरि अशुचि पशू, तथापि शुनकानें. ।
अधम म्हणे बद्धमना परिसुनि 'न' अशा कथा पिशुन कानें. ॥

(इ) एकदां कांहीं पक्षी दाणे टिपीत असतां, त्यांच्या अंगावरून तुकारामबोवा जात होते. तेव्हां त्यांना भिऊन पक्षी भुरकन उडून गेले, तें पाहून बोवांना फार वाईट वाटलें. 'मला पाहून पक्ष्यांना भय वाटतें, तरी माझ्या अंगीं अद्याप खरें समत्व ठसलें नाहीं,' असें त्यांच्या मनानें घेतलें; व 'पुन्हां पक्षी निर्भयपणें माझ्याजवळ व माझ्या अंगावर येऊन बसतपर्यंत येथून हालावयाचें नाहीं,'

असा त्यांनीं निश्चय केला. मग तुकारामबोवा तेथें इतके निश्चळ होऊन बसले कीं, कांहीं वेळानें ते आसपास उडून गेलेले पक्षी त्यांच्याजवळ आले व अखेर निर्धास्तपणें त्यांच्या अंगावरही वावरूं लागले !

पहिल्या आख्यायिकेंतील भूतदया व सहनशीलता, सामान्य जनांच्या दृष्टीनें योग्य मर्यादेच्या बाहेर—अतिरेकाला—गेली आहे, असें वाटणें साहजिक आहे. परंतु आम्हां सांसारिकांची दृष्टि या अलौकिक व्यक्तीच्या अलौकिक कृत्याचें यथातथ्य परीक्षण करण्याला खरोखरच नालायक आहे. ईश्वरनिर्मित सृष्टीमध्यें जी कठोरता व विषमता वारंवार नजरेस येते, त्याबद्दल सामान्य पामरानें ईश्वराला दोष लावणें जितकें अनुचित धाडस होईल, तितकेंच अनुचित धाडस, वरील अलौकिक गोष्टी लक्ष्यांत घेऊन, बोवांसारख्या महंताच्या पदरीं वेडेपणाचें माप टाकणें, हें होईल. बोवा खरोखरीच जीवन्मुक्त स्थितींत—विदेहावस्थेंत—गेलेले होते; आणि आम्ही तर सर्वस्वीं देहधर्मानें बुजबुजलेले व विषयबंधनांनीं जखडलेले आहों. वीर्यबलानें मुसमुसलेले स्वतंत्रताभक्त हातावर शिर घेऊन, दंड ठोकून, समरांगणावर निर्भयपणें वावरण्याचें साहस करण्याच्या फंदांत कां पडतात, हें, हातांत बांगड्या भरून कडेकोट बंदोबस्ताच्या घरांत स्वस्थपणें अन्नाचा फन्ना उडवीत पडलेल्या प्राण्यास बरोबर कळणें खास शक्य नाहीं. तेव्हां मधमाशांकडून चावून घेण्यामध्येंच तुकारामबोवांना सुखसमाधान कां वाटलें, हें देहाभिमानानें ताठलेल्या जनांस समजणें व समजावून देणेंही शक्य नाहीं, असें वाटतें.

तुकारामबोवांची एक मोठी इच्छा होती, ती शेवटच्या आख्यायिकेंत पूर्ण झाली आहे. ती इच्छा हीच कीं:—

"अवघी भूतें आलीं साम्या । देखिलीं म्यां कैं होतीं?॥१॥
विश्वास तो खरा मग । पांडुरंगकृपेचा. ॥ २ ॥
माझी कोणी न धरो शंका, । हो कां लोकां निर्द्वंद्व. ॥३॥
तुका म्हणे, जें जें भेटे, । तें तें वाटे मीऐसें. ॥ ४ ॥

असो. मागें तुकारामबोवांनीं विश्वोद्धारासाठीं कीर्तनाचा क्रम आदरिला म्हणून सांगितलेंच. या क्रमानें पूर्वसंतांच्या कृतीनें वाचन, मनन, व कथन, हीं अस्खलित चालू राहिलीं. यामुळें आस्ते आस्ते आपण स्वतः भगवत्प्रीत्यर्थ व प्राकृत-जनार्थ कवित्व करावें, अशी प्रबळ इच्छा बोवांच्या अंतःकरणांत उद्भवली. या हेतूचा ध्यास लागला असतां, बोवांना एक दिवस स्वप्नांत दृष्टांत झाला, तो असा:—

" नामदेवें केलें स्वप्नामाजीं जागें, ।
सवें पांडुरंगें येऊनियां. ॥ १ ॥
सांगितलें काम, 'करावें कवित, ।
वाउगें निमित्त बोलूं नको.' ॥ २ ॥
माप टाकी, सळ धरिली विठ्ठलें, ।
थापटोनी केलें सावधान. ॥ ३ ॥
प्रमाणाची संख्या सांगे शत कोटी, ।
उरले ते शेवटीं लावी तुका. " ॥ ४ ॥

या *अभंगावरून असें अनुमान काढावयाचें नाहीं, की

---

* तुकारामतात्या पडवळ यांच्या नामदेवी गाथेंत या अभंगाच्या पहिल्या, चरणाचा असा पाठ आहे:—'नामयासी केलें स्वप्नामाजीं जागें.' । हा पाठ खरा धरल्यास या अभंगांत तुकारामबोवांनीं स्वतःस झालेला

तुकारामबोवा यापूर्वीं मुळींच कवित्त करीत नव्हते. ते थोडी-बहुत रचना यापूर्वींच करीत, पण त्यांच्या रचनेला ही एक-प्रकारची श्रेष्ठ अधिकाऱ्यांकडून मंजूरीच मिळाली व या ईश्वरी-प्रसादानें त्यांच्या काव्यस्फूर्तीला फारच भरतें आलें. या प्रसंगापासून आपल्याला त्यांनीं सर्वस्वीं अभंगरचनेला वाहून घेतलें. नामदेव व त्यांच्या कुटुंबांतील माणसें यांनीं *शंभर कोटी अभंग रचण्याची प्रतिज्ञा केली होती; परंतु ही प्रतिज्ञा पूर्णपणें तडीस गेली नाहीं. नामदेवांनीं आपल्या सर्व कुटुंबाच्या साहाय्यानें सुमारें † चौऱ्याण्णव कोटी एकुणऐशीं लक्ष

---

ईश्वरी साक्षात्कार वर्णिलेला नसून, नामदेवांस झालेला स्वप्नदृष्टांत सांगितला, आहे असें म्हणावें लागतें.

* वाल्मीकीनें शतकोटी रामायण रचिलें, ही गोष्ट कानीं पडल्यावर नामदेवांना अशी प्रबळ इच्छा उत्पन्न झाली कीं, आपणही शंभर कोटी अभंग रचावे. या हेतूनें त्यांनीं भगवत्प्रसाद मिळविला व उद्दिष्ट संख्येची भर करण्याचा त्यांनीं आपल्या कुटुंबांतील सर्व माणसांच्या मदतीनें रचनेला सुरवात केली. ( नामदेवाची गाथा, अभंग ७८७, ७८८. )

† ही संख्या ‘ पिता दामाशेटी अभंग दोन कोटी ’ या नामदेवी अभंगांतून घेतली. आहे. तुकारामबोवांनीं नामदेवाच्या अभंगांची संख्या अशी दिली आहे:-

“ नामयानें संकल्प केला शत कोटी, । पूर्णता शेवटीं कैसी आली ? ।१।
साठ लक्ष आणि चौऱ्याण्णव कोटी, । लिखित शेवटीं नव लक्ष. ॥ २ ॥
.........................................................
अनंतभटें केला लेख । श्रीमुख देख नारायण ॥ ११ ॥
तुका म्हणे ऐसी निवड केली निकी, । राहिली ती बाकी शेष पुढें ।१२।

म्हणजे नामदेवांनीं दिलेली संख्या व तुकारामबोवांनीं दिलेली संख्या

अभंग रचिले. म्हणजे शंभर कोटी बेरीज फलित होण्याला पांच कोटी एकवीस लक्ष इतकी तूट आली. ही तूट भरून काढून नामदेवांची प्रतिज्ञा पूर्ण करण्याविषयीं बोवांना स्वप्नांत अनुज्ञा झाली व बोवांनींही तें काम मोठ्या उत्साहानें अंगीकारिलें. यापुढें अभंगांची अमुक एक संख्या पुरी करावयाची, असा पाठीशीं घोषा असल्यामुळें व काव्यस्फूर्तीला आणि काव्यरचनेला त्यांना मुळींच अवकाश लागत नसल्यामुळें, बोवांनीं अभंगाचा केवळ पाऊसच पाडला! मग केवळ कीर्तनप्रसंगीं प्रतिपादनाच्या भरांत ते तेथल्या तेथें अभंगरचना करीत असत; असेंच नव्हे, तर उठल्याबसल्या साधारण नेहमींचें बोलणेंही त्यांचें अंभगांत चाले. म्हणून मोरोपंत म्हणतात कीं:—

**प्रभु आपण शतमखसा, सदभंग प्रकट जो करी घनसे,।**
**नाचति मयूरसे हरिभक्त, म्हणे ज्यांत शोक 'रीघ नसे.' ॥**

अशा रीतीनें बोवांनीं किती अभंगांची भरती केली, याविषयीं एका तुकारामभक्तानें पुढीलप्रमाणें हिशेब दिला आहे:—

**" वेदाचे अभंग केले श्रुतिपर, ।**
**द्वादश सहस्र संहितेचे. ॥ १ ॥**

---

यांत १० लक्षांचा फरक आहे. महीपतिबोवांनीं भक्तविजयाच्या ९ व्या अध्यायांत याहून निराळी संख्या दिली आहे:—

चाळीस लक्ष चौऱ्याण्णव कोटी। नवलक्ष लिखित आलें शेवटीं,
मग नामदेव आला वैकुंठीं। स्वकीय इच्छेंकरूनिया. ॥ ३९ ॥
एकावन्न लक्ष पांच कोटी, जाणें, । शेष राहिलें याचें बोलणें, ।
तें तूं वदें प्रसादवचनें, । सप्रेम जीवन मी देतों. ॥ ४० ॥

ही संख्या, वर मूळ निबंधांत दिलेल्या संख्येशीं ताडून पाहिली तर ३० लक्षांची तफावत येते. तरी पण तीन्ही ठिकाणीं कोटिसंख्येंत भेद नाहीं, हें लक्ष्यांत घेण्यासारखें आहे.

निरुक्त, निघंट, आणि ब्रह्मसूत्र, ।
अवांतर सहस्र उपग्रंथ. ॥ २ ॥
अभंग ते कोटी भक्तिपर केले, ।
ज्ञानपर केले तितुकेची. ॥ ३ ॥
पंचाहत्तर लक्ष वैराग्य वर्णिलें, ।
नाम तें गाइलें तितुकेंची. ॥ ४ ॥
साठी लक्ष केला बोधक जनासी, ।
वर्णिलें रूपासी तितुकेंची. ॥ ५ ॥
द्वादश सहस्र आत्मबोध केला, ।
अनुभव घेतला एक कोटी. ॥ ६ ॥
चौतीस सहस्र लक्ष कोटी पांच ।
सांगोनिया साच तुका गेला.'' ॥ ७ ॥

या अभंगाच्या शेवटीं तुकारामबोवांनीं पांच कोटी, एक लक्ष, चौतिस हजार, अभंग केले असें म्हटलें आहे. परंतु प्रत्येक चरणांतील संख्या घेऊन त्यांची बेरीज घेतली, तर ती पांच कोटी, सत्तर लक्ष, पसतीस हजार, एवढी भरते. याप्रमाणें या हिशेबांत विरोध व असंबद्धता येते. शिवाय येथील कोणतीही बेरीज खरी धरिली, तरी ती नामदेवांच्या बाकीशीं जुळत नाहीं; तरी पण कोटिसंख्या पांच, ही मात्र सर्वत्र सारखी आहे. परंतु तुकारामबोवांनीं नामदेवांच्या बाकीचा निकाल करण्यापुरतेच अभंग रचले, जास्तीकमी नाहींत, असें म्हणण्याला आधार नाहीं. उलट तुकाराबोवांच्या हातून नामदेवांच्या संख्येंतील बाकी पूर्णपणें भरली गेली नाहीं, असें म्हणण्याला थोडासा आधार आहे. कारण रहिमतपूर येथें ब्राह्मणकुळांत जन्मलेला तुकाराम नांवाचा एक भगवद्भक्त होऊन

गेला. याचे वंशज हल्लीं सातारा प्रांतांत बोरबन गांवीं राहा-तात, असें समजतें. ते अशी आख्यायिका सांगतात कीं, तुकाराम-बोवांचे अपुरे राहिलेले सवा लक्ष अभंग पुरे करण्यासाठीं, त्यांनींच ब्राह्मणकुळांत हा पुन्हां अवतार धारण केला होता. तुकारामबो-वांच्या अभंगांशीं आपल्या अभंगांचा घोंटाळा होऊं नये, म्हणून हा ब्राह्मण तुकाराम 'तुकाविप्र' असें नांव आपल्या अभंगांत घालतो. एकंदरींत तुकारामबोवांनीं स्वतां किती अभंग केले हा वाद घोटाळ्याचा आहे, व त्या प्रमाणेंच तो पोकळही आहे; कारण वाद असा आहे कीं, तुकारामबोवांनीं पांच कोटी आणि किती लक्ष अभंग केले; पण आजपर्यंत तुकारामबोवांच्या देहूगांवीं व इतर ठिकाणीं शोध करून आढळलेल्या अभंगांची संख्या साडे चार हजारांच्याही वर गेलेली नाहीं! ज्यांचा अंतकाळ होऊन आज पुरीं तीनशेंही वर्षें झालीं नाहींत, ज्यांची ऐन भरभराट महा-राष्ट्राच्या उदयोन्मुख काळांत होऊन जे, आबालवृद्ध व आचां-डाळब्राह्मण, अशा सर्वांना अत्यंत प्रिय व पूज्य ठरले, ज्यांची शिष्यपरंपरा व भक्तपरंपरा अव्याहत चालत आहे, ज्यांच्या कृतीवांचून कीर्तनकारांचें व भजनकारांचें पाऊलही हालत नाहीं, ज्यांच्या पवित्र नांवाचा घोष करीत जातिभेदादि विसरून लाखों भाविक वारकरी भक्तिप्रेमांत तल्लीन झालेले चंद्रभागेच्या वाळवंटीं प्रतिवर्षीं दृष्टीस पडतात, त्या तुका-रामबोवांच्या पांच कोटी व सत्तर लक्ष अभंगांपैकीं पांच कोटी एकूण सत्तर लक्ष आणि शहाण्णव हजार अभंग अगदींच लुप्त होऊन जावे, ही गोष्ट आम्हांला तरी संभवनीय कोटीं-तील दिसत नाहीं. आपल्या संतगुरूंच्या कृतीविषयीं व ग्रंथां-विषयीं लिहितांना, शक्याशक्यतेचा विचार न करितांना स्वतःच

अतिशयोक्ति करण्याकडे किंवा इतरांनीं केलेली अतिशयोक्ति सत्य मानण्याकडे बऱ्याच भाविक चेल्यांचा कल दिसून येतो. नामदेवांनीं चौपन्न कोटी अभंग रचिले, ही गोष्ट याच कोटींतील आहे. रामदासस्वामींच्या प्रसादानें व आज्ञेनें वामनपंडितांनीं यथार्थदीपिकादि यमकप्रचुर बारा लक्ष ग्रंथ लिहिला अशी भोळसट असत्य गोष्ट हनुमंतस्वामी रामदासींनीं आपल्या रामदासस्वामींच्या बखरींत मोठ्या दिमाखानें लिहून आपल्या आद्य गुरूविषयीं पूज्यभाव व्यक्त केला आहे! दासोपंतांच्या सवा लाख पदांविषयींही विश्वासार्ह प्रमाण अद्याप पुढें आलेलें नाहीं. एकंदरींत, तुकारामबोवांची अभंग प्रसविण्याची शक्ति जरी अलौकिक होती, तरी त्यांच्या हातून पावणे सहा कोटी अभंगांची रचना झाली होती, ही गोष्ट खरी मानण्यापुरता भरंवशीक पुरावा अद्याप उपलब्ध नाहीं, असेंच म्हणणें प्राप्त आहे.

तुकारामबोवांना स्वप्नांत दृष्टांत होऊन ते काव्यरचना करूं लागल्यावर त्यांना गुरूपदेश झाला असें सामान्यतः मानण्यांत येतें. परंतु बोवांनीं संतमेळ्याला आपलें जें त्रोटक चरित्र निवेदन केलें आहे, त्यांत ते स्पष्ट म्हणतात कीं:—

“ मानियेला स्वामी गुरूचा उपदेश, ।
धरिला विश्वास दृढ नामीं. ॥ १४ ॥
यावरी या जाली कवित्वाची स्फूर्ती, ।
पाय धरिले चित्तीं विठोबाचे.” ॥ १५ ॥

बोवांना गुरूपदेशाचा साक्षात्कार कसा झाला, हें पुढील अभंगांत सांगितलें आहे:—

“ सद्गुरुरायें कृपा मज केली, ।
परी नाहीं घडली सेवा कांहीं. ॥ १ ॥
सांपडविलें वाटे जातां गंगास्नाना, ।
मस्तकीं तो जाणा ठेविला कर. ॥ २ ॥
भोजना मागती तूप पाव शेर, ।
पडिला विसर स्वप्नामाजी. ॥ ३ ॥
कांहीं कळे उपजला अंतराय, ।
म्हणोनिया काय त्वरा जाली ? ॥ ४ ॥
राघवचैतन्य, केशवचैतन्य, ।
सांगितली खूण माळिकेची. ॥ ५ ॥
‘ बाबाजी ’ आपुलें सांगितलें नाम, ।
मंत्र दिला ‘ राम, कृष्ण, हरी ’. ॥ ६ ॥
माघ शुद्ध दशमी पाहूनी गुरुवार, ।
केला अंगीकार, तुका म्हणे. ” ॥ ७ ॥

हा गुरूपदेशाचा काळ शके १५२०, विलंबनामसंवत्सर, माघ शु. १० गुरुवार, असला पाहिजे, हें मागें प्रस्तुत निबंधाच्या दुसऱ्या भागांत महीपतींच्या अभंगाच्या आधारें सिद्ध केलेंच आहे. तुकारामबोवांना नामसंकीर्तनाची स्वभावतः फारच आवड होती व केशवचैतन्यांनीं तदनुरूपच मंत्र आपल्याला उपदेशिला म्हणून बोवांना अति आनंद व समाधान झालें व नामसंकीर्तनाचा प्रेमा फारच दृढावला. ते म्हणतातः—

“ माझिया मनींचा जाणोनिया भाव, ।
तो करी उपाव गुरुराजा. ॥ १ ॥
आवडीचा मंत्र सांगितला सोपा, ।
जेणें नव्हे गुंफा कांहीं कोठें. ॥ २ ॥

जाती पुढें एक उतरले पार ।
हा भवसागर साधुसंत. ॥ ३ ॥
जाणत्या नेणत्या ज्या जैशी आवडी ।
उतार, सांगडी, ताफे, पेटी. ॥ ४ ॥
तुका म्हणे, मज दाावियेला तारू ।
कृपेचा सागरू पांडुरंग. ॥ ५ ॥

---

## ६. कठिण कसोटी.

(शके १५२०–१५७१.)

तुकारामबोवा कीर्तन व कवित करावयास लागल्या काळापासून त्यांचा लौकिक दाहीं दिशा वेगानें फैलावूं लागला. त्यांच्या अधिकारप्रयुक्त प्रासादिक वाणीचा व विरक्त पण प्रेमळ वृत्तीचा लोकांच्या मनावर उत्तम संस्कार होऊन त्यांचा भक्तवर्ग झपाट्यानें वाढूं लागला. त्यांचा उपदेश हृदयाला भिनून जात असल्यामुळें समाजाचीं मनें त्यांच्याकडे वळून त्यांत लीन होऊं लागलीं. सामाजिक व धार्मिक बाबतींतही जातिभेदाचें पर्यवसान दुराग्रहांत, अहंमन्यतेंत, व परजातिद्वेषांत, होत असलेलें पाहून, त्यांनीं या अनिष्ट स्थितीवर व कृत्रिम भेदावर मोठ्या आवेशानें मोहीम चालविली. धनलोभ पुरविण्यासाठीं दंभाचार दाखविणाऱ्या क्षौरी सोद्यांवर व बोकेसंन्यास्यांवर फटाफट फटकारे ओढण्याचा त्यांनीं उपक्रम केला. गुणांकडे लक्ष्य न देतां केवळ जन्मजातीस्तव इतरांचा उपमर्द करणाऱ्या गर्वाढ्य उच्चवर्णीयांवर त्यांनीं कडाका उडवून दिला. वर्णांचा उच्चनीचभाव तुकारामबोवांना मान्य होता.

जातिभेदाची मर्यादाही सामान्यतः उल्लंघणें त्यांना इष्ट वाटत नव्हतें. शास्त्रोक्त मर्यादा प्रत्येकानें पाळावी, असें ते कळकळीनें सांगत, असें मागें उल्लिखित केलेंच आहे; परंतु हे सर्व व्यावहारिक भेद आहेत. या भेदांचा उपयोग सद्गुणांना चिरडण्याकडे व्हावा, हें बोवांना खपत नसे. शिवाय भागवतधर्माच्या परिष्कारांत या भेदांचा मुळींच प्रवेश होत नाहीं, असें बोवांचें ठाम मत होतें. सहस्ररश्मीच्या प्रचंड प्रभेपुढें धुक्याचा पसारा जसा तत्काळ लोपून जातो, त्या प्रमाणेंच जिव्हाळ्याच्या निर्मळ भगवद्भक्तीपुढें व विश्वबंधुत्वापुढें या भेदाचाही पसारा लटपटून जातो, असें बोवा समजत. पृथ्वीवर गगनचुंबी पर्वत आहे व भूमीचें उदर विदारणाऱ्या खोलच खोल दऱ्या आहेत; परंतु पृथ्वीचें विशाल परिमाण लक्षांत घेतलें, म्हणजे हा उच्चनीच भाव विलयाला जाऊन, तारतम्यदृष्टीनें पृथ्वी नारिंगाप्रमाणेंच सारखी व वाटोळी ठरते. असाच प्रकार समाजांतील भेदभावांचा आहे. जोंवर दृष्टि संकुचित व द्वैतात्मक आहे, तोंवर ती या भेदभावांवरच रोंखून राहते, व अनंत विश्वाची समग्रतः कल्पना तिला होत नाहीं. ही कल्पना बरोबर उतरण्याला व विश्वबंधुत्वाचा पूर्ण प्रत्यय होण्याला 'अवघीं भूतें आलीं साम्या' एथपर्यंत मजल येऊन ठेपली पाहिजे, व तुकारामबोवांची मजल एथवर येऊन ठेपली होती. अर्थात् त्यांनीं निःस्पृहपणानें व स्पष्टवक्तेपणानें योग्य तो मार्ग जनांस दाखविण्याचा कीर्तनद्वारा व अभंगद्वारा तडाखा सुरू केला. पण याच्या योगानें त्यांना नवीन शत्रु उत्पन्न झाले व त्यांनीं बोवांचें सत्व भयंकर कठीण कसोटीस लाविलें. परंतु

याही कसोटीला बोवा उत्तम प्रकारें टिकले. तुकारामबोवांचा असा निर्धारच झाला होता कीं, ईश्वरानें आपल्याकडे उपदेशाची कामगिरी सोंपविली आहे व त्याच्यावर पूर्ण विश्वास ठेवून विघ्नांना न जुमानतां ती कामगिरी पार पाडण्यास झटणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे. ते म्हणतातः—

" मनाचे संकल्प पाववील सिद्धी, ।
जरी राहे बुद्धी याचे [ पांडुरंगाचे ] पायीं. ॥ ३ ॥
तुका म्हणे, मज धाडिला निरोपा, ।
मारग हा सोपा सुखरूप." ॥ ४ ॥

तुकारामबोवांचा आतां जो छळ करण्यांत आला त्याचें कारण, आणि ते मुमुक्षुस्थितींत असतांना त्यांची जी अवहेलना करण्यांत आली होती तिचें कारण, यांत पुष्कळ अंतर होतें. तुकारामबोवा पूर्ण स्थितीला येऊन संतांच्या व सिद्ध पुरुषांच्या पायरीला पोंचतपर्यंत त्यांचा जो छळ झाला, त्याच्या मूळाशीं थट्टा, वात्रटपणा, उच्छृंखळपणा, व आपस्वार्थीपणा, हे हेतु होते. लोक बोवांना त्या वेळीं वेडा—पिसाट—समजत. त्यांच्यांत कांहीं विलक्षण प्रभाव कालांतरानें परिपाकस्थितींत यावयाचा आहे असें कोणालाही वाटलें नव्हतें. कोणी त्यांना चेष्टेनें मारी, कोणी धिंड काढी, कोणी वेठीला धरी, कोणी त्यांच्या गळ्यांत तेलाचे नळे बांधून त्यांना तेल आणण्याला धाडी. बोवा म्हणजे एक निरुपद्रवी, भावडा, वेडा, भ्रमिष्ट, प्राणी आहे, अशीच त्या वेळीं सर्वांची कल्पना होती. परंतु आतां ती स्थिति सर्वस्वीं मावळून, बोवांची किंमत समाजाच्या लक्षांत येऊं लागली होती, व शेंकडों लोक त्यांना गुरुस्थानीं मानूं लागले होते. त्यांचा उपदेश,

कीर्तन, व भजन, ऐकण्याला हजारों लोक जमत व कृतार्थ होऊन जात. ढोंगाची उवडीक बोवांच्या हातून वारंवार होत असे, व ते निरंतर भक्तीचें, प्रेमाचें, व सद्गुणाचें, गौरव करीत. या त्यांच्या कृत्यानें त्यांना आतां नवीनच रिपु उत्पन्न झाले. पांडित्यप्रौढीनें ताठलेले पंडित, निष्फळ वाचाळता करणारे शब्दज्ञानी, ब्रह्मघोंटाळ्यांत गुरफटलेले वेदांती, जातिश्रेष्ठत्वानें तट्ट झालेले वेदाधिकारी, व स्वामित्वाचें देव्हारें माजवून धन उकळणारे गोस्वामी, इत्यादिकांना आतां तुकारामबोवांविषयीं वैषम्य वाटूं लागलें व त्यांपैकीं कित्येकांनीं त्यांचा पाठपुरावा करण्याचें मनावर घेतलें.

"वरदराज मुकुंद तुकाभिधो
वणिगतिप्रथितः स्तवनैस्तव ।
सकलसाधुमनःपरितोषकृत्
कविवरो विवरोज्झितशुद्धवाक्" ॥ ९ ॥

—मोरोपंतकृत पाडुरंगस्तोत्र.

या श्लोकांत पंतांनीं म्हटल्याप्रमाणें केवळ भागतधर्ममार्गानेंच तुकारामबोवा लौकिक संपादून सर्ववंद्य झाल्यामुळें वरच्यासारख्या मंडळींच्या रोषाला ते सहजच प्राप्त झाले.

प्रथमतः चिंचवडचे चिंतामणी देव यांनीं तुकारामबोवांत सत्य किती आहे हें पाहण्यासाठीं, व ते ढोंगी ठरल्यास त्यांचा दंभस्फोट करण्यासाठीं, बोवांना चिंचवडास भोजनास बोलाविलें. भोजनास बसण्याची तयारी झाल्यावर देवांनीं बोवांना सांगितलें कीं, तुम्हीं आपली इष्ट देवता आमंत्रून पात्रांत भोजन करण्यासाठीं आणावी. तेव्हां बोवा म्हणाले कीं, 'महाराज, आपण ब्राह्मण आहां, आम्ही पडलों शूद्र; तरी

तुमचें सामर्थ्य आमच्यांत नाहीं. आपण महागाणपत्य आहां, तरी आपणच आपली आराध्यदेवता भोजनास आणावी.' त्यावर,

> " देव म्हणती, ' तुक्या ! एवढी कैंची थोरी ? ॥
> अभिमानाभीतरीं नागविलें. ॥ २ ॥
> वाढ वेळ झाला, शिळें झालें अन्न, ।
> तटस्थ ब्राह्मण बैसलेती.' " ॥ ३ ॥

तेव्हां,

> " तुका म्हणे, ' देवा ! तुमच्या सुकृतें ।
> आणीन त्वरितें मोरयासी.*' " ॥ ४ ॥

मग बोवांनीं सांगितलें कीं, 'ईश्वराचें नांव घेऊन प्राणाहुति घ्याव्या, कारण भोक्ता हा ईश्वरांशच आहे. सर्व विश्वच ईश्वरात्मक आहे, मग आपणा सर्वांच्या मूर्तीच ईश्वरस्वरूप नाहींत, असें कसें होईल ?'

---

* या प्रसंगीं तुकारामबोवांनीं ब्रह्मा, विष्णु, महेश, गणपति, इत्यादि देव प्रत्यक्ष शरीरधारी करून भोजनास आणिले, असें तुकारामभक्त सांगतात. रामदासभक्त हनुमंतस्वामी म्हणतात कीं, या प्रसंगीं रामदासही हजर होते, व देव, बोवा, आणि समर्थ, असे त्रिवर्ग खोलींत पानें मांडून दार लावून एकांतांत बसले; आणि मग समर्थांनीं गणपति, पांडुरंग, व राम, या देवतांना सपरिवार आणून त्यांच्याकडून भोजन करविलें, व त्यांची तेथेंच बोळवण केली. हा सर्व प्रकार एकांतांत झाला व तो बाहेर कोणालाही कळला नाहीं, असाही हनुमंतस्वामींचा एकंदर प्रकरणावर शेरा आहे! पराचा कावळा कसा होतो आणि वेडे शिष्य अभिमानानें भलभलत्या गोष्टी आपल्या गुरूंच्या पदरीं बळेंच कशा बांधतात, याचा हा एक चांगला मासला आहे.

'भोक्ता नारायण लक्ष्मीचा पती,' ।
म्हणून प्राणाहुती घेतलिया. ॥ १ ॥
भर्ता आणि भोक्ता, कर्ता आणि करविता, ।
आपण सहजता पूर्णकाम. ॥ २ ॥
विश्वीं विश्वंभर कृपादृष्टी सांभाळीत, ।
प्रार्थना करीत ब्राह्मणांची. ॥ ३ ॥
कवळोंकवळीं नाम घ्यावें गोविंदाचें, ।
भोजन भक्तांचें, तुका म्हणे. ॥ ४ ॥

हा प्रकार पाहून, तुकारामबोवांत असत्याचा किंवा दंभाचा टांकही नाहीं, अशी देवांची खात्री झाली व तेव्हांपासून ते त्यांना फार चाहूं लागले.

एकदां बोवा आळंदीस कीर्तनास उभे राहिले असतां, कित्येक मदोन्मत्त, अहंमन्य, गांवशिष्टांनीं बोवांचा निषेध केला कीं, 'तूं शूद्र आहेस. उपदेश करण्याचा किंवा काव्य रचण्याचा तुला अधिकार नाहीं. आजपर्यंत तूं कवित्व केलेंस, तें अशास्त्र आहे, तरी तूं आपल्या कवित्वाच्या वह्या इंद्रायणींत बुडवाव्यास.' याच प्रसंगाला उद्देशून बोवा आत्मचरित्रांत म्हणतातः—

"निषेधाचा कांहीं पडला आघात, ।
तेणें मध्यें चित्त दुखविलें. ॥ १६ ॥
बुडविल्या वह्या, बैसलों धरणें, ।
केलें नारायणें समाधान." ॥ १७ ॥

मागें सांगितलेंच आहे कीं, तुकारामबोवांच्या मनाची अशी खात्री झाली होती कीं, "ईश्वरानें भागवतधर्माचा निरोप सर्व लोकांस सांगण्यासाठीं आपल्याला जन्मास घातलें आहे." ही

कामगिरी सिद्धीस नेण्यासाठींच त्यांनीं ईश्वरानुज्ञेनें कवित्वाचा उपक्रम केला. *परंतु थोर, शिष्ट, लोकांकडून त्याचा निषेध होऊन आघात घडला, तेव्हां बोवांचीही वृत्ति कांहीं अल्प काळ संशययुक्त झाली. आपण चुकतों आहों कीं काय, अशी त्यांस शंका येऊं लागली. †शिष्टांच्या आज्ञेनुसार त्यांनीं आपल्या कवित्वाच्या वह्या इंद्रायणींत बुडविल्या; परंतु, 'आपण केलें हें बरोबर केलें किंवा नाहीं,' या संबंधानें त्यांच्या मनाला सारखी तळमळ राहून गेली. मग त्यांनीं देहूस विठोबाच्या द्वारीं धरणें घेऊन, 'योग्य मार्ग मला दाखवावा व माझ्या मनाची चुटपूट दूर करावी,' म्हणून प्रभूची विनवणी चालविली. ते म्हणतात:—

"भूतबाधा आम्हां घरीं, । हें तों आश्चर्य गा! हरी! ॥१॥
जाला भक्तीचा कळस, । आले वसतीस दोष. ॥ २ ॥
जागरणाचें फळ । दिली जोडोनी तळमळ. ॥ ३ ॥
तुका ह्मणे, देवा! । आहाच कळों आली सेवा. ॥ ४ ॥

---

*वर्डस्वर्थ कवीचे चरित्रकार मेयर्स साहेब यांनींही आपल्या चरित्र-नायकाविषयीं असेच उद्गार काढले आहेत.—"When a man believes he has a message to deliver that vitally concerns mankind, and when that maesage is received with contempt, and apathy, he is necessarily driven back upon himself; he is forced to consider whether what he has to say is after all so important, and whether his mode of saying it be right and adequate."

†या वह्या रामेश्वरभट्ट वाघोलीकर याच्या सांगण्यावरून बुडविण्यांत आल्या, असें सर्व चरित्रकारांचें म्हणणें आहे, परंतु आम्हीं वर दिलेली हकीगत गाथेच्या आधारानें लिहिली आहे.

करूं कवित्व काय? नाहीं आतां लाज, ।
मज भक्तराज हांसतील. ॥ १ ॥
आतां आला एक निवाड्याचा दिस, ।
सत्यावीण रस विरसला. ॥ २ ॥
अनुभवावीण कोण करी पाप, ।
रितेची संकल्प लाजलावे. ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां न धरवे धीर, ।
नव्हे जीव स्थिर माझा मज. ॥ ४ ॥
नाहीं आइकत तुह्मी माझे बोल. ।
कासया हें फोल उपणूं भूस? ॥ १ ॥
येसी तें करीन बैसलिया ठाया ।
तूंची बुझवाया जवळी, देवा! ॥ २ ॥
करावे ते केले सकळ उपाय, ।
आतां पाहों काय अझुनी वास? ॥ ३ ॥
तुका ह्मणे, आला आज्ञेसी सेवट, ।
होउनिया नीट पायां पडों. ॥ ४ ॥

अशा रीतीनें तेरा दिवस प्रायोपवेशन करून ईश्वराला आळविल्यावर तुकारामबोवांना झोपेंत दृष्टांत झाला कीं, 'कवित्व कोरडें आहे, *तें उदकांतून काढणें.' हा दृष्टांत झाल्याबरोबर

---

* तेराव्या दिवशीं तुकाराम बोवांच्या पोथ्या पाण्यावर आपोआप तरंगतांना दिसल्या व त्या कोणीं बाहेर काढल्या, अशी दंतकथा आहे; परतु ती भाकडकथा दिसते. तुकारामबोवांनीं फार बंदोबस्तानें आपल्या पोथ्या बांधून व वर खालीं धोंड्याच्या चिपा लावून नदींत टाकिल्या होत्या. त्या पाण्यांत बुडाल्या, पण वेष्टणामुळें भिजल्या नाहींत व धोंड्यांच्या वजनामुळें वाहूनही गेल्या नाहींत, असा खरा प्रकार होता. याला आधार गाथेचा आहे.

बोवांना एक प्रकारें फारच दुःख झालें व एक प्रकारें आनंदही झाला. आपली बुद्धि थोडीबहुत अद्याप चंचल आहे व आपण ईश्वराला उगाच सांकडें घातलें, म्हणून बोवांना अतोनात दुःख झालें. पण, ' माणसांनीं जरी आपल्या कवित्वाचा निषेध केला, तरी ईश्वरानें निषेध केला नाहीं; आपणांस ईश्वराची आज्ञा झाली ती कायम आहे, व माझें कृत्य त्यास पसंत आहे,' ही कल्पना मनांत येऊन बोवांना अतिरिक्त आनंद झाला. ही त्यांची खेदमोदोपस्कृत स्थिति पुढील अभंगांत व्यक्त होते:—

" थोर अन्याय केला । तुझा अंत म्यां पाहिला, ।
जनाचिया बोला—। साटीं चित्त क्षोभविलें. ॥ १ ॥
भागविलासी केला सीण । अधम मी यातीहीन, ।
झांकूनी लोचन । दिवस तेरा राहिलों. ॥ २ ॥
अवघें घालूनिया कोडें । तान्ह भूकेचें सांकडें, ।
योगक्षेम पुढें । तुज करणें लागले. ॥ ३ ॥
उदकीं राखिले कागद, । चुकविला जनवाद, ।
तुका म्हणे, ब्रीद । साच केलें आपुलें. ॥ ४ ॥
मी अवगुणी अन्यायी । किती म्हणोनी सांगों काई ? ।
आतां मज पाईं । ठाव देईं विठ्ठले ! ॥ १ ॥
पुरे, पुरे, हा संसार, । कर्म बळिवंत दुस्तर, ।
राहों नेदी स्थिर । एके ठाईं निश्चळ. ॥ २ ॥
अनेक बुद्धीचे तरंग, । क्षणक्षणां पालटती रंग, ।
धरूं जातां संग । तंव तो होतो बाधक. ॥ ३ ॥
तुका म्हणे, आतां । अवघी तोडीं माझी चिंता, ।
येऊनी, पंढरीनाथा ! । वास करीं हृदयीं. ॥ ४ ॥

देहूस मंबाजीबोवा नांवाचा एक ब्राह्मण गोसावी होता. तो केवळ नांवाचा गोसावी होता, कारण कामक्रोधलोभमत्सरादि दुष्ट विकारांचा त्याच्या मनावर पूर्ण पगडा होता. तुकारामबोवांचा दिवसेंदिवस होत चाललेला उत्कर्ष त्याच्या मनाला सहन होईना. या मंबाजीची बाग तुकारामबोवांच्या विठ्ठलमंदिराच्या दक्षिणेस लागूनच होती. एकदां तुकारामबोवांची म्हैस सुटून मंबाजीच्या बागेंत शिरली व तिनें जराशी नासधूस केली. तेव्हां मंबाजीनें बोवांवर व त्यांच्या बायकोवर आडमाफ तोंडसुख घेतलें, पण बोवांनीं उलट ब्रही काढला नाहीं. मंबाजी मात्र मनांत डूक धरून राहिला होता. पुढें मंबाजीनें आपल्या बागेला कांटेरी वही घातली, व ती प्रदक्षिणेच्या वाटेवर विठ्ठलमंदिराला आणून भिडविली. तुकारामबोवा दर एकादशीस देवळांत हरिजागर करीत व तेव्हां बरीच यात्रा जमत असे. अशी भक्तमंडळी एकदां जमली असतां, मंबाजीच्या वहीमुळें त्यांना प्रदक्षिणा घालतां येईना. तेव्हां तुकारामबोवांनीं स्वहस्तें वहीची कांटी वाटेपुरती उपटून टाकली. त्यामुळें रागानें भडकून जाऊन मंबाजी तावातावानें आला व बोवांना अद्वातद्वा दुःशब्द बोलून, त्यानें त्यांना उपटलेल्या कांटीनेंच पाठीवर झोडलें. परंतु बोवांनीं तें निमूट सहन केलें. या प्रसंगीं बोवांनीं कांहीं अभंग व पदें केलीं आहेत; त्यांपैकीं दोन अशीं आहेत:—

"बरवें, बरवें, केलें, । विठोबा ! बरवें. ।। ध्रु० ।।
पाहोनी अंत क्षमा अंगीं । कांटीवरी मारविलें. ।। १ ।।
शिव्यागाळी नीत नाहीं । बहु फार विटंबिलें. ।। २ ।।
तुका ह्मणे, क्रोधाहातीं । सोडवून घेतलें. रे! ।। ३ ।।

पावलों, पावलों, देवा । पावलों रे ! ॥ ध्रु० ॥
बरवें संचित । होतें तैसें जालें, रे ! । आतां काय बोलों ? रे! ॥ १
सोज्वळ कंटक वाट । भावें करूं गेलों, रे ! ।
तुका ह्मणे, करून वेगळा केलों, रे ! ॥ २ ॥

पुढें रात्रीं कीर्तनप्रसंगीं मंबाजी आला नाहीं, पण त्याचा तर कीर्तनास येण्याचा नेहमींचा परिपाठ असे. म्हणून तुकारामबोवा स्वतः त्याला बोलवावयास गेले, व त्याचें अंग रगडूं लागून म्हणाले, 'मी आपला अपराध केला, म्हणून आपल्यास मला मारण्याचे श्रम झाले. त्यानें आपलें अंग दुखत असेल; पण आपण कीर्तनास आलें पाहिजे. आपण एवढी भीक मला घालावी. कांहींएक मनांत ठेवूं नये व हरिकीर्तनाला नेहमींप्रमाणें चलावें.' ही बोवांची वृत्ति पाहून मंबाजी चकित होऊन गेला व त्याला कृतकर्माचा फार पश्चात्ताप झाला. याच प्रसंगावर कटाक्ष ठेऊन, मोरोपंत म्हणतातः—

मातेचे पाय जसे, छळकर्त्याचे तसेचि जो पाहे, ।
साधु निवे, नच कोपे, न दुरुक्तक्षोभ मानसीं राहे. ॥

पुण्याजवळ वाघोली नांवाचा गांव आहे, तेथें रामेश्वरभट्ट म्हणून एक मोठा कर्मठ, षट्शास्त्रवेत्ता, ब्राह्मण होता. तो महापंडित होता, परंतु ताठा व जातीचा दुरभिमान हे त्याला सुटले नव्हते. तुकारामबोवा शूद्र असून कथाकीर्तन करितो, श्रुतिविषयाचें प्रतिपादन मांडितो, व ब्राह्मणादिही त्याला वंदन करितात, ही गोष्ट त्याला सहन झाली नाहीं; तेव्हां त्यानें गांवकामगारांजवळ आपलें वजन खर्च करून तुकारामबोवांना चांगली तंबी देवविली व 'तूं गांव सोडून चालता हो' म्हणून त्याला

अरेरावीचा हुकूमही सोडण्यांत आला. या प्रसंगीं तुकारामांनीं एक अभंग रचला आहे, तो असाः—

“काय खावें आतां? कोणीकडे जावें? ।
गावांत राहावें कोण्या बळें? ॥ १ ॥
कोपला पाटील, गांवींचे हे लोक. ।
आतां घाली भीक कोण मज? ॥ २ ॥
आतां ‘येणें चवी सांडली’ ह्मणती, ।
निवाडा करिती दिवाणांत. ॥ ३ ॥
भल्या लोकीं यांस सांगितली मात, ।
केला माझा घात दुर्बळाचा. ॥ ४ ॥
तुका ह्मणे, यांचा संग नव्हे भला, ।
शोधीत विठ्ठला जाऊं चला. ॥ ५ ॥”

पुढें रामेश्वरभट्टाला कांहीं शरीरव्यथा होऊन दुःसह पीडा होऊं लागली. तेव्हां तो ज्ञानेश्वरांची सेवा करण्यासाठीं आळंदीस त्यांच्या समाधीजवळ राहिला. तेथे त्याला स्वप्नांत असा दृष्टांत झाला कीं, ‘तूं जो तुकारामबोवांचा छळ केलास, त्याचा हा परिणाम आहे; तरी त्यांनाच तूं शरण जा, म्हणजे रोगमुक्त होशील.’ तेव्हां रामेश्वरभट्ट नाक मुठींत धरून बोवांना शरण गेला व त्याची व्यथा दूर झाली. तेव्हांपासून त्याची बोवांवर अचळ श्रद्धा बसली व तो त्यांचा पट्टशिष्य बनला. या एकंदर हकीकतीविषयीं खुद्द रामेश्वरभट्टाचा असा अभंग आहे:—

“माझी मज झाली रोकड प्रचित, ।
होउनी फजित दुःख पावें. ॥ १ ॥

कांहीं द्वेष त्याचा करितां अंतरीं,
*व्यथा या शरीरीं बहुत झाली. ॥ २ ॥
ज्ञानेश्वरें मज केला उपकार, ।
स्वप्नीं सविस्तर सांगितलें. ॥ ३ ॥
तुका सर्वां श्रेष्ठ, प्रिय आह्मां थोर,
कां जे अवतार नामयाचा. ॥ ४ ॥
त्याची तुज कांहीं घडली रे! निंदा, ।
ह्मणुनी हे बाधा घडली तुज. ॥ ५ ॥
आतां एक करीं सांगेन तें तुला, ।
शरण जाई त्याला निश्चयेंसीं. ॥ ६ ॥
दर्शनेंची तुझ्या दोषा परिहार ।
होय, तो विचार सांगितला. ॥ ७ ॥
तोंची हा विश्वास धरूनी मानसीं, ।
जाय कीर्तनासी नित्य काळ. ॥ ८ ॥
ह्मणे रामेश्वर त्याच्या समागमें ।
जालें हें आरामें देह माझें." ॥ ९ ॥

लोहगांव देहूजवळच असून तेथील लोकांचें तुकारामबोवांवर फार प्रेम जडलें होतें व ते तेथें वारंवार कीर्तनभजनास

---

* पुण्यास नागनाथाच्या दर्शनास रामेश्वरभट्ट गेला असतां, त्यानें अनगडशाहा नामक एका मुसलमान सिद्धाच्या बागेंतील हौदांत स्नान केलें व त्यामुळें त्याच्या शरीराचा दाह होऊं लागला, असें कांहीं ठिकाणीं लिहिलेलें आढळतें. तुकारामबोवांच्या गाथेंत 'अनघड सिद्धाच्या शब्दें-करून रामेश्वरभट्टाच्या शरीरीं दाह झाला' असें लेखकानें लिहिलें आहे. 'चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती, । व्याघ्रही न खाती सर्प तया ॥' इत्यादि तुकारामी अभंगानें रामेश्वरभट्टाचा दाह शमला असेंही तेथें नमूद केलेलें आहे.

जात असत. लोहगांवचा शिवा नांवाचा कासार तुकाराम-बोवांच्या फार भजनीं लागला व तेणेंकरून त्याचें लक्ष संसारावरून पार उडालें. या गोष्टीमुळें त्याच्या बायकोला तुकारामबोवांचा फार राग आला व तिनें सूड घेण्याचा निश्चय केला. एक दिवस त्या माउलीनें बोवांना आपल्या घरीं स्नानार्थ बोलाविलें व त्यांच्या अंगावर आधणाचें पाणी ओतलें. तेव्हां बोवांचें सर्वांग पोळून निघालें व विलक्षण वेदना होऊं लागल्या. याचें वर्णन बोवांनीं एका अभंगांत केलें आहे:—

" जळे माझी काया, लागला वोणवा, ।
धांव, रे ! केशवा ! मायबापा ! ॥ १ ॥
पेटली सकळ कांति रोमावळी, ।
नावरे हे होळी, दहन जालें. ॥ २ ॥
फुटोनिया दोन्ही भाग होऊं पाहे, ।
पाहतोसी काये ? ह्रदय माझें. ॥ ३ ॥
घेऊनी जीवन; धांवें लवलाहीं, ।
कवणाचें कांहीं न चले येथें. ॥ ४ ॥
तुका ह्मणे, माझी तूं होसी जननी, ।
आणिक निर्वाणीं कोण राखे ? " ॥ ५ ॥

पुढें या शिवाकासाराच्या बायकोच्या अंगावर कोड फुटलें, त्यामुळें तिला आपल्या करणीचा पश्चात्ताप झाला व ती तुकारामबोवांच्या सेवेस लागली, व जन्माचें सार्थक करिती झाली. या प्रसंगाला उद्देशून मोरोपंत लिहितात:—

जी विष पाजी, भाजी, तीच्याही नरकयातना चुकवी, ।
गाती सात्त्विकभावव्याप्त सदा साधुरीतितें सुकवी. ॥

एके समयीं कांहीं संन्यासी लोहगांवीं आले होते, त्यांनीं

तुकारामबोवांच्या कीर्तनांतील भागवतधर्माचा पुकारा व कर्मकांडाच्या थोथांडाचा निषेध ऐकिला व त्यावरून ते रागास चढले. त्यांनीं पुण्यास जाऊन तेथें शहाजीचे कारभारी व शिवाजीमहाराजांचे बाळपणचे पालक व शिक्षक दादोजी कोंडदेव मोकाशी यांजकडे अशी कागाळी नेली कीं, 'तुकाराम पाखंड माजवीत आहे, तरी त्याचें पारिपत्य करावें. तेव्हां दादोजींनीं तुकारामबोवांना पुण्यास आणून त्यांचें कीर्तन स्वतः ऐकून घेतलें. तेव्हां बोवा हे खरें अस्सल नाणें आहेत अशी त्यांची खात्री झाली व त्यांनीं त्या संन्याश्यांचा निषेध केला. या प्रसंगीं, कामक्रोधादिकांचा ज्यांनीं संन्यास केला नाहीं, त्यांनीं 'डोई बोडली, जानवें तोडलें, लंगोटी लावली,' तरीही ते संन्यासी होत नाहींत, अशा मतलबाचे कांहीं अभंग बोवांनीं केले आहेत. त्यांतील एकदोन येथें उतरून घेतों:—

" कुटुंबाचा केला त्याग, । नाहीं राग जंव गेला. ॥ १ ॥
भजन तें वोंगळवाणें, । नरका जाणें चुकेना. ॥ २ ॥
अक्षराची केली आटी, । जरी पोटीं संतनिंदा. ॥ ३ ॥
तुका ह्मणे, मागें पाय । तया जाय स्थळासी. ॥ ४ ॥
ब्रह्मनिष्ठ काडी । जरी जीवानांवें मोडी, ॥ १ ॥
तया घडली गुरुहत्या, । केला उपदेश तो मिथ्या. ॥ २
सांगितलें कांनीं । रूप आपुलें वाखाणी. ॥ ३ ॥
भूतांच्या मत्सरें ब्रह्मज्ञान नेलें चोरें. ॥ ४ ॥
शिकल्या सांगे गोष्टी, । भेदक्रोध वाहे पोटीं. ॥ ५ ॥
निंदास्तुतिस्तवनीं, । तुका ह्मणे, वेंची वाणी. ॥ ६ ॥

एके वेळीं एक सुंदर तरुण स्त्री बोवांकडे वैषयिक बुद्धीनें एकांतीं आली असतां, बोवांनीं तिला हात जोडले आणि सांगितलें:—

"स्त्रियांचा तो संग नको, नारायणा ! ।
काष्ठा या पाषाणा मृत्तिकेच्या. ॥ १ ॥
नाठवे हा देव, न घडे भजन, ।
लांचावलें मन आवरेना. ॥ २ ॥
दृष्टिमुखें मरण इंद्रियांच्या द्वारें, ।
लावण्य हें खरें दुःखमूळ. ॥ ३ ॥
तुका ह्मणे, जरी अग्नि जाला साधू, ।
परी पावे बाधू संघट्टणें. ॥ ४ ॥
'पराविया नारी रखुमाईसमान,' ।
हें गेलें नेमून ठायींचेंची. ॥ १ ॥
जाई, वो ! तूं माते ! न करीं सायास, ।
आह्मी विष्णुदास नहों तैसे. ॥ २ ॥
न साहवे मज तुजें हें पतन, ।
नको हें वचन दुष्ट वदों. ॥ ३ ॥
तुका ह्मणे, तुज पाहिजे भ्रतार, ।
तरी कां इतर लोक थोडे ?" ॥ ४ ॥

एकदां तुकारामबोवांचें लोहगांवास कीर्तन चाललें असतांना, गांवावर एकाएकीं परचक्र आलें. गांवाला वेढा पडला, व जिकडे तिकडे जाळपोळ, लुटालूट, मारहाण, नासधूस, सुरू झाली. लोकांच्या हालअपेष्टा इतक्या कांहीं दुर्धर झाल्या कीं, बोवांना त्या डोळ्यांनीं पहावेनात व क्षणैक चित्त भ्रांत होऊन, 'जेथें हरिकीर्तन चालत आहे, तेथें असा अनर्थपात कसा व्हावा ?' असा विचार मनांत येऊन बोवांना फारच विषाद झाला. ते म्हणतात:—

"न देखवे डोळां ऐसा हा आकांत, ।
परपीडे चित्त दुःखी होतें. ॥ १ ॥

काय तुह्मी येथें नसालसें झालें? ।
आम्हीं न देखिलें पाहिजे हें. ॥ २ ॥
परचक्र कोठें हरिदासांच्या वासें? ।
न देखिजेत देशें राहातिया. ॥ ३ ॥
तुका ह्मणे, माझी लाजविली सेवा, ।
हीनपणें देवा! जिणें झालें. ॥ ४ ॥
काय मानावें हरिकथेचें फळ ।
'तरिजे सकळ जन' ऐसें? ॥ १ ॥
उच्छेद तों असे हा रे! आरंभला, ।
रोकडें विठ्ठला! परचक्र. ॥ २ ॥
पापावीण नाहीं पाप येत पुढें, ।
साक्षीसी रोकडें साक्ष आलें. ॥ ३ ॥
तुका ह्मणे, जेथें वसतील दास, ।
तेथें तुझा वास कैसा आतां? ॥ ४ ॥
भीत नाहीं आतां आपुल्या मरणा, ।
दुःखी होतां जना न देखवे. ॥ १ ॥
आमची तों जाती ऐसी परंपरा, ।
कां तुह्मी दातारा! नेणां ऐसें? ॥ २ ॥
भजनीं विक्षेप तेंची पैं मरण, ।
नवजावा क्षण एक वायां. ॥ ३ ॥
तुका ह्मणे, नाहीं आघाताचा वारा, ।
ते स्थळीं दातारा! ठाव मागें." ॥ ४ ॥

असो, अशा प्रकारें नाना तऱ्हांचे आध्यात्मिक, आधिदैविक, व आधिभौतिक, आघात सोशीत, पण कधीं सात्विक वृत्ति फारशी ढळूं न देतां, तुकारामबोवांनीं आयुष्य कंठलें व आतां 'कृतांतकटकामलध्वजजरा दिसों लागली.' तुकारा-

बोवांची काया ब्रह्मीभूत होऊन ते अंतर्धान पावण्याचे पूर्वी सुमारें एक वर्ष म्हणजे शके १५७०-७१ या वर्षी, त्यांची निःस्पृहता, वैराग्य, निर्लोभ, स्वतंत्र वृत्ति, पूर्ण स्थिति, वगैरे सर्वांना फार कठिण कसोटीस लागण्याचा प्रसंग आला. बोवा देवाला नेहमीं सांगत असत कीं, "हे परमेश्वरा!

**"माझें मन पाहें कसून, । चित्त न ढळे तुजपासून. ॥ १ ॥**
**कापून देईन शिर, । पहा कृपण कीं उदार. ॥ २ ॥**
**मजवरी घालीं घण, । परी मी न सोडीं चरण. ॥ ३ ॥**
**तुका ह्मणे, अंतीं । तूजवांचून नाहीं गती."** ॥ ४ ॥

आणि खरोखरीच बोवांच्या अंगचें हीणकस भस्म होऊन चोख सोज्वळ सुवर्ण राहावें म्हणून परमेश्वरानें त्यांना विलक्षण भट्टींतून तावून काढलें. तुकारामबोवांची शेवटची कसोटी ही दुष्मानगिरीचें व मात्सर्याचें फळ नव्हती, तर त्या कसोटीचें कारण, एका थोर महात्म्याचें उदार अंतःकरण व प्रेम हेंच होतें.

मराठी स्वराज्याची प्राणप्रतिष्ठा करून मुसलमानी सत्तेची भयंकर लाट मागें लोटणारे व भागवतधर्माला पाठिंबा देणारे, छत्रपति शिवाजीमहाराज यांनीं तुकारामबोवांची अखेरची परीक्षा पाहिली. शके १५७० म्हणजे इ. स. १६४९ च्या सुमारास शिवाजीराजे बावीस वर्षांचे होते. शिवाजीराजे १९ वर्षांचे असतांनाच, त्यांनीं कल्याण, भिवंडी, व पाली, हे प्रांत सर केले होते, व पुणें प्रांताची जहागिरी तर वडिलार्जित म्हणून त्यांच्या ताब्यांत होती. या वेळींही शिवाजी-राजांना 'महाराज छत्रपति' हें उपपद लावलेलें आढळतें, त्यावरून विजापूरकरांशीं फटकून राहून ते आपणांस एकप्रकारें

स्वतंत्र राजे गणीत असत, हें उघड आहे. शके १५७० म्हणजे इ. स. १६४९ या वर्षाच्या सुमारास छत्रपतींची सत्ता चांगलीच वाढून, विजापूरकरांना ते भयंकर वाटूं लागले होते. तोरणा, चाकण, रायरी ऊर्फ रायगड, सिंहगड, पन्हाळा, विशाळगड, वगैरे बरेचसे किल्ले छत्रपतींनीं हस्तगत केले होते. सुपें, राजापूर, वगैरे प्रांतही त्यांच्या कबजांत आले होते. त्यांच्या पदरीं तीन हजार घोडदळ व १०००० मावळे आणि हेटकरी इतकें खडें सैन्य होतें. यावरून छत्रपतींची राजसत्ता या वेळीं बरीच नांवारूपास आली होती व म्हणून तर विजापूरकरांनीं शहाजीराजांना कैद करून, 'आपल्या मुलाचा आवर करा, नाहींतर तुम्हांला जीवें मारूं,' म्हणून सज्जर धमकी दिली होती. छत्रपति शिवाजीराजे यांनीं रामदासस्वामींना यापूर्वींच गुरु केलें होतें व ते त्यांची हरप्रसंगीं सल्लामसलत घेत असत. रामदासस्वामी या वेळीं सुमारें चाळीस एकेचाळीस वर्षांचे होते, म्हणजे तुकारामबोवांशीं तुलना केली असतां, वयानें व अनुभवानें ते फार लहान होते. शिवाजीराजे हे अगदीं तरुण होते, व त्यांचें श्रद्धाळु मन अद्याप एकाग्र झालें नव्हतें. त्यांच्या अंगीं थोडाबहुत तरी हूडपणा होताच, असें दिसतें. त्यामुळें रामदासस्वामींना जरी त्यांनीं गुरु मानिलें होतें, तरी स्वामींच्या ठिकाणीं त्यांचें मन अगदीं अनन्यपणें रममाण झालें नव्हतें. तुकारामबोवांसारख्या वयोवृद्ध, सर्वत्रांस मान्य झालेल्या, व अत्यंत निःस्पृह बाण्यानें राहणाऱ्या भगवद्भक्ताची कीर्ति ऐकून, त्यांना गुरु करावें व त्यांचा उपदेश ग्रहण करावा, अशी इच्छा छत्रपतींच्या मनांत उद्भवली. नंतर त्यांनीं लगेच अबदागीर, घोडा, पालखी, मशाल, कारकून,

वगैरे तमाम इतमाम बोवांस आणण्याकरितां धाडिला व सोबत बोवांना विनंतिपत्र पाठविलें. परंतु बोवा कांहीं लुंगेसुंगे वैरागी नव्हते. संसारांतील दुःखसुखांचा जातीनें महामूर अनुभव घेऊन ज्यांच्या अंगीं खरें खरें वैराग्य बाणलें होतें, त्या बोवांनीं अत्यंत निःस्पृहपणानें छत्रपतींना रोकडें उत्तर दिलें, व दरबारीं येण्याचें व राजगुरुत्व घेण्याचें साफ नाकबूल केलें. बोवांनीं या प्रसंगीं सप्तभंगात्मक जबाब दिला आहे, त्यांतील मतलब पुढें लिहिल्याप्रमाणें आहे:—"हे राजा, ह्या दिवट्या, ही छत्री, हे घोडे, आम्हांला काय करावयाचे आहेत? मान, दंभचेष्टा, हीं आम्ही शूकरविष्ठेप्रमाणें मानतों. सर्व संग सोडून एकांत करावा अशी आमची इच्छा; मग तूं आम्हांला मोहांत कां पाडूं पहावेंस? जनधनतन हें केवळ वमनच आहे. शिवछत्रपति हें नांव तर तुला छान शोभत आहे, आणि आम्हीं भेटीला यावें अशी तुझी फार हौस आहे; पण आम्ही म्हणजे उदासीन, अरण्यवासी, भणंगभिकारी. आमचा ओंगळ वेष; वस्त्रहीन व निःशक्त काया; मग तुझ्यासारख्या राजाला आमच्याशीं सलगी ठेवून कोणता लाभ? तूं प्रवृत्ति-मार्गांतील, आणि आम्ही तर प्रवृत्तीकडे ढुंकूनही पहात नाहीं. प्रवृत्तिमार्गांत श्रीसद्गुरुरामदासस्वामी यांचाच उपदेश त्वां घ्यावा. त्यांचे ठायीं मन निश्चल ठेव; उगीच चंचलवृत्तीनें मनाला इकडे तिकडे फांकूं देऊं नकोस. आम्हांला तुमच्या जवळ येऊन कांहीं मागावयाचें नाहीं व तुम्हीं दिलें असतां घ्याव-याचें नाहीं; मग उगाच यातायात कशाला? आमचें आतां वृद्धपण झालें आहे, आम्हांला लवकरच येथून जाणें आहे, मग भेटीचा योग घडवून मोठें कार्य तें काय साधणार आहे?

तूं रामदासी बाणाच स्वीकारावास. निंदकदुर्जन भलतीच मसलत देतील, वेड्यावांकड्या कंड्यांनीं कान फुंकतील, तरी त्यांविषयीं सावध रहा. तूं विवेकी आहेस, भगवद्भक्त आहेस, तुझी कीर्ति सर्वत्र झाली आहे, तर दीनांचें पालन करावें, याहून अधिक काय सांगावें ?" अशा प्रकारें खडखडीत जबाब देऊन व अष्टप्रधानांना योग्य उपदेश करून, बोवांनीं सर्व इतमाम परत वाटेस लाविला. परंतु मनुष्यस्वभाव—विशेषत: तरुणांचा स्वभाव—असा असतो कीं, एकाद्या वस्तूविषयीं ध्यास लागला असला आणि ती मिळत नाहींशी वाटली, म्हणजे तिच्या विषयीं अधिकच उत्कंठा उत्पन्न व्हावी. जों जों ती वस्तू दूर दूर जाईल, तों तों तिच्याविषयीं सोस वाढत जातो. अशीच अवस्था शिवाजीराजांची झाली. बोवांचें सान्निध्य, सल्लामसलत, व उपदेशवचन, आपल्यास निरंतर घडावें, असें एकदां त्यांच्या मनानें घेतलें आणि बोवांनीं तर 'येत नाहीं' म्हणून रोखठोक जबाब दिला, त्यामुळें राजांना अगदींच हुरहुर लागली, बोवांवरील प्रेम व श्रद्धा यांना जास्तीच ऊत आला, व अखेर स्वत: बोवांच्या भेटीस जाऊन त्यांची विनवणी करून, त्यांच्या हातीं-पायीं पडून, त्यांचे चरण आपल्या राजमंदिराला लागतील असें करावें, असा विचार राजेसाहेबांनीं मनांत आणिला आणि त्याप्रमाणें ते तुकारामबोवांकडे विनंति करण्याकरितां गेलेही. पण तुकारामबोवा निराशेच्या गांवाचे पूर्ण अधिकारी झाले होते. त्यांची मनोवृत्ति तिळप्रायही ढळली नाहीं. एवढ्या मोठ्या सुशील व श्रद्धाळु राजाच्या प्रत्यक्ष बोलावण्याची—विनवणीचीही—भीड त्यांनीं ताडकन मोडली व रोकडा जबाब दिला कीं:—

" राया ! छत्रपती ! ऐकावें वचन, ।
रामदासीं ध्यान लावा वेगीं. ॥ १ ॥
रामदासस्वामी, सोयरा, सज्जन, ।
यासी तूं नमन अर्पी, बापा ! ॥ २ ॥
मारुतीअवतार स्वामी प्रगटला, ।
उपदेश केला तुजलागीं. ॥ ३ ॥
आतां धरूं नका भलत्याचा संग, ।
राम पांडुरंग कृपा करी. ॥ ७ ॥
धरूं नको आस आमुची, भूपाळा ! ।
रामदासीं डोळा लावा वेगीं. ॥ ८ ॥
तुझी चाड नाहीं आम्हां, छत्रपती ! ।
आम्ही पत्रपती त्रैलोक्याचे. ॥ ९ ॥
चारी दिशीं आम्हां भिक्षेचा अधिकार, ।
न मिळे भाकर भक्षावया. ॥ १० ॥
पांडुरंगीं आमुची जाली पूर्ण भेटी, ।
हातांत नरोटी दिधली देवें. ॥ ११ ॥
आतां पडूं नको आमुचिया काजा, ।
पवित्र तूं राजा ! रामभक्त. ॥ १२ ॥
विठ्ठलाचे दास केवळ भिकारी, ।
आम्हांलागीं हरी उपेक्षीना. ॥ १३ ॥
शरण असावें रामदासालागीं, ।
नमन साष्टांगीं घालीं त्यासी. ॥ १४ ॥
तुका म्हणे, राया ! मुला ! असो कल्याण, ।
सद्गुरूशरण असें, बापा ! " ॥ १५ ॥

अखेर बोवांना राजमंदिरीं नेण्याचा हट्ट शिवाजीराजांनीं सोडला. पण बोवांनीं निदान नजराणा तरी घ्यावा म्हणून

त्यांनीं गळ घातली. परंतु बोवांनीं याही आमिषाची डाळ शिजूं दिली नाहीं. त्यांनीं उत्तर दिलें:—

"काय दिला ठेवा? । आम्हां विठ्ठलची व्हावा. ॥ १ ॥
तुम्ही कळलेती उदार, । साटीं परिसाची गार. ॥ २ ॥
जीव दिला, तरी । वचना माझ्या न ये सरी. ॥ ३ ॥
तुका म्हणे, धन आम्हां । गोमांसासमान. ॥ ४ ॥
मुंगी आणि राव । आम्हां सारखाची जीव. ॥ १ ॥
गेला मोह आणि आशा, । कळिकाळाचा हा फांसा. ॥२॥
सोनें आणि माती । आम्हां समान हें चित्तीं. ॥ ३ ॥
तुका म्हणे, आलें । घरा वैकुंठ सगळें." ॥ ४ ॥

अर्थात्, या उत्तरापुढें राजेसाहेबांचें सर्वच बोलणें खुंटलें व तुकारामबोवा ही कांहीं अद्भुत व्यक्ति आहे, अशी त्यांची बालंबाल खात्री *झाली. तुकारामबोवा आपल्या विनंतीस मान देत नाहींत, म्हणून शिवाजीराजांनीं हिरमुसलें होणें अगदीं

* महीपति, हनुमंतस्वामी, व इतर चरित्रकार यांनीं तुकारामबोवा व शिवाजीराजे यांच्या संबंधानें कांहीं अद्भुत कथा लिहिल्या आहेत त्यांपैकीं दोन तीन येथें संक्षेपानें देतों:—

( अ ) एकदां तुकारामबोवांचें वैराग्यपर कीर्तन ऐकून शिवाजीराजे अगदीं विरक्त बनले व राज्यकारभारांत मन घालीत नाहींसे झाले. तेव्हां यासंबंधानें जीजाबाई—राजमाता—हिनें बोवांजवळ गाऱ्हाणें गाइलें. लागलेंच दुसरे दिवशीं बोवांनीं कर्मकांडावर प्रतिपादन सुरू केलें, व क्षत्रीयधर्माची महति राजेसाहेबांच्या मनावर ठसवून त्यांना पूर्ववत् प्रवृत्तिमार्गाला लाविलें.

( आ ) एकदां बोवांचें कीर्तन रंगांत आलेलें होतें व शिवाजीराजेही त्या प्रसंगीं हजर होते. इतक्यांत राजांना धरण्यासाठीं कांहीं यवनअधिकारी येत आहेत, असें कळलें. तेव्हां राजांनीं 'कीर्तनांतून

साहजिक होतें. तरीपण बोवांविषयीं त्यांची जी श्रद्धा व पूज्यबुद्धि होती ती रेंसभरही ढळली नाहीं. आपल्या राज्य-भाराचा आवर करून, शिवाजीराजे वारंवार तुकारामबोवांच्या कीर्तनास हजर राहण्याचा योग साधीत असत. या शिवाजी-

---

उठून जाऊं कीं काय'? म्हणून बोवांस विचारलें. तेव्हां बोवांनीं उत्तर केलें, "कीर्तनांतून उठण्याचें कारण नाहीं. प्रभूला काळजी आहे. त्यांतून कीर्तनांत मरण आलें, तर वैकुंठपद तरी हस्तगत करूं." हें ऐकून राजे कीर्तनांतून उठले नाहींत. इकडे पांडुरंगाला सांकडें पडलें; कारण, यवनाचें धरणें अगदीं जवळ येऊन ठेपलें. मग देव राजांचा वेष घेऊन देवळांतून बाहेर पडले. तेव्हां 'हाच खरा शिवाजी, पळून जात आहे गुलाम,' असें म्हणून यवनाचे लोक त्यांचा पाठलाग करीत गेले व हरिभक्तांचें संकट टळलें.

( इ ) एकदां भोजनाच्या वेळेच्या सुमारास शिवाजीराजे आपल्या फौजेसह देहूस आले, तेव्हां बोवा आपल्या पडक्या देवळांत दगडांचे टाळ वाजवून भजन करण्यांत गुंगले होते. राजे फौजेसह आले आहेत ही बातमी बोवांना लागली, तेव्हां त्यांनीं आपले चिरंजीव नारायणबोवा यांना पुढें पाठवून 'फौजेसह आज आपण आमच्याकडे भोजनास यावें,' अशी विनंति राजेसाहेबांस केली व राजांनींही ती कशीबशी मान्य केली. नंतर बोवांनीं आपल्या सिद्धिसामर्थ्यानें सर्व सिद्धता करून सर्वांस संतुष्ट केलें व भोजनसमयीं बोवांनीं व चि० नारायणबोवांनीं सर्वांचा यथोचित समाचार घेतला, अशी हकीकत हनुमंतस्वामींनीं दिली आहे. परंतु या सर्व अद्भुतावर पूर्ण विरजण घालणारी एक गोष्ट आहे, ती ही कीं, तुकारामबोवांच्या अवतारसमाप्तीच्या वेळीं नारायणबोवा अवलाईच्या उदरीं गर्भवासांत होते व बोवांचें अंतर्धान झाल्यावर त्यांना सूर्यप्रकाशाचें दर्शन घडलें! यावरून संतांविषयींच्या बऱ्याच कथा बनावट, निदान संशय घेण्यासारख्या तरी, आहेत असें म्हणणें युक्त होणार नाहीं काय?

राजांच्या पूज्यभावनेवर लक्ष देऊन, मोरोपंतांनीं *द्वितीय बाजीराव 'शूद्रकवन' म्हणून तुकारामकृतीला जीं नाकें मुरडीत असत, त्यांवर अगदीं यथार्थ व निर्भीड टोला हाणला आहे. पंत म्हणतात:—

सुज्ञ शिवाजी राजा न म्हणे तुकयासि काय 'साधु निका'? ।
तत्पंडितप्रधाना न कळे गुण, समज फार आधुनिका. ॥

## ७. अंतर्धान (शके १५७१).

तुकारामबोवांचा आतां अगदीं वृद्धापकाळ झाला. गात्रें शिथिल झालीं. शरीरांत त्राण राहिलें नाहीं. दर आषाढी-कार्तिकीला पंढरीची वारी करण्याचा त्यांचा नेम आजपर्यंत अखंड चालला होता; परंतु आतां शरीरीं स्वास्थ्य नाहीं, पाय उठत नाहीं, अशी स्थिति झाल्यामुळें त्यांची वारी अंतरूं लागली. या गोष्टीचें त्यांना अतोनात दुःख झालें. सासुरवासणीला माहेरचा ध्यास लागला म्हणजे तिच्या मनाला जशा वेरझाऱ्या लागतात, तशीच तळमळ बोवांना आतां होऊं लागली. वारकरी पंढरीस जाण्यास निघाले आहेत व आपल्याला त्यांच्या बरोबर जातां येत नाहीं, ही अवस्था पाहतांक्षणींच त्यांचें हृदय अगदीं भडभडून आलें. नंतर त्यांनीं वारकऱ्यांबरोबर पांडुरंगाला एक अभंगात्मक निरोप पाठविला,

* मोरोपंतांच्या वेळीं दुसरे बाजीराव पेशवाईच्या पदावर अधिष्ठित झाले नव्हते. तरी पण बाळाजी विश्वनाथाच्या वंशजांना सरसकट 'पेशवे' म्हणण्याची चाल पडली होती असें दिसतें. पेशवाईचा अंत झाल्यावरही बाजीरावांच्या सुप्रसिद्ध चिरंजीवांना 'नानासाहेब पेशवे' म्हणत असत, हे मशहूर आहे.

तो फारच करुणमय—अंतकरण द्रवविणारा—आहे. वारकरी देहूहून निघून गेल्यावर ते परत येईपर्यंत बोवांचीं सर्व इंद्रियें जणूं काय जिव्हा व डोळे यांत एकवटून गोळा झालीं होतीं; आणि जिव्हा एकसारखी देवास आळवीत होती, तर डोळे वारकऱ्यांच्या वाटेकडे एकतानतेनें लागून राहिले होते. या वेळीं तुकारामबोवांच्या मनाची स्थिति खेद, आशा, उत्कंठा, इत्यादि विकारांनीं कशी बनली होती, ती पुढील अभंगांत अगदीं हुबेहूब वठली आहे:—

" माहेरींचा काय येईल निरोप, ।
म्हणऊनी झोंप नाहीं डोळा. ॥ १ ॥
वाट पाहें, आस धरूनिया जीवीं, ।
निढळा हे ठेवी वरी बाहे. ॥ २ ॥
वाटेवरी माप लेखितों दिवस, ।
होतों कासावीस धीर नाहीं. ॥ ३ ॥
काय नेणों संतां पडिला विसर, ।
कीं नव्हे सादर मायबाप. ॥ ४ ॥
तुका म्हणे, तेथें होईल दाटणी, ।
कोण माझें आणी मना तेथें? ॥ ५ ॥
आतां माझे सखे येतील वारकरी, ।
जीवा आस थोरी लागलीसे. ॥ १ ॥
सांगतील माझ्या निरोपाची मात, ।
सकळ वृतांत माहेरींचा. ॥ २ ॥
काय लाभ जाला? काय होतें केणें? ।
काय काय कोणें सांठविलें? ॥ ३ ॥
मागणें तें काय धाडिलें भातुकें? ।
पुसेन तें सुखें आहेतसी. ॥ ४ ॥

तुका म्हणे, काय सांगती ते कानीं ? ।
ऐकोनिया मनीं धरुनी राहें." ॥ ५ ॥

असो, अशा प्रकारें अवर्णनीय उत्सुकतेनें बोवा वाटेकडे टक लावून बसले असतां, एकदाचे वारकरी आले. मग बोवांना जो परमानंद झाला तो गगनांत मावेना. यांचा त्यावेळचा प्रेमसंभ्रम कांहीं विलक्षणच दिसून येतो. एकाद्या जाचलेल्या सासुरवासणीला फार दिवस वाट पाहिल्यावर, एक दिवस माहेरचें मायेचें माणूस भेटावें, म्हणजे तिची जशी अवस्था होते, तशी अवस्था या वेळीं तुकारामबोवांच्या अंतर्वृत्तीची झाली. त्यांची ताटकळलेली व संशयग्रस्त स्थिति नाहीशीं होऊन, निरतिशय प्रेमाचा अनिवार लोंढा त्यांच्या हृदयांत लोटला.

" आजी दिवस धन्य । तुमचें झालें दरुशन. ॥ १ ॥
सांगा माहेरींची मात, । अवघा विस्तारीं वृत्तांत.॥२॥
आईकतों मन । करुनी सादर श्रवण. ॥ ३ ॥
तुका म्हणे, नाम । माझा सकळ संभ्रम. ॥ ४ ॥

आजिच्यिा लाभें ब्रह्मांड ठेंगणें, ।
सुखी झालें मन कल्पवेना. ॥ १ ॥
आर्तभूत माझा जीव जयासाठीं, ।
त्यांच्या जाल्या भेटी पायांसवें. ॥ २ ॥
वाटुली पाहातां सिणले नयन, ।
बहु होतें मन आर्तभूत. ॥ ३ ॥
माझ्या निरोपाचें आणिलें उत्तर, ।
होई समाचार सांगती तो. ॥ ४ ॥
तुका म्हणे, भेटी निवारला ताप, ।
फळले संकल्प, संत आले. ॥ ५ ॥

मग वारकऱ्यांनीं जो पंढरीचा प्रसाद आणिला होता, तो बोवांनीं मोठ्या गोडीनें सेवन केला व पंढरीच्या यात्रेची सर्व हकीकत एकाग्र मनानें श्रवण केली, तेव्हां त्यांचें उचंबळलेलें मन जरा स्वस्थ झालें.

असो, लोहगांवावरील परचक्र, शरीराचें त्राणहीनत्व, पंढरीच्या वाऱ्या अंतरणें, इत्यादि गोष्टींनीं बोवांचें मन अगदीं उद्विग्न होऊन या जगाला कंटाळलें. म्हातारपणाची कळा स्पष्ट उमटून, आतां आपल्या ऐहिक यात्रेची समाप्ति जवळ येऊन ठेपली, असें बोवांना भासूं लागलें; व ते आपल्या मनाला बजावूं लागले कीं, "बाबारे! आतां परलोकीं जाण्याची तयारी कर."

" जरा कर्णमूळीं सांगो आली गोष्टी, ।
मृत्याचिये भेटी जवळी आली. ॥ १ ॥
आतां माझ्या मना! होईं सावधान ।
ॐ पुण्याची जाण कार्यसिद्धी. ॥ २ ॥
शेवटील घडी बुडतां नलगे वेळ, ।
साधावा तो काळ जवळी आला. ॥ ३ ॥
तुका म्हणे, चिंतीं कुळींची देवता, ।
वारावा भोवतां शब्द मिथ्या." ॥ ४ ॥

छत्रपतींना बोवांनीं जाब दिला, त्यांतही ते म्हणतात कीं,

" घेऊनिया भेटी कोण हा संतोष? ।
आयुष्याचे दीस गेले, गेले. ॥ १ ॥
एक दोनी कर्में जाणोनिया वर्में, ।
आपुलिया भ्रमें राहूं आतां." ॥ २ ॥

असें होतां होतां अखेर वैकुंठास जाण्यासाठीं बोवा अत्यंत अधीर झाले व त्याच गोष्टीचा त्यांना रात्रंदिवस ध्यास लागला. ध्यानीं, मनीं, स्वप्नीं, त्यांना वैकुंठ दिसूं लागलें. मग "बहु काळ माझा केलासे सांभाळ, । पांडुरंगें मूळ पाठविलें.॥" अशी त्यांची दृढ भावना झाली. वैकुंठवासी प्रभु सपरिवार येऊन आपल्यास स्वपदीं बोलावीत आहेत असा त्यांना सर्वत्र भास होऊं लागला. आस्ते आस्ते या वैकुंठप्राप्तीच्या ध्यासानें त्यांच्या अंगांत असें विलक्षण वारें—स्फुरण—येऊं लागलें कीं, " आम्ही वैकुंठाला चाललों; आम्हांस प्रभु बोलावीत आहेत;" असें म्हणत व भजन करीत ते घरांतून बाहेर पडत व इंद्रायणी-पर्यंत जात. असें बरेच दिवस चालल्यावर एक दिवस बोवांना असें वाटूं लागलें कीं, "आतां विलंब न लावितां मीं वैकुंठास जावें, म्हणून प्रत्यक्ष वैकुंठनायक आपल्या परिवारासह मला नेण्याकरितां माझ्या घरीं आला आहे."

" पैल आले हरी, । शंखचक्र शोभे करीं. ॥ १ ॥
गरुड येतो फडत्कारें, । 'ना भी ना भी' म्हणे त्वरें. ॥२॥
मुगुट कुंडलांच्या दीप्ती । तेजें लोपला गभस्ती. ॥ ३ ॥
मेघश्याम वर्ण हरी, । मूर्ति डोळस साजरी. ॥ ४ ॥
चतुर्भुज, वैजयंती । गळां माळ हे रुळती. ॥ ५ ॥
पीतांबर झळके कैसा, । उजळल्या दाही दिशा. ॥ ६ ॥
तुका झालासे संतुष्ट, । घरा आलें वैकुंठपीठ. ॥ ७ ॥
पाहुणे घरासी । आजी आले हृषीकेशी. ॥ १ ॥
काय करूं उपचार ? । खोंप मोडकी जर्जर. ॥ २ ॥
दरदर कण्या । रांधिल्या माजी पाण्या. ॥ ३ ॥
घरीं मोडकिया बाजा । वरी वाकळांच्या शेजा. ॥४॥

१५०५

मुखशुद्धि तुळसीदळ, । तुका म्हणे, मी दुर्बळ.''॥५॥

यानंतर तुकारामबोवा घराबाहेर पडले व सर्व जनांना म्हणूं लागले:—

"सकळही माझी बोळवण करा, ।
परतोनी घरा जावें तुम्हीं. ॥ १ ॥
कर्मधर्मे तुह्मां असावें कल्याण, ।
द्या माझें वचन आशीर्वाद. ॥ २ ॥
वाढवुनी दिलें एकाचिये हातीं, ।
सकळ निश्चिती झाली तेथें. ॥ ३ ॥
आतां मज जाणें प्राणेश्वरासवें, ।
मी माझिया भावें अनुसरलों. ॥ ४ ॥
वाढवितां लोभ, होईल उशीर, ।
अवघींच स्थिर करा ठायीं. ॥ ५ ॥
धर्म, अर्थ, काम, जाला एके ठायीं. ॥
मेळविला जिहीं हाता हात. ॥ ६ ॥
तुका ह्मणे, आतां जाली हेची भेटी, ।
उरल्या त्या गोष्टी बोलावया. ॥ ७ ॥
आह्मी जातों तुह्मी कृपा असों द्यावी, ।
सकळां सांगावी विनंती ही. ॥ १ ॥
वाढवेळ जाला, उभा पांडुरंग, ।
वैकुंठा श्रीरंग बोलावितो. ॥ २ ॥
अंतकाळीं विठो आह्मांसी पावला, ।
कुडीसहित जाला गुप्त तुका." ॥ ३ ॥

असें म्हणत म्हणत तुकारामबोवांची अंशत: देहभानातीत झालेली स्वारी नदीपर्यंत आली. नंतर त्यांनीं बरोबरच्या मंडळीस सांगितलें:—

"'वाराणसीपर्यंत असों सुखरूप,' ।
सांगावा निरोप संतांसी हा. ॥ १ ॥
तेथुनिया आह्मा जाणें निजधामा, ।
सवें असे आह्मां गरुड हा. ॥ २ ॥
कृपा असों द्यावी मज दीनावरी, ।
जातसों माहेरीं, तुका ह्मणे. ॥ ३ ॥
आह्मी जातों आपुल्या गांवा, । आमुचा * रामराम घ्यावा.।१।
तुमची आमुची हेची भेटी, । येथुनिया जन्म तुटी. ॥ २ ॥
आतां असों द्यावी दया, । तुमच्या लातगसें पायां. ॥ ३ ॥
येतां निजधामीं कोणी । विठ्ठल विठ्ठल बोला वाणी. ॥ ४ ॥
रामकृष्ण मुखीं बोला, । तुका जातो वैकुंठाला. ॥ ५ ॥

* ब्राम्हणेतरांनीं एकमेकांस भेटतांना किंवा निरोप देतांना 'जोहारा'-ऐवजीं 'रामराम' म्हणावें, असे रामदासांनीं शिवाजीराजांना सांगून ती चाल अंमलांत आणली, असें सामान्यतः समजतात. हनुमंतस्वामींनीं या गोष्टीचा उल्लेख रामदासस्वामींच्या बखरींत केला आहे. परंतु त्यांनीं ही गोष्ट ज्या सालीं घडली असें लिहिलें आहे, तें साल शके १५७१ नंतरचें आहे. पण 'रामराम' हा उपचारप्रचार तुकारामाच्या वरील व दुसऱ्या दोनचार अभंगांत आलेला आहे. शिवाय, 'माझे सखे बंधु घरा आले, बाई ! । रामराम तेही न घे त्यांचा. ॥ १२ नामा म्हणे, कांते ! राम हृदयांत । सांठवूनी, तृप्त झालों आह्मी.' ॥ १३ (तुकाराम तात्यांनीं छापलेली 'नामदेवाची गाथा' अभंग ३४९), या नामदेवांच्या अभंगांतही 'रामरामा'चा उल्लेख आहे. यावरून असें दिसतें कीं, 'रामराम' म्हणण्याचा प्रचार फार जुना होता. मुसलमानी अंमलांत अंमलदारांना नमन करितांना 'जोहार' म्हणण्याचा प्रकार व्यवहारांत आला व मुसुलमानांच्या राज्यसत्तेबरोबर याच प्रकाराचा फार फैलाव झाला. परंतु शिवाजीराजांनीं जेव्हां स्वराज्यस्थापना केली, त्या वेळीं राजकीय संप्रदायांत 'रामरामा' चा उद्धार रामदासांनीं केला, एवढेंच अनुमित करितां येतें.

अशा प्रकारें बोवा सहचरांना उपदेश करीत आहेत व भजनाच्या गदारोळाची एकच धुमश्चक्री माजून राहिली आहे, अशा समयीं तुकारामबोवा एकाएकीं इंद्रायणीच्या तीरीं नाहींसे झाले, व ते कोठें गेले हें कोणासही समजलें नाहीं! तो दिवस शके १५७१ विरोधीनाम संवत्सरे फाल्गुन वद्य द्वितीया, सोमवार, हा होता.

त्या दिवशीं बोवांनीं आपल्या बायकोला सांगितलें होतें कीं, " आम्ही वैकुंठीं जात आहों; तूं तुळसीवृंदावनाची निगा ठेवीत जा. विठोबाच्या पूजेला अंतर देऊं नको. तूं गरोदर आहेस. तुझ्या गर्भांत नारायण आहे, तो तुझें कल्याण करील." परंतु अवलाईला बोवांच्या या भाषणांत कांहीं विशेष आहे, असें वाटलें नाहीं. नेहमींप्रमाणेंच स्वारी 'आम्ही वैकुंठास जातों, आम्ही वैकुंठास जातों,' असें म्हणून बाहेर पडेल, पण लवकरच परत येईल, असें ती समजली. परंतु तुकारामबोवा भजन करीत इंद्रायणीचे तीरीं जे गेले, ते तेथें एकदम नाहींसे झाले, ही बातमी जेव्हां अवलाईच्या कानावर आदळली, तेव्हां हा अशनिनिर्घातच झाला असें तिला झालें. या गोष्टीनें त्या पतिव्रतेचें हृदय दुभंगलें. बोवांशिवाय जगांत राहण्याची कल्पना तिला केवळ दुःसह झाली. बोवांचें अंतर्धान ऐकिल्याबरोबरच तिनें बहुधा प्राणत्याग केला असता; परंतु बोवांचा जातेवेळचा निरोप तिच्या अंतःकरणांत जागा होता. ती गरोदर होती, तेव्हां प्राणत्यागाची कल्पना उघड उघड त्याज्य होती. परंतु बोवा गेले ते गेले, ते पुन्हां आपल्या दृष्टीस पडणार नाहींत, या विचारानें तिचें मन अत्यंत व्याकुळ

झालें, व तिनें आणि कान्होबानें तुकारामबोवांच्या चवदा शिष्यांसह इंद्रायणीच्या तीरीं जाऊन विलक्षण आक्रोश सुरू केला. "बोवांचें दर्शन न घडल्यास आम्ही अन्नग्रहण करणार नाहीं," असा निश्चय करून त्यांनीं प्रायोपवेशन केलें. पुढें चवथ्या दिवशीं म्हणजे फाल्गुन वद्य पंचमीस बोवांची गोधडी व दगडाचे टाळ इंद्रायणीचे वाळवंटांत कोठेंसे सांपडले. बोवा जोंपर्यंत जिवंत होते, तोंपर्यंत या गोधडीचा व टाळांचा त्यांना कधींही विरह होत नसे. रात्रंदिवस हीं दोन आयुधें त्यांच्या जवळ सिद्ध असून, त्यांचा ईश्वरभजनाचा सारखा तडाखा सुरू असावयाचा. परंतु आतां या दोन्ही वस्तु सांपडल्या, आणि बोवांचा तर कोठेंही पत्ता नाहीं, तेव्हां अर्थात् लोकांनीं साहजिक अनुमान केलें कीं, बोवा सदेह स्वर्गाला गेले व आपला कृपाप्रसाद म्हणून या दोन वस्तू त्यांनीं मागें ठेविल्या आहेत. बोवा इंद्रायणीच्या तीरीं जे एकदां नाहींसे झाले, ते कायमचेच झाले. त्यांचा अंत कसा झाला, हें सांगतां येत नाहीं. इंद्रायणींत कोठेंतरी खोल डोहांत पडून बुडणें, अगर हेतुपुर:सर उडी घेऊन जलसमाध स्वीकारणें, अथवा कोठें दरीखोऱ्यांत एकांत करून प्राणोत्क्रमण करणें, किंवा भ्रांत होऊन रानावनांत भटकत असतां क्रूर वनचरांकडून सदेह नष्ट होणें, यांपैकीं कोणतेंही अनुमान शक्य कोटींत येईल. परंतु त्यांपैकीं अमुक एक प्रकारानेंच बोवांची ऐहिकयात्रा संपली, असें ठाम विधान करण्याला कांहींएक पुरावा उपलब्ध नाहीं. असो. बोवा नाहींसे झाले, तेव्हां त्यांची वाट काय? ते काय जीवंत आहेत, कीं मरण पावून त्यांच्या देहाची कांहीं अकल्पित प्रकारें वाट लागली, याविषयीं त्यांच्या भावाला, बायकोला, व शिष्यांना,

मोठाच संशय पडला; व बोवांचें दर्शन झाल्याशिवाय अन्न ग्रहण करावयाचें नाहीं, असा पण करून तीं सर्वजणें इंद्रायणीच्या तीरीं बसलीं असतां, चवथ्या दिवशीं त्यांना बोवांची गोधडी व दगडी टाळ या वस्तू आढळल्याची वार्ता कळली. तेव्हां बोवांचा अंत खास झाला असा त्यांनीं निकाल लाविला; पण बोवांचा अंत झाला, तर शरीराची वाट काय, असा प्रश्न ओघानेंच उद्भवला. याला योग्य उत्तर देतां न आल्यामुळें, व बोवा स्वतःच 'मी वैकुंठास जाणार' असें वारंवार म्हणत असल्यामुळें, बोवा सदेह स्वर्गास गेले, अशी कल्पना संतजनांत प्रचलित झाली. पुराणांतरीं कित्येक महापुरुष विमानांत बसून स्वर्गी गेल्याच्या ज्या कथा आढळतात, त्यांनींही वरील कल्पनेला दुजोरा मिळाला असावा, असें अनुमान केलें असतां तें वावगें होणार नाहीं. तुकारामबोवा अशा प्रकारें एकाएकीं सदेह गुप्त झाल्यामुळें त्यांच्या संबंधानें दहनविधि, समाधि, पुण्यतिथि, वगैरे प्रकार शक्य नाहींत, हें उघडच आहे. परंतु फाल्गुन व० ५ ला बोवांची गोधडी व टाळ हीं सांपडलीं, तरी 'तेंच त्यांचें दर्शन समजावें, आणि त्या दिवसापासून उत्सव करावा,' असें तुकारामबोवांचा पट्टच्छात्र रामेश्वरभट्ट यानें ठरविलें, व इतर शिष्यांनीं तें शिरसा मान्य केलें. मग पंचमी आणि षष्ठी या दोन दिवशीं कीर्तनें झालीं, आणि सप्तमीस लळीत झालें. अशा क्रमानें बोवांची पुण्यतिथि साजरी करण्याचा क्रम अद्यापपावेतों अबाधित चालला आहे.

रा. वि० का० राजवाडे यांनीं 'तुकोब्बाराय देहूकर' या लेखांत तुकारामबोवांच्या मृत्यूसंबंधानें पुढील मत दिलेलें आहे:-

तुकारामबोवा घरीं स्वस्थपणें बसून वारले, तुकारामबोवांचा मृतदेह लांकडाच्या विमानांतून वैकुंठास म्हणजे विठोबाच्या देवळावरून इंद्रायणीतीर्थास नेला व त्यांचा आत्मा वैकुंठास गेला. परंतु रा. राजवाड्यांचें हें मत अगदीं साफ चुकीचें आहे, असें ठांसून सांगण्यास आम्हांस मुळींच दिक्कत वाटत नाहीं. रा. राजवाड्यांनीं बोवांच्या मृत्यूसंबंधानें जें उपरिनिर्दिष्ट मत दिलेलें आहे, त्याला मुख्य आधार पुढील अभंगाचा आहे:—

माड्यावरुतें पांजलें शरीर, ।
झाला धुंदुकार दाही दिशा. ॥ १ ॥
टाळ घोळ विणा मृदंगाचे घोष, ।
गाती हरिदास, नाचताती. ॥२॥
जणों मागें पुढें होती हरिकथा ।
पहातां पहातां भ्रम लोकां. ॥ ३ ॥
हातावरी हात मारुनी जातो तुका, ।
परी कोणा एका उमजेना. ॥ ४ ॥

परंतु, एक तर हा अभंग खास तुकारामबोवांचा दिसत नाहीं, व तो सर्व गाथांतून सांपडत नाहीं. शिवाय खास बोवांचेच दुसरे अभंग आहेत, त्यांत 'वैकुंठस्वामी आपल्या घरीं आलेले आहेत, सर्व माणसांचा निरोप घेऊन त्यांच्या बरोबर आपण गांवाबाहेर गेलों आहों, तेथें आपण सर्वांचा निरोप घेतला आहे व आतां भजनाचा अद्भुत कडाका चालू असतां आपण गुप्त होण्याच्या बेतांत आहों,' अशी हकीकत सांगितलेली आहे व हे अभंग सर्व गाथांत आढळतात. तेव्हां या हकीकतीशीं तुलना केली असतां, वरील 'माड्यावरुतें पांजलें शरीर'

इत्यादि अभंग, एकतर देहूकर तुकारामबोवांविषयींचा व त्यांच्या हातचा नाहीं असें म्हणावें लागतें, अगर या अभंगाचा रा. राजवाड्यांनीं तेढा अर्थ केला आहे. असें अनुमान काढावें लागतें. रा. राजवाडे यांचें मत अग्राह्य ठरविण्याला पुढील मुद्दे पुरेसे आहेतः—

( १ ) तुकारामबोवा जर घरीं वारले असते आणि त्यांच्या शरीराचें रीतसर दहन झालें असतें, तर ते सदेह वैकुंठास गेले, ही कल्पना प्रचलित होण्याला वावच राहताना. बोवांचें शरीर प्रत्यक्ष चितेवर दग्ध झालें असतां, जर ते सदेह स्वर्गांत गेले ही कल्पना लोकांत प्रचलित होऊन खपून जाते, तर इतर साधु-संतांविषयींही ती कल्पना प्रसृत होणें अगदीं साहजिक होतें; पण तसा प्रकार आढळत नाहीं. बोवा इतरांसारखेच घरीं खाटेवर वारले असते, तर, तुकारामबोवांसंबंधानें 'सदेह स्वर्गी जाणें' या कल्पनेंत विशिष्टत्व कांहींच उरत नाहीं. परंतु इतर साधुसंतांविषयीं अशी आख्यायिका कोठेंही आढळत नाहीं. रामेश्वरभट्ट हा बोवांचा पट्टशिष्य होता व तो नेहमीं त्यांच्या जवळ असे. तो आपल्या अभंगांत स्पष्ट म्हणतो कीं, "आजपर्यंत पुष्कळ महंत संत होऊन गेले, परंतु कलेवरासकट स्वर्गास गेलेले असे एकच तुकारामबोवा." यावरून हें उघड सिद्ध होतें कीं, बोवा इतर साधूंप्रमाणें घरीं वारलेले नाहींत. ते गुप्त झाले व त्यांचा देहही सांपडला नाहीं. या मुद्यासंबंधानें रा. राजवाडे म्हणतात कीं, "तुकाराम सदेह वैकुंठास गेला, अशी खुळी कल्पना कित्येक अज्ञ व अविवेचक वारकऱ्यांची आहे........ही कल्पना आधारभूत मानून तिच्या जोरावर वरील उताऱ्याचे अर्थ करूं जाणें अगदीं अप्रयोजकपणाचें

कृत्य आहे." परंतु तुकारामबोवा सदेह स्वर्गाला गेले, ही कल्पना केवळ अज्ञ व अविवेचक वारकऱ्यांचीच आहे, असें नाहीं. तर, जे पूर्णविवेकी, समजूतदार, सुशिक्षित, व प्राकृतसंस्कृत-साहित्यपारंगत, असे होते, व ज्यांना अज्ञ व अविवेचक म्हटलें असतां, खुद्द रा. राजवाड्यांची तळव्याची आग टाळूला भिनून ते आकाश पाताळ एक करूं लागतील, त्या जुन्या मराठी कवींचीही हीच समजूत अबाधित होती. रामेश्वरभट्ट, महीपति, वामनकवि, निळोबारायकवि, मोरोपंत, विठोबाअण्णा, वगैरेंची हीच कल्पना ठाम होती.

**"मुकुटमणी संतांचा तुकया केवळ ह्मणूं नये 'वाणी;' ।**
**वैकुंठीं * जड नेला 'विठ्ठल, विठ्ठल,' ह्मणून † ये वाणी."॥**

ही आर्या लोकप्रसिद्धच आहे, व हींत विठ्ठलनामाच्या गजरांत बोवांनीं देह वैकुंठाला नेला म्हणूनच तुकारामबोवा 'संतांचे मुकुटमणी होत' असा अर्थ ध्वनित आहे. मोरोपंतांनीं तुकारामस्तुतींत स्पष्ट लिहिलें आहे कीं:—

**"श्रीराम तसा गेला वैकुंठाला ‡ सकाय, हा कांहीं ।**
**महिमा न भीरु; करणें दुष्टांच्या यास काय हा कांहीं ?"॥**

तुकारामबोवांनीं कोठेंतरी एकांतस्थानीं योगसाधनानें प्राणनिरोध करून देहत्याग केला असावा, असेंही पुढील आर्येंत सुचविलें आहे:—

**"कर जोडितों, सुटाया तनुरूपा, तापहेतु, § कारा, मी, ।**
**कीं ‡ सतनु मुक्त झाला, योगाची सिद्धि हे तुकारामीं."॥**

"परंधाम टाकून कैसा उडाला ?
जिवन्मुक्त होऊन ब्रह्मीं बुडाला. ।

---

* देह. † या वाणीनें. ‡ सदेह. § बंदिखाना.

जयाची तनू ब्रह्मरूपीं बुडाली,
भवभ्रांति हे जाण कैसी गळाली." ॥

या श्लोकांत वामनकवीनें 'तुकारामबोवा सदेह ब्रह्मरूप झाले' म्हणजे 'ते गुप्त झाले, त्यांचा देह मागें राहिला नाहीं,' हेंच सुचविलें आहे. मग ही कल्पना केवळ अज्ञ व खुळकट वारकऱ्यांचीच होती, असें म्हणण्यास रा. राजवाड्यांस कांहीं-एक कारण नाहीं. रामेश्वरभट्ट, मोरोपंत, महीपति व विठोबाअण्णा, यांस अज्ञ व खुळकट वर्गांत ढकलण्यासारखें दुसरें अप्रयोजकपणाचें कोणतेंच कृत्य नाहीं, आणि पूर्वकालीन लोकांच्या या कल्पनेच्या मूळाशीं कांहींतरी सत्यांश असावा असें म्हणणाऱ्या आधुनिक लेखकांवर रा. राजवाड्यांनीं गालिप्रदानास्त्र सोडावें यासारखें दुसरें कांहींच आत्मघातकी नाहीं. एकंदरींत मुद्दा एवढाच कीं, इतर साधुसंतांपेक्षां तुकारामबोवांची विशेष गोष्ट ही होय कीं, ते गुप्त झाले, त्यांचा देह सांपडला नाहीं, त्या देहाचें काय झालें तें कळत नाहीं, म्हणून ते 'सदेह स्वर्गास गेले' अशी कल्पना प्रचलित झाली.

(२) जर बोवा सामान्य जनांप्रमाणें घरींच वारले असते व त्यांच्या शवाचें दहन करण्यांत आलें असतें, तर त्यांचे आप्त व शिष्य, बोवांचें दर्शन घडावें म्हणून त्यांच्या दहनानंतर इंद्रायणीच्या तीरीं तीनचार दिवस प्रायोपवेशन करीत बसलेच नसते. आपल्या समक्ष शव स्मशानांत नेऊन जाळावयाचें आणि मग त्याचें दर्शन घडावें म्हणून उपासतापास करीत बसावयाचें, ही गोष्ट सुज्ञ व विवेचक माणसांना शोभण्यासारखीच आहे असें रा. राजवाड्यांना वाटतें काय ? बोवा एकाएकीं गुप्त

झाले व त्यांचा सुगावा लागेना, म्हणून तर त्या आप्तांनीं व शिष्यांनीं त्यांचे दर्शनासाठीं प्रायोपवेशन चालविलें होतें.

( ३ ) जर बोवा घरींच वारले असते, तर त्यांची गोधडी व टाळ हीं घरींच असतीं किंवा कदाचित् तीं त्यांच्या शवाबरोबर सरणींत टाकलीं गेलीं असतीं. यांपैकीं कोणतीही एक गोष्ट खरोखर घडली म्हणून गृहीत धरलें, तरी तीन दिवस प्रायोपवेशन केल्यानंतर बोवांच्या आप्तशिष्यांना गोधडी व टाळ यांच्या दर्शनानें जो आनंद झाला, तो होऊं शकत नाहीं. या वस्तू घरींच असत्या, तर त्या लाभल्याबद्दल आनंद मानण्याचें प्रयोजन नाहीं. जर त्या चिताग्नींत जळूनफुटून गेल्या असत्या, तर त्या पुन्हां त्यांना लाभल्याच ना. तेव्हां एकंदर विचार करितां असें दिसतें, कीं, बोवा गोधडी घेऊन टाळ वाजवीत घराबाहेर पडले व नंतर तसेच नाहींसे झाले; ते कोणालाही आढळले नाहींत; पण त्यांचा कोणत्या तरी कारणानें अंत झाला. त्यांचें शव सांपडलें नाहीं, परंतु शोधांतीं गोधडी व टाळ हीं मात्र आढळलीं. तेव्हां, 'हेंच बोवांचें शेवटलें दर्शन, ईश्वरानेंच कृपा करून हीं बोवांचीं प्रसादचिन्हें आम्हांला लाभून दिलीं,' असें आप्तेष्टांनीं मानलें व यावरूनच बोवांची ऐहिक यात्रा संपली, अशी त्यांची खात्री झाली.

( ४ ) जर बोवा घरींच वारले असते व त्यांचें उघड शवदहन झालें असतें, तर त्यांची पुण्यतिथि कोणती धरावी हा प्रश्नच निघताना. परंतु बोवा घरीं वारलेच नाहींत व त्यांचें शवही सांपडलें नाहीं, यामुळें वरील प्रश्न ऊहापोहार्थ बोवांच्या शिष्यमंडळापुढें आला. तेव्हां याचा निकाल असा लावण्यांत

आला कीं, बोवा जरी फाल्गुन व० २ ला गुप्त झाले, तरी त्यांची ऐहिक यात्रा खुंटल्याचीं खरीं प्रमाणें—गोधडी व टाळ—व० ५ला उपलब्ध झालीं, म्हणून पंचमी हीच त्यांची पुण्यतिथि धरावी. हा निर्णय अद्यापपावेतों पाळला जात आहे.

---

## ८. कवित्व,—रचनाविशेष,—सामाजिक, धार्मिक मतें, इ०.

---

**पद.**

**धन्य, धन्य, धन्य, तुका वाणी. ॥ ध्रुवपद. ॥**
**अमृतरसाची क्षितिवर साची । सिंधुचि ज्याची वाणी.॥१॥**
**डोलवितोचि जडा, अजडाही, । प्रभुच्या वेणूवाणी. ॥२॥**
**मोरास घनीं, श्रोत्या ज्याचे । अभंगीं नाहीं वाणी. ॥३॥**

तुकारामबोवांपूर्वी ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, हे तीन प्रमुख कवी व चांगदेव, चोखामेळा, जनी, इत्यादि दुय्यम कवी, यांनीं अभंगवृत्तांत रचना केलेली होती; पण तुकारामबोवांच्या अप्रतिम अभंगांनीं पूर्वकवींच्या कृतीवर इतकी ताण केली आहे, कीं, चांगलासा अभंग असला म्हणजे तो बोवांचाच असावा, असें मनांत येतें. म्हणून रामचंद्रपंत बडवे म्हणतात:—

**" सुश्लोक वामनाचा, अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची, ।**
**ओवी *ज्ञानेशाची किंवा आर्या मयूरपंताची. " ॥**

बोवांच्या सर्व काव्यरचनेला अभंगच नांव सामान्यत: देण्यांत येतें, परंतु त्यांत पदें, ओव्या व श्लोकही, मधून मधून आढळतात. श्लोकरूपी अभंग फकिरांच्या सवालांच्या चालीवर आहेत. हे सवाल व भुजंगप्रयात वृत्त यांत फारच साम्य आहे.

---

* पाठभेद—मुक्तेशाची.

रामदासस्वामींचे मनाचे श्लोक याच वृत्तांत रचलेले आहेत व ते अंशतः फकीरी वृत्तीचे द्योतक आहेत. आजकाल कांहीं साई येतात, ते आपणांस 'कबीरपंथी' म्हणवितात व अर्धवट मराठी व अर्धवट उर्दू असे धेडगुजरी सवाल म्हणतात. त्याचा थोडासा मासला वाचकांकरितां देतों:—

"अरे ! काळ येतां, तुं पड्शी उताणा,
अरे मन ! तूं कां रे ! होसी दिवाणा ? ।
अरे ! रामवांचून है कोन दुसरा ?
अरे मन ! तूं काय् रे ! करसी बिचारा ?" ॥

रामदासी श्लोक बाह्यतः याच थाटाचे आहेत. *ऱ्हस्व-दीर्घांची ओढाताण, शब्दार्थाची तारांबळ, वाक्यरचनेची शिथि-लता, हीं त्या श्लोकांत वारंवार आढळतात. वामनाचे मनाचे श्लोक तर रचनेच्या बाह्यांगांत रामदासी श्लोकांपेक्षां जास्ती सैल व अर्थदृष्टीनें कमी योग्यतेचे आहेत. तुकारामबोवांच्या श्लोकरूपी अभंगांत रचनेच्या बाह्यांगाचे हे सर्व दोष आहेत. बोलतांना केवळ विशेष जोर किंवा हिसका घेऊन स्वरांना जें दीर्घत्व किंवा ऱ्हस्वत्व येतें, तें काव्यरचनेंत हिशोबांत घ्याव-याचें नाहीं, हा जो आजकाल कडकडीत †नियम आहे, तो या अभंगी कवींच्या काळीं फारच सैल होता; परंतु याच्या योगानें एक परिणाम असा घडून आला आहे, कीं, त्यांची रचना

---

* मुक्तेश्वरांच्या श्लोकबद्ध रामायणांत हे सर्व बाह्यांगांतील दोष आ-ढळतात. किंबहुना हें शैथिल्य त्या काळच्या सर्वच कवींच्या रचनेंत आढ-ळतें, असें विधान करण्याला कांहींएक हरकत नाहीं.

† हा नियम मोरोपंतांनीं व वामनवीरेश्वररघुनाथपंडितआनंदतन-यादि कवींनीं अंशतः पाळलेला आहे.

सामान्य अशिक्षित जनसमूहाला परिचित वाटूं लागते व तिचा त्यांच्या मनावर तत्काळ ठसा प्रतिबिंबित होतो. तुकारामबोवांच्या श्लोकांचे एकदोन मासले येथें दाखल करतों:—

तुजवांचुनी मागणें काय कोणा ?
महीमंडळीं विश्वव्यापक जना. ।
जीवभावना पूरवूं कोण जाणे ?
तुजवांचुनी होत कां रावराणे ? ॥ १ ॥
करा वेगु हा, [ आ ] द्रा पंथ आधीं,
जया पार नाहीं, सुखातेंचि साधीं. ।
ह्मणे तूका पंढरिसि सर्व आलें,
असे विश्व हें जीवनें त्याचि जालें. ॥ २ ॥
जना वासना हे धना थेरि आहे,
तुज लागली संगती तेचि सोये. ।
करीं सर्वसंगीं परित्यागु ठायीं,
तुका वीनवी मस्तक ठेवून पायीं. ॥ ३ ॥

ओव्या व साडेतीनचरणी अभंग यांत पुष्कळच साम्य आहे. कांहींचें तर असें मत आहे कीं, निरनिराळ्या प्रकारचे सर्व अभंग ओवीवृत्तांतूनच निघालेले आहेत. ओवीला जसें अक्षर-मात्रागणांचें नीटसें बंधन नाहीं, म्हणण्याची सोय हीच जशी ओवी छंदाची किल्ली आहे, तशी ती बऱ्याच अंशीं अभंगाचीही आहे. तुकारामबोवांचा साधारणत: कोणताही अभंग घेतला, तरी बहुश: त्यांत म्हणतांना कांहीं स्वरांचा खून, तर कांहीं स्वरांचा संकोच किंवा विस्तार, करावा लागतो, त्यावांचून भागत नाहीं. अभंग म्हणणारे जे सांप्रदायिक भजनी असतात, त्यांना हे स्वरांचे लोप, संकोच व प्रसर, परिचयाचे

झाले असल्यामुळें भासत नाहींत, पण अपरिचिताच्या ते तत्काळ लक्षांत येतात. जुनीं हरिदासी पदें व अभंग यांच्या ज्या बऱ्याच वेळां चाली लागत नाहींत, त्यांतील रहस्य तरी मुख्यतः वर सांगितलेले सांप्रदायिक लोप, संकोच व विस्तार, यांतच आहे. एकंदरींत तुकारामबोवांच्या कृतीचें बाह्यांग किंवा बाह्य-त्वचा अशा प्रकारें ओबडधोबड आहे, यांत संशय नाहीं. परंतु याच खडबडीत कातडीच्या आंतील गाभा केवळ दिव्य व तेजस्वी आहे. गारेच्या पोटांत जसा हिरा असावा, त्याप्रमाणेंच वरून बेडौल दिसणाऱ्या तुकारामी रचनेंत विलक्षण सरसत्व व मनोहारित्व सांठविलेलें आहे. तुकारामबोवांच्या कवितेचें सौंदर्यसर्वस्व जिव्हाळ्यांत आहे, वरपांगीं नाहीं. खडबडीत खडकांतून झऱ्याच्या रूपानें जशी रसोत्पत्ति व्हावी, किंवा निशांतीं काळाकुट्ट भासणाऱ्या उदय-गिरीच्या पश्चाद्भागांतूनच जशी प्रभोत्पत्ति व्हावी, तशीच बाह्यतः अगदीं साध्या व क्वचित् प्रसंगीं गांवढळ भासणाऱ्या तुकारामोक्तींतून रस व प्रभा यांची उत्पत्ति होते. बोवांची वाणी फारच मार्मिक आहे. थोड्या व साध्या शब्दांत पुष्कळ व गंभीर अर्थ सांठविण्याची त्यांची हातोटी विलक्षणच आहे. या-मुळें त्यांच्या अभंगांचे बरेचसे चरण म्हणींवजाच सर्वतोमुखीं झालेले आढळतात. कवीच्या वाणींत तेज, भेदकता, आटोप-शीरपणा आणि अनुभवसिद्धता, हे गुण असल्यावांचून त्याचीं वचनें लोकांच्या तोंडीं बसून, ती म्हणींच्या पदवीला येणें शक्य नाहीं. तेव्हां, हें उपरिनिर्दिष्ट गुणचतुष्टय तुकारामोक्तींत अगदीं जगत्या ज्योतीप्रमाणें तळपत आहे, हें सिद्ध करण्याला बोवां-

चीं शेंकडों वचनें म्हणीरूपाला पोंचलीं आहेत, इतकें विधान केलें म्हणजे पुरे आहे:—

१ 'तुका म्हणे, येथें पाहिजे जातीचें, ।
येरा गव्हाराचें काम नाहीं;' ॥
२ 'लोका सांगे ब्रह्मज्ञान । आपण कोरडा पाषाण;' ॥
३ 'असाध्य तें साध्य करितां सायास, ।
कारण अभ्यास तुका म्हणे;' ॥
४ 'सुख पाहतां जीवापाडें, । दुःख पर्वताएवढें;' ॥
५ 'तुका म्हणे करुनी दावी । त्याचे पाय माझे जीवीं,'॥
६ 'भाव तैसें फळ । न चले देवापाशीं बळ;' ॥
७ 'निश्चयाचें बळ । तुका म्हणे तेंची फळ;' ॥
८ 'साधुसंत येती घरा, । तोची दिवाळी दसरा;' ॥
९ 'दया, क्षमा, शांती, । तेथें देवाची वसती;' ॥
१० 'सत्यसंकल्पाचा दाता नारायण ।
सर्व करी पूर्ण मनोरथ;' ।
११ 'बोले तैसा चाले, त्याचीं वंदावीं पाउलें;' ॥
१२ 'बोलाचीच कढी, बोलाचाची भात, ।
जेवुनियां तृप्त काय झाला ?' ॥
१३ 'आली सिंहस्थपर्वणी, । न्हाव्या भटा झाली धणी;'॥
१४ 'शुद्ध बीजा पोटीं, । फळें रसाळ गोमटीं;' ॥
१५ 'मुक्त होता, परी बळें झाला बद्ध, ।
घेऊनियां छंद 'माझें माझें;' ॥
१६ 'पोट लागलें, पाठीशीं, । हिंडवी तें देशोदेशीं;' ॥
१७ 'अर्थेवीण पाठांतर कासया करावें ? ।
व्यर्थची मरावें घोकूनियां;' ॥

१८ 'आंधळ्यासी जन अवघेची आंधळे, ।
आपणासी डोळे दृष्टी नाहीं;' ॥
१९ 'चणे खावे लोखंडाचे । तरीच ब्रह्मपदीं नाचे;' ॥
२० 'जरी आलें राज्य मोळविक्याहातीं
तरी तो मागुतीं व्यवसायी;' ॥

अशा प्रकारच्या शेंकडों तुकारामोक्ती म्हणींप्रमाणेंच लोकांच्या तोंडीं बसून गेल्या आहेत. आपलीं वचनें लोकांनीं नेहमीं व्यवहारांत दाखल्यादाखल योजावींत, हें महाभाग्य फारच थोड्या कवींचें असतें, पण अशा विरळ आढळणाऱ्या कवीं-पैकींच तुकारामबोवा हे एक होत. ज्ञानेश्वर व एकनाथ, यांची सरस्वती फारच गोंडस व लुसलुशीत आहे; पण, जरी तुका-रामबोवांची वाणी या दोन गुणांत जरा हीनगुण आहे, तरी तिच्यामध्यें *सारवत्ता—संस्कारक्षमता—उच्चतम कोटीला पोंचलेली आहे. शिक्षणाच्या बाबतींत ज्ञानदेव, एकनाथ व तुकाराम-बोवा, यांच्यामध्यें किती अंतर होतें हें लक्षांत घेतलें, म्हणजे

---

* कै. रा० रा० भागवत यांनीं तुकारामबोवांच्या कृतींविषयीं फार मार्मिक अभिप्राय दिलेला आहे, तो येथें उतरून घेतों:— तुकाराम हा ज्ञानेश्वरांनीं दाखविलेल्या मार्गानें डोळे मिटून जाणारा होय. 'ग्यानबा तुकाराम' हा वारकऱ्यांचा गजर ही गोष्ट उघड उघड दाखवीत आहे. तुकारामांच्या अभंगांत व त्यांनीं प्रति-पादन केलेल्या धर्मांत सारवत्ता आहे कीं नाहीं, याची साक्ष सर आलेक्झांडर ग्रांटसारखा नामांकित आंग्ल विद्वान् देत आहे. रा० ब० रानडे व रा० सा० मोडक यांचे, लोकांची धर्मवासना जागरूक करण्यासाठीं जे यथाशक्ति यत्न चालले आहेत, त्याचें श्रेय विशेषेंकरून तुकारामांच्याच अभंगांस मिळत नाहीं काय? संतमंडळीच्या वचनांचा एक स्वलक्षण गुण दिसतो, कीं, देवाची पदोपदीं आठवण होऊन त्याचें सर्वसाक्षित्व मनावर विशेष पटतें.

पहिल्या दोन संतकवींचा गोंडसपणा, लुसलुशीतपणा व सुसंस्कृतपणा तिसऱ्यांत कां उतरला नाहीं, हें सहज ध्यानीं येतें. तसेंच तुकारामबोवांच्या अभंगांत नानाप्रकारचा आत्मानुभव जिकडे तिकडे ठांसून भरलेला असल्यामुळें, त्यांत जेवढी सारवत्ता व भेदकता आढळते, तेवढी उज्ज्वळ सारवत्ता व भेदकता ज्ञानेश्वर-एकनाथांच्या कृतींत आढळत नाहीं, हेंही साहजिकच आहे. अंतःकरणाची कळकळ, प्रेम, भक्ति व अन्य विकार, यांच्या सात्विक उमाळ्यापासून उद्भवणारें काव्य व केवळ भाषाप्रावीण्यानें अक्षरमात्रांची कुशल जुळणी करून बनलेलें काव्य, यांतील फरक सहज लक्षांत येण्यासारखा आहे. पहिल्या प्रकारच्या काव्याचें अनुकरण लुंग्यासुंग्यांना साधणें नाहीं, परंतु शिक्षणाचा—लेखनवाचनाचा—प्रसार जारीनें झाला म्हणजे दुसऱ्या तऱ्हेच्या काव्याचें अनुकरण करणें केवळ श्रमसाध्य होऊन बसतें. तुकारामबोवांचें काव्य पहिल्या कोटींतील आहे. साहित्यशास्त्राचे नियम, अलंकारशास्त्रांतील व्याख्या, संस्कृत शब्दांचा सांठा, किंवा व्याकरणाची उत्तम ओळख, यांच्या जोरावर तुकारामबोवा काव्य प्रसवले नाहींत, तर तें त्यांच्या उत्कट* मनोवृत्तींचें स्वाभाविक ठळक प्रतिबिंब आहे. कवितेच्या बाहेरील चट्टीपट्टीकडे त्यांचें लक्ष न फांकल्यामुळेंच, तें अंतर्मुख होऊन, त्यांचें काव्य त्यांच्या अंतर्वृत्तींची हुबेहुब तसबीरच झाली आहे. वर सांगितलेंच आहे, कीं,

* मेयर्स साहेबांनीं वर्डस्वर्थच्या कवितेविषयीं असेच उद्गार काढलेले आहेत:—Poetry soon became to him the expression of his own deep and simple feelings: and then he rebelled against rhetoric and unreality and found for himself a director and truer voice.

अशा काव्याचें अनुकरण अंतःकरण तद्रूप झाल्याशिवाय कधींच साधावयाचें नाहीं. तुकारामोक्तीचें अनुकरण साधावयाचें म्हणजे खरोखर प्रथम स्वतः अंतर्बाह्य तुकारामच बनलें पाहिजे. असें जोंपर्यंत झालें नाहीं, तोंपर्यंत अनुकरणाचा प्रयत्न कोणीं केल्यास, तो हीणकस भासल्यावांचून राहणार नाहीं. तुकारामबोवांच्या वेळींच 'सालोमालो' नांवाचे कोणी भगवद्भक्त होते, ते तुकारामबोवांच्या अभंगांचें रांगडें अनुकरण करून कीर्ति मिळविण्याच्या खटपटीस लागले, परंतु त्यांत त्यांस यश न येतां, त्यांची नुसती फटफजिती झाली. या प्रसंगींचे तुकारामबोवांचे कांहीं अभंग आहेत, त्यांतील तीनचार येथें सादर करितों:—

"नाहीं घाटावें लागत, । एका सितें कळे भात. ॥ १ ॥
क्षीर निवडिते पाणी । चोंची हंसाचिये आणी. ॥ २ ॥
आंगडें फाडुनी घोंगडें करी, । अवकळा तये परी. ॥ ३ ॥
तुका ह्मणे, कण । भुसीं निवडे, कैंचा सीण? ॥ ४ ॥

सालोमालो 'हरीचे दास' । ह्मणउनी, केला अवघा नास.
अवघें वच मंगळ केलें, । ह्मणती एकाचें आपुलें. ॥ २ ॥
मोडुनी संतांचीं वचनें, । करिती आपणां भूषणें. ॥ ३ ॥
तुका ह्मणे, कवी । जगामध्यें रूढ दावी. ॥ ४ ॥

विकल येथें विका । माती, नांव ठेऊन बुका. ॥ १ ॥
हा तों निवाड्याचा ठाव,।खऱ्या खोट्या निवडी भाव.।२।
गऱ्हवारे हा विधि । पोट वाढविलें चिंधीं. ॥ ३ ॥
लावूं जाणो विल्हे, । तुका साच, आणिक कल्हे. ॥४॥

नमितों या देवा, । माझी एके ठायीं सेवा. ॥ १ ॥
गुणअवगुण निवाडा, । ह्मैस, ह्मैस, रेडा, रेडा. ॥ २ ॥

जनीं जनार्दन । साक्ष, त्यासी लोटांगण. ॥ ३ ॥
तुका ह्मणे, खडे । निवडूं दळणीं घडेघडे. ॥ ४ ॥

कवित्व रचण्यामध्यें कर्त्यांचे निरनिराळे हेतू असूं शकतील. कोणी स्वतःच्या मनाची तळमळ शांत करण्यासाठीं काव्य करितात, तर कोणी परदुःखनिवारणार्थ काव्य रचतात. कोणी भगवद्भक्तिगौरवास्तव काव्य गुंफतात, तर कोणी काव्यकृतीनें समाजास कर्तव्यमार्ग दाखवितात. कोणी आपल्या वैषयिक मनोवृत्ती पुरविण्यासाठीं कवित्व करतात, तर कोणी विरक्तिपूर्वक भगवद्भजनाचा मार्ग चोखाळण्यासाठीं कवित्वाचा अंगीकार करितात. कोणी स्वार्थावर पूर्णपणें पाणी सोडून निःस्पृहपणें व निरिच्छपणें काव्य करितात, तर कोणी यशोधनावर नजर ठेवून काव्यदेवीची आराधना करितात. तुकारामबोवांच्या अभंगात्मक काव्यकृतीचें नुसतें वरवर परीक्षण केलें, तरी इतकें सहज लक्षांत येतें कीं, भगवद्भक्तीचा गौरव, भागवतधर्माचा प्रसार, दुःखितांचें समाधान, नीत्युपदेश, आत्मानुभवाचें कथन, हेच त्यांच्या काव्याचे मुख्य हेतू होत. त्यांना द्रव्य व लौकिक यांची मुळींच अपेक्षा नव्हती. त्यांचें साधुत्व, निःस्पृह राहणी, एकनिष्ठ भगवद्भक्ति, आणि मन वेधून टाकणारी काव्यरीति, यांमुळें त्यांचा लौकिक फार झाला, शिष्यमेळा मोठा जमला, व त्यांच्या नांवाचा जिकडे तिकडे जयघोष दुमदुमला, ही गोष्ठ खरी; परंतु अशी आपली लौकिककीर्ति व्हावी या उद्देशानें त्यांनीं काव्यरचना चालविली नव्हती. भक्तिमाहात्म्य करून लोकांनीं धर्म व नीति यांचा मार्ग धरावा म्हणून बोवांचे प्रयत्न होते; त्या प्रयत्नांचा मुख्य हेतू बऱ्याच अंशानें सफळ झाला, आणि त्याचें आनुषंगिक फळ कीर्ति-

रूपानें बळेंच बोवांच्या गळीं पडलें, यास त्यांचा नाइलाज होता. कवित्वाचा उपयोग द्रव्यार्जनाकडे करावयाचा नाहीं, हा तर बोवांचा बाणाच होता, हें मागें सांगितलेंच आहे. प्रत्यक्ष राजानें शिष्यभाव स्वीकारून, अपरंपार लक्ष्मी नजराण्यादाखल आपखुषीनें सादर केली असतां, तिला ज्यांनीं गोमांसासमान मानून, तिकडे ढुंकूनही पाहिलें नाहीं, त्या तुकारामबोवांच्या निःस्पृहपणाबद्दल पुरावा देण्याची जरूरीच नाहीं, असें आम्हांस वाटतें. एकंदरींत तुकारामबोवांचें अभंगात्मक वाङ्मय हें केवळ आवडीला पीळ पडूनच उद्भवलेलें आहे. त्यांत,

**"मोलें घातलें रडाया । नाहीं असूं आणि माया. ॥१॥**
**तैसा भक्तिवाद काय? । रंगबेगडीचा न्याय. ॥ २ ॥**
**वेठी धरिल्या, दावी भाव । मागें पळायाचा पाव. ॥३**
**काजव्याच्या ज्योती, तुका म्हणे, नलगे वाती."** ॥४॥

अशा तऱ्हेची वरपांगी वृत्ती कोठेंही आढळत नाहीं. कृत्रिमता, झिलई, चापणचोपण, मखलाशी, हीं तुकारामबोवांच्या काव्याला कधीं शिवलीं नाहींत. लोकांची आवडनिवड व समाजाच्या मनोवृत्तींचा प्रवाह पाहून लोकाराधना करण्याचे नादीं ते कधींही लागले नाहींत. खऱ्या मनोवृत्ती दाबून, दांभिकपणानें लोकप्रियतेला आपली वाणी व लेखणी वाहण्याचें काम त्यांनीं कधींही केलें नाहीं. लोकप्रवाहांत दुर्बल होऊन वाहून जाणारे बोवा नव्हते, तर खऱ्या खोट्याची आपल्या मतानें—पोक्त विचारानें— परीक्षा करून, लोकमताची पर्वा न करितां खऱ्या मार्गानें जाणारांपैकीं ते होते. यामुळें बोवांची वाणी करारी, तेजस्वी व प्रसंगीं कठोरही, झालेली आढळते; इतकेंच नव्हे, तर, निंद्य वस्तूविषयीं तिटकारा दर्शवीत असतांना, ती

कित्येक वेळां जहाल जाऊन अश्लीलत्व दोषासही पात्र झाली आहे. काव्य करून द्रव्य व यश मिळवावें असा उपदेश करणारांना त्यांनीं साफ जबाब दिला आहे कीं:—

"काय आतां आम्हीं पोटची भरावें, ।
जग चालवावें भक्त म्हूण ? ॥ १ ॥
ऐसा तरी एक सांगा जी ! विचार, ॥
बहु होतों फार कासावीस. ॥ २ ॥
काय कवित्वाची घालुनियां रूढी, ।
करूं जोडाजोडी अक्षरांची ? ॥ ३ ॥
तुका म्हणे, काय गुंपोनी दुकाना, ।
राहों नारायणा ! करुनी घात ?" ॥ ४ ॥

त्यांनीं 'सत्याअसत्यासी मन केलें ग्वाही । मानियलें नाहीं बहुमता ॥' अशा प्रकारचें वर्तन ठेविल्यामुळेंच, त्यांची वाणीही जोरदार व अर्थपूर्ण वठलेली आहे. ते म्हणतात:—

"काय माझें नेती वाईट म्हणोन ? ।
करूं समाधान कशासाठीं ? ॥ १ ॥
काय मज लोक नेती परलोका ? ।
जातां कोणी नरका निवारील ? ॥ २ ॥
न म्हणे कोणासी उत्तम वाईट, ।
सुखें माझी कूट खावो मागें. ॥ ३ ॥
सर्व माझा भार असे पांडुरंगा, ।
काय माझें जगासवें काज ? ॥ ४ ॥
तुका म्हणे, माझें सर्वही साधन ।
नामसंकीर्तन विठोबाचें." ॥ ५ ॥

तुकारामबोवांची सर्व कविता धर्मोपदेश व नीत्युपदेश यांना व भगवत्सेवेला वाहिलेली आहे. या व्यतिरिक्त ती दुसऱ्या कोणत्याही विषयाकडे वळत नाहीं. राजकारण तर तिला मुळींच भाळत नाहीं. राजकीय बाबतींत, परतंत्र झालेल्या राष्ट्रांत स्वातंत्र्येच्छा उत्पन्न करण्याच्या कामीं, व स्वराज्याचा उपक्रम करण्याविषयीं, तुकारामबोवा उदासीनच आहेत, असें म्हणण्यास कोणतीच हरकत नाहीं. तुकारामबोवांच्या वाणींत तडफ—सणसणीतपणा—आहे, परंतु ती तडफ—तो सण-सणीतपणा— केवळ पाखंडावर प्रहार हाणण्याचे कामीं व दांभिकांचा गर्व खंडण्याचे कामीं दिसून येतो, राजकारणीं जुलूम झाल्यास त्यांची वाणी त्याविषयीं मूग गिळून किंवा मलूलपणा स्वीकारून पंगुत्वच प्रकट करीत आहे. राजकारणांत मन घालून, लोकांना कळकळीचा उपदेश करून त्यांच्या अंतःकरणांत स्वराज्य व स्वातंत्र्य यांची स्पृहा उत्पन्न करणारे प्रसिद्ध कवि श्रीरामदास हे एकच होत. तुकारामबोवांच्या अभंगांत वीर्योत्कर्षदर्शक बाणेदार उद्गार आहेत, परंतु ते उद्गार समरांगणावर शत्रूला तोंड देणाऱ्या धाडसी शूराचे नाहींत; तर मन घट्ट करून, धैर्यानें संकट, आपत्ति, अपवाद, व छळ, सोसणाऱ्या आणि ईश्वरचरणीं सर्वस्व अर्पण करून कर्मातीत झाल्यामुळें लोकांची पर्वा न करणाऱ्या विरक्ताचे उद्गार आहेत. या संबंधानें पुढील अभंग वाचण्यासारखे आहेतः—

**"मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास, ।**
**कठिण वज्रास भेदूं ऐसे. ॥ १ ॥**

मेले जित असों, निजोनियां जागे, ।
जो जो जें जें मागे, तें तें देऊं. ॥ २ ॥
भले तरी देऊं गांडीची लंगोटी, ।
नाठ्याळाच्या काठी देऊं माथां. ॥ ३ ॥
मायबापांहूनी बहु मायावंत, ।
करूं घातपात शत्रूहूनी. ॥ ४ ॥
अमृत तें काय गोड आम्हांपुढें, ।
विष तें बापुडें कडू किती? ॥ ५ ॥
तुका म्हणे, आम्ही अवघेची गोड, ।
ज्याचें पुरे कोड त्याचे परी." ॥ ६ ॥
"भाग्यवंत आम्ही विष्णुदास जगीं, ।
अभंग प्रसंगीं धैर्यवंत. ॥ १ ॥
नाहीं, तें पुरवीत, आणोनी जवळी, ।
गाउनी मावली गीत सुखें. ॥ २ ॥
प्रीति अंगीं असे सदासर्वकाळ, ।
बोळलीं सकळ सुखें ठायीं. ॥ ३ ॥
आपल्या स्वभावें जैसे जेथें असों, ।
तैसे तेथें दिसों साजिरेची. ॥ ४ ॥
वासनेचा कंद उपडिलें मूळ, ।
दुरितें सकळ निवारिलीं. ॥ ५ ॥
तुका म्हणे, भक्तजनांची माउली, ।
करील साउली विठ्ठल आम्हां. ॥ ६ ॥

वरील उतारे वाचले म्हणजे विष्णुदासांचें धैर्य सोशीकपणांत आहे, हें स्पष्ट ध्यानांत येतें. दुर्जनाला सुद्धां आपल्या विरक्तीनें, निःस्पृह वाणीनें, व सोशीकपणानें, वठणीला आणावयाचा, हा विष्णुदासांचा बाणा. बोवांनीं मंबाजीबावाशीं

कसें वर्तन ठेविलें तें लक्षांत घेतलें, म्हणजे दुष्टाला शरण आणण्याचें बोवांचें साधन काय होतें, तें उघड होतें. रामदासस्वामी हे स्वतः अत्यंत विरक्त व निरिच्छ होते; त्यांची सहनशीलता व निःस्पृहता बोवांच्याच तोलाची होती; परंतु सबंध राष्ट्राचा ते जेव्हां जेव्हां विचार करीत, तेव्हां तेव्हां, विरक्ति ही अखिल राष्ट्राला योग्य आहे, असें त्यांनीं कधींही मानिलें नाहीं. उलट, 'चळवळ सुरू ठेवावी, ईश्वरावर भरंवसा ठेऊन व सत्पक्षाला धरून राजकारण करावें, संसार चांगला थाटावा पण ईश्वराला विसरूं नये, लोकांचे जमाव करावे, स्वराज्यसंरक्षण करावें, मनुष्य पूर्णपणें पारखून त्यांना योग्य कामांत गुंतवावे' वगैरे प्रवृत्तिपर उपदेश समर्थांनीं पावलोपावलीं केलेला आहे. प्रपंच नीट करावा आणि मग परमार्थाकडे वळावें, असेंही ते म्हणतात; किंबहुना, उत्तम प्रपंचांतच परमार्थ आहे, असें ते मानितात. परंतु तुकारामबोवांनीं प्रपंचप्रवृत्तीला सर्वस्वींच तिलांजली सोडली होती. म्हणून तर त्यांनीं शिवाजीमहाराजांना साफ सांगितलें कीं, "बाबारे! प्रवृत्ति तर मला विषाप्रमाणें आहे. आम्ही निराशेचे राजे आहों, पण तुला लोकांवर सत्ता चालवायची आहे. तुला ऐहिक राज्य थाटावयाचें आहे. मग तुझें माझें कसें जुळणार? रामदास हेच तुला योग्य गुरु आहेत, त्यांच्या ठिकाणींच मन स्थिर राहूं दे." या उत्तरांत बोवांनीं रामदासी बाणा व तुकारामी बाणा यांतील अंतर स्पष्टपणें व्यक्त केलें आहे. संसारांत परमार्थ साधणें नाहीं, असें तुकारामबोवा ठिकठिकाणीं म्हणतातः—

"संसारसंगें परमार्थ जोडे, ।
ऐसें काय घडे? जाणतेनो! ॥ १ ॥

हेंगड्याच्या आळां अवघीं चिपाडें, ।
काय तेथें गोडें निवडावीं. ॥ २ ॥
ढेंकणाचे बाजे सुखाची कल्पना, ।
मूर्खत्व वचना येऊं पाहे. ॥ ३ ॥
तुका म्हणे, मद्य सांडवी लंगोटी, ।
सांगितला सेवटीं विचार त्या. ॥ ४ ॥
प्रपंच परमार्थ संपादीत दोन्ही, ।
एक न निदानीं घडे त्यासी. ॥ १ ॥
दोहीं पेंवांवरी ठेऊं जातां हात, ।
शेवटीं अपघात शरीराचा. ॥ २ ॥
तुका म्हणे, तया दोहींकडे धका, ।
शेवटीं तो नरकामाजीं पडे. ॥ ३ ॥
गूळ सांडुनी गोडी घ्यावी, ।
मीठ सांडुनी चवी चाखावी. ॥ १ ॥
ऐसा प्रपंच सांडुनि द्यावा,
मग परमार्थ जोडावा. ॥ २ ॥
साखरेचा नव्हे ऊंस, ।
आम्हां कैसा गर्भवास ? ॥ ३ ॥
बीज भाजुनी केली लाही, ।
जन्ममरण आम्हां नाहीं. ॥ ४ ॥
आकारासी कैंचा ठाव ? ।
देह प्रत्यक्ष झाला वाव. ॥ ५ ॥
तुका म्हणे, अवघें जग, ।
सर्वां घटीं पांडुरंग." ॥ ६ ॥

असें जरी आहे, तरी निष्कामित्वानें संसारांत राहिलें असतां व

एकनिष्ठपणें भगवच्चिंतन केलें असतां, संसारांतही परमार्थलाभ घडतो असें बोवा सांगतात:—

“नव्हे ब्रह्मचर्य बाइलेच्या त्यागें, ।
वैराग्य वाउगें देशत्यागें. ॥ १ ॥
काम वाढे भय वासनेच्या द्वारें, ।
सांडावें तें धीरें आचाराचे. ॥ २ ॥
कांपवूनी टिरी शूरत्वाची मात, ।
केलें वाताहत उचित काळें. ॥ ३ ॥
तुका म्हणे, करी जिव्हेसी विटाळ, ।
लटिक्याची मळ स्तुति गातां. ॥ ४ ॥
नको सोडूं अन्न, नको सेऊं वन, ।
चिंतीं नारायण सर्व भोगीं. ॥ १ ॥
मातेचिये खांदीं बाळ नेणे सीण, ।
भावना त्या भिन्न मुंडावया. ॥ २ ॥
नको गुंपों भोगीं, नको पडों त्यागीं, ।
लावुनी, सरें, अंगीं देवाचिया. ॥ ३ ॥
तुका म्हणे, नको पुसों वेळोंवेळां, ।
उपदेश वेगळा उरला नाहीं.” ॥ ४ ॥

वर दिलेले उतारे नीट पारखले, तर त्यांत एक प्रकारें विरोधित्व दिसून येतें. संसार परमार्थाला विघातक आहे, असें पहिले दोन अभंग सांगतात, तर संसाराचा त्याग परमार्थाला अवश्य नाहीं, असें दुसरे दोन अभंग सांगतात. या दोन्ही गोष्टींची बरोबर सांगड घालणें—मेळ बसविणें—हेंच बोवांच्या शिक्षणाचें अस्सल सार होय. बोवा स्वत: अगदीं विरक्त झाले होते, त्यांचा ईश्वरावर विलक्षण भरंवसा होता, व ते ऐहिक

गोष्टींसंबंधें पूर्ण बेफिकीर बनले होते. त्यांचा संसार पूर्णपणें सुटला होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांच्या मनांतून आपपरभावाचें ठाणें साफ उठून गेलें होतें. परंतु अशी स्थिति प्रत्येक मनुष्याची होणें शक्य नाहीं व इष्टही नाहीं, हें ते जाणून होते. म्हणून ते स्वत: संसाराला विटले असतांही, त्यांनीं असा उपदेश केला आहे कीं, "बापहो! संसारांत नेकीनें चाला. दंभ, कपट, खोटेपणा, यांचा संबंध तोडा. ईश्वराची आठवण ठेवा. साधुसंतांची सेवा करा. सुखानें फुगूं नका. दुःखानें खचूं नका. सरळ वर्तन ठेवून यथाशक्ति आपलें कर्तव्य करीत जा, मग असें करतांना यश येवो किंवा अपयश येवो, त्याची फारशी काळजी वाहूं नका."—

"आलिया भोगासी असावें सादर, ।
देवावरी भार घालुनीयां. ॥ १ ॥

मग तो कृपासिंधु निवारी सांकडें, ।
येर तें बापुडे काय रंक. ॥ २ ॥

भयाचिये पोटीं दुःखाचिया रासी, ।
शरण देवासी जातां भलें. ॥ ३ ॥

तुका म्हणे, नव्हे काय त्याकरितां? ।
चिंतावा तो आतां विश्वंभर. ॥ ४ ॥

भोग तो न घडे संचितावांचूनी, ।
करावें तें मनीं समाधान. ॥ १ ॥

म्हणऊनी मनीं मानूं नये खेद, ।
म्हणावा गोविंद वेळोवेळां. ॥ २

आणिकां रुसावें नलगे बहुतां, ।
आपुल्या संचिता वांचूनियां. ॥ ३ ॥
तुका म्हणे, भार घातलियावरी ।
होईल कैवारी नारायण. ॥ ४ ॥
निर्वैर व्हावें सर्व भूतांसवें, ।
साधन बरवें हेंची एक. ॥ १ ॥
तरीच करील अंगीकार नारायण, ।
बडबड तो सीण येणेंवीण. ॥ २ ॥
सोइरे पिशुन समानची घडे, ।
चित्त परा ओढे उपकारीं. ॥ ३ ॥
तुका म्हणे, चित्त जालिया निर्मळ, ।
तरीच सकळ केलें होय.'' ॥ ४ ॥

वरील उताऱ्यांचा मतलब इतकाच आहे कीं अद्वैतबुद्धि अंगीकारून—वसुधैवकुटुंबकवृत्ति होऊन—संसार चालवावा. गीतेंतील निष्काम कर्मयोगाचा मार्ग स्वीकारला म्हणजे जीवन्मुक्तता येऊं शकते. अर्थात् संसार करावा, असें सांगितलें म्हणजे सदसद्विवेक, सारासारविचार, पापपुण्याचे भेद, न्यायान्याय, नीत्यनीति, वगैरे विषय ओघानेंच येतात, व म्हणून, बोवा जरी स्वत: संसारपराङ्मुख होते, तरी सांसारिकांवर उपकार करण्यासाठीं व त्यांस उन्नतिमार्ग दाखविण्यासाठीं त्यांनीं आपल्या वाणीला शीण दिलेला आहे. तरी पण समर्थांप्रमाणें राजकारणी गोष्टींचा त्यांनीं खल केलेला आढळत नाहीं.

आतां ज्याच्या योगानें बोवांच्या वेळची सामाजिक स्थिति व बोवांचीं सामाजिक मतें व्यक्त होतील, असे थोडेसे उतारे देऊन हा भाग संपवितों.

अद्वैताच्या बाता मारून भोळ्या भावड्यांना फसविणाऱ्या भोंदू महंतांचा तुकारामबोवांच्या वेळीं फार *सुळसुळाट होता. त्यांच्या दुर्वर्तनानें समाजांत गुप्त रीतीनें अनीति फैलावत होती व धर्मभ्रष्टता माजत चालली होती. या अनर्थाला आळा पडावा म्हणून बोवांनीं आपल्या प्रखर वाणीचा वारंवार खणखणाट केलेला आहे:—

**एक करिती गुरूगुरू, । भोंवता भारू शिष्यांचा. ॥ १**
**पुंस, नाहीं पाय चारी, । मनुष्य, परी कुतरीं तीं. ॥ २**
**परस्त्री, मद्यपान, । पेंडखाण माजविलें. ॥ ३**
**तुका म्हणे, निर्भर चित्तीं । अधोगती जावया. ॥ ४**

**होऊनी संन्यासी भगवीं लुगडीं; ।**
**वासना न सोडी विषयाची; ॥ १॥**
**निंदिती कदान्न, इच्छिती देवान्न, ।**
**पाहताती मान आदराचा. ॥ २ ॥**
**तुका म्हणे, ऐसें दांभिक भजन, ।**
**तया जनार्दन भेटे केवीं ? ॥ ३ ॥**
**लांबवूनी जटा, नेसोनी कासोटा, ।**
**अभिमान मोटा करिताती. ॥ १ ॥**
**सर्वांगा करितो विभूतिलेपन, ।**
**पाहाती मिष्टान्न भक्षावया. ॥ २ ॥**

---

*बोवांचे समकालीन ग्रंथकार मुक्तेश्वर, वामन व रामदास, यांनीही असल्या दांभिक अधम गुरूंवर सटासट कोरडे ओढलेले आहे. मुक्तेश्वरांनीं 'मूर्खांचीं लक्षणें' म्हणून एक प्रकरण लिहिलें आहे, त्यावरून त्या काळची सामाजिक स्थिति बरीच स्पष्ट होते. मुक्तेश्वरी सभापर्वांतील 'कच्चित्प्रश्न' ऊर्फ 'नारदनीति' या प्रकरणाचा व पदांचाही या विषयांत उपयोग होण्यासारखा आहे.

तुका म्हणे, त्यांचा नव्हे हा स्वधर्म, ।
न कळतां वर्म मिथ्यावाद. ॥ ३ ॥
कान फाडूनियां मुद्रा ते घालिती, ।
'नाथ' म्हणविती जगामाजी. ॥ १ ॥
घालोनियां फेरा मागती द्रव्यासी, ।
परी शंकरासी नोळखीती. ॥ २ ॥
पोट भरावया शिकतो उपाय, ।
तुका म्हणे, जाय नरकलोका. ॥ ३ ॥
दाढी, डोई, मुंडी, मुंडुनियां सर्व, ।
पांघुरती बरवें वस्त्र काळें. ॥ १ ॥
ऊफराटी काठी घेउनियां हातीं, ।
उपदेश देती सर्वत्रांसी. ॥ २ ॥
चाळवुनी रांडा, देउनियां भेष, ।
तुका म्हणे, त्यास यम दंडी. ॥ ३ ॥
अंगीं लावोनियां राख, । डोळे झांकुन, करिती पाप. ॥ १
दावुनी वैराग्याची कळा, । भोगितो विषयाचा सोहाळा.२
तुका म्हणे सांगों किती ? । जळो तयांची संगती. ॥ ३ ॥
भगवें तरी श्वान सहज वेश त्याचा, ।
तेथें अनुभवाचा काय पंथ. ॥ १ ॥
वाढवूनी जटा फिरे दाही दिशा. ।
तरी जंबुवेशा सहज स्थिति. ॥ २ ॥
करोनीयां भूमी, करिती मधीं वास, ।
तरी उंदरास काय वाणी ? ॥ ३ ॥
तुका म्हणे, ऐसें कासया करावें ? ।
देहासी दंडावें वाउगेंची. ॥ ४ ॥
परद्रव्य, परनारी, । अभिलाषूनी नाक धरी. ॥ १ ॥

**जळो तयाचा आचार, । व्यर्थ भार वाहे खर. ॥ २ ॥**
**सोंवळ्याची करी स्फीति । क्रोधें विटाळला चित्तीं ॥ ३ ॥**
**तुका म्हणे, सोंग । दावी बाहेरील रंग. ॥ ४ ॥**

बोवांना भुत्ये, कर्णपिशाची, जादूगार, मंत्रीतंत्री, बीरमंत्र-वाले, इत्यादिकांचा मोठा तिटकारा असे; कारण, या गोष्टींत जरी कधीं काळीं कांहीं सत्य आढळलें, तरी बहुश:—शेंकडा नव्याण्णव प्रसंगीं—खोटेपण व ढोंगच दिसून येतें.

**डोई वाढवूनी केस, । भुतें आणिती अंगास. ॥ १ ॥**
**तरी ते नव्हती संतजन, । तेथें नाहीं आत्मखूण. ॥ २ ॥**
**मेळवूनी नरनारी, । शकुन सांगती नानापरी. ॥ ३ ॥**
**तुका म्हणे, मैंद । नाहीं त्यापाशीं गोविंद. ॥ ४ ॥**

तुकारामबोवांच्या मनांत अद्वैत पूर्ण बाणलें होतें. विश्वात्म्याचें विराटस्वरूप त्यांनीं जाणलें असल्यामुळें सर्व देवता एकस्वरूप आहेत असें ते मानीत; तरी पण त्यांतल्या त्यांत पंढरीचा विठोबा हें त्यांचें कुलदैवत व आराध्यदैवत असल्यामुळें त्याच्या ठिकाणीं त्यांची स्वभावत: विशेष आसक्ति होती. विठोबास ते पूर्ण ब्रह्म समजत. भेदबुद्धीनें—आपापल्या देवतांची दुरभिमानपणानें—आराधना करणाऱ्या भक्तांची त्यांनीं चांगली कानउघाडणी केली आहे. वामनपंडितांप्रमाणेंच बोवांनीं कृष्णदैवताला पूर्णांश मानून, इतर देवतांना तारतम्यानें क्षुद्र मानिलें आहे. हरि, हर, ब्रह्मा, यांत ते भेद करीत नाहींत. सर्व देवता एकस्वरूप मानण्यासही त्यांची हरकत नाहीं. परंतु भेदभावानें पाहणें झाल्यास पंढरी-नाथ हीच श्रेष्ठ देवता होय, अशी बोवांची समज दिसते:—

नव्हे जाखाई, जोखाई, । मायराणी, येसाबाई. ॥ १ ॥
बळिया माझा पंढरीराव, । जो या देवांचाही देव. ॥२॥
रंडी, चंडी, शक्ति, । मद्यमांसातें भक्षिती. ॥ ३ ॥
बहिरव, खंडेराव, । रोटी सुटी साठीं देव. ॥ ४ ॥
गणोबा विक्राळ, । लाडू मोदकांचा काळ. ॥ ५ ॥
मुंजा, म्हैसासुरें, । हें तों कोण लेखी पोरें. ॥ ६ ॥
वेताळें, फेताळें, । जळो त्यांचें तोंड काळें. ॥ ७ ॥
तुका म्हणे, चित्तीं । धरा रखुमाईचा पति. ॥ ८ ॥
हरिहर सांडुनी देव, । धरिती भाव क्षुल्लकीं. ॥ १ ॥
ऐका त्यांची विटंबना । देवपणा भक्तांची ॥ २ ॥
अंगीं कवडे घाली गळां । परडी काळाहीन हातीं. ॥३॥
गळां गांठा, हिंडे दारीं, । मनुष्य परी कुतरीं तीं. ॥४॥
मांथीं शेंदूर, दांत खाती, । जेंगट हातीं सटवीचें. ॥५॥
*पूजिती विकट दोंद, । पशु सोंड गजाची. ॥ ६ ॥
ऐशा छंदें चुकलीं वाटा, । भाव खोटा भजन. ॥ ७ ॥
तुका म्हणे, विष्णुशिवां- । वांचुनी देवा भजती ते. ॥८

शाक्तांवर बोवांचा फारच डोळा होता व त्यांवर त्यांनीं कठोर वाग्बाण हाणिले आहेत.

शाक्त गधडा जये देशीं, । तेथें राशी पापाच्या. ॥ १ ॥
सुकृताचा उदो केला, । गोंधळ घाला इंद्रियें. ॥ २ ॥
क्रोधरूपें वसे काम, । तिचें नाम जपतसे. ॥ ३ ॥

---

* तुकारामबोवांनीं गाथांच्या अभंगांच्या आरंभीं गणपतीचें मोठ्या भक्तिभावानें नमन केलें आहे. म्हणजे बोवांना या देवता द्वेष्य नव्हत्या, तर या देवतांचे जे पोटभरू, दुरभिमानी, ढोंगी भक्त आपलें पोकळ देव्हारें माजवीत त्यांवर बोवांचा मुख्य कटाक्ष आहे. शिवाय या देवता कामिक व खालच्या पायरीच्या आहेत असाही त्यांचा रोख आहे.

मद्यभक्षण, मांगीणजाती, । विटाळ चित्तीं सांटविला.। ।४
स्तवूनियां पूजी रांड, । न लजे भांड दाढीसी. ॥ ५ ॥
तुका म्हणे, भगवती, । नेइल अंतीं आपणापें. ॥ ६ ॥

जातिभेदासंबंधानें बोवांचें काय मत होतें, हें मागें एके ठिकाणीं सुचविलेंच आहे. जातींचा स्वाभाविक उच्चनीचपणा बोवांना कबूल होता. परंतु उच्च वर्णाच्या अभिमानानें फुगून जाऊन मन मानेल तसें दुराचरण करणारे निंद्यच होत, असें त्यांचें मत होतें. जातिभेद मोडावा, ही कल्पना बोवांना कधींही शिवली नाहीं. परंतु केवळ जातीनें श्रेष्ठत्व येत नाहीं, तर अंगीं श्रेष्ठत्व येण्याला गुणकर्माचें श्रेष्ठत्व जरूर आहे. म्हणून बोवांच्या अभंगांत कित्येक ठिकाणीं द्विजवर्णाची निर्मळ स्तुति आढळते, तर दुसऱ्या ठिकाणीं दुराचरणी द्विजांची अपरंपार निंदा आढळते. बोवांच्या वेळीं ब्राह्मणादि उच्च जातींत बरेच दुराचार बोकळले होते. यासंबंधानें तुकारामबोवा म्हणतात:—

“जातीचा ब्राह्मण । न करिता संध्यास्नान, ॥ १ ॥
तो एक नांवाचा ब्राह्मण, । होय हीनाहुती हीन. ॥ २ ॥
सांडुनियां शाळिग्राम । नित्य वेश्येचा समागम. ॥ ३ ॥
नेघे संतांचें जो तीर्थ, । अखंड वेश्येचा जो आर्त. ॥ ४॥
तुका म्हणे, ऐसे पापी । पाहूं नका पुनरपी. ॥ ५ ॥
दासीचा जो संग करी । त्याचे पूर्वज नर्कद्वारीं. ॥ १ ॥
ऐसें सांगों जातां जना, । न ये कोणाचिया मना. ॥ २ ॥
बरें विचारोनी पाहें, । तुज अंतीं कोण आहे ? ॥ ३ ॥
तुका म्हणे, रांडलेका ! । अंतीं जासील यमलोका. ॥४॥

बोवांना सामाजिक व्यवहारांत जातिभेद मान्य होता; परंतु भगवद्भक्तीच्या रंगणांत या भेदाचा आखाडा येत नाहीं; इत-

केंच त्यांचें म्हणणें आहे. अलीकडील सुधारक व पूर्वींचे संत, यांच्या मतांतील हा भेद लक्षांत घेण्यासारखा आहे. अलीकडील सुशिक्षित सुधारकांवर सामान्यतः ईश्वरविषयक भक्तिप्रेमाचा फारसा ठसा आढळत नाहीं. त्यांचा ईश्वरावर भरंवसा असला, तरी नामसंकीर्तनांत व भगवद्भजनांत एकतानतेनें दंग होऊन गेलेले असे ते कधींच दृष्टीस पडत नाहींत. परंतु पाश्चात्य ग्रंथ व सामाजिक चालीरीति यांनीं त्यांची नजर विस्तृत होऊन रूढीच्या शृंखलांतून सुटली आहे व तिला जातिभेदाच्या मूळाशीं असलेलें तत्त्व—जन्मसिद्ध उच्चनीचपणा—मान्य नाहीं. मनुष्याची सामाजिक योग्यता जन्मावरून न ठरवितां, गुणकर्मावरून ठरविणें रास्त आहे, असें आधुनिक सुधारकांचें म्हणणें आहे. रोटीव्यवहार, बेटीव्यवहार, इत्यादिकांना जातीचें बंधन नसावें असेंही त्यांचें मत आहे. परंतु तुकारामबोवादि प्राचीन साधुसंतांचें याहून अगदीं निराळें मत आहे. रूढीची शृंखला तडातड तोडणारेच ते होते, परंतु हें कृत्य त्यांनीं केवळ भगवद्भक्तीपुरतें व भूतदयेपुरतेंच केलें आहे. कोणत्याही जातीचा मनुष्य असला तरी नामसंकीर्तनानें तो भागवतधर्मांत श्रेष्ठ पदाला पोंचतो, आणि ब्राह्मणादि उच्च जातीची व्यक्ति जर अभक्त असेल, तर भागवतधर्मांत ती नीच ठरते. परंतु सामाजिक व्यवहारांत त्यांस जातिभेदाची उचलबांगडी करावयाची नव्हती. उलट, ते भेद अवश्य पाळले पाहिजेत, असेंच ते म्हणतात. भक्तिमार्गांत व भूतदयेच्या कार्यांत जातीचें बंड नको, इतक्याच मर्यादेपर्यंत त्यांची चाल झालेली होती.

वेदविहित तुम्ही आइका हो ! कर्मे ।
बोलतों तीं वर्मे संतांपुढें. ॥ १ ॥
चारी वर्ण झाले एकाचिये अंगीं, ।
पापपुण्यभागीं विभागिलें. ॥ २ ॥
प्रथम पाउलीं पावविला पंथ, ।
आदि, मध्य, अंत, भेद नाहीं. ॥ ३ ॥
आंबे, बोरी, वड, बाभुळा, चंदन, ।
गुणागुण भिन्न, अग्नि एक. ॥ ४ ॥
तुका म्हणे, मन उन्मन जों होय, ॥
तोंवरी हे सोय विधि पाळीं. ॥ ५ ॥

अंत्यजाशीं व्यवहार ठेवणाऱ्या ब्राह्मणांविषयीं बोवांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे:—

खिस्तीचा उदीम ब्राह्मण कलियुगीं, ।
माहारवाडीं मांगीं हिंडतसे. ॥ १ ॥
वेवसाव करितां स्पर्शत मांगासी, ।
ते पैं विटाळासी न मानिती. ॥ २ ॥
मांगिणीशीं नित्य करितसे *लेखा, ।
तोंडावरी थुंका पडतसे. ॥ ३ ॥
'आशा', 'माया', रांडा नांव हें कागदीं, ।
आठवीना कधीं नारायण. ॥ ४ ॥
तुका म्हणे, देह जाला पराधीन, ।
पांडुरंगावीण गति नाहीं. ॥ ५ ॥
अंगीं ब्रह्मक्रिया खिस्तीचा व्यापार, ।
हिंडे घरोघर चांडाळांचे. ॥ १ ॥

* देवघेवीचा हिशोब.

अंत्यजाची खिचडी घेताती मागून, ।
गाळियाप्रदान मायबहिणी. ॥ २ ॥
उत्तम कुळीं जन्म, क्रिया अमंगळ, ।
बुडविलें कुळ उभयतां. ॥ ३ ॥
तुका म्हणे, ऐसी कलियुगाची चाली, ।
स्वार्थीं बुडविलीं आचरणें. ॥ ४ ॥

वरील अभंगांचा भावार्थ लक्षांत घेतला, तर असें दिसून येतें कीं, पेशावर किंवा कानपूर या ठिकाणीं दक्षणी ब्राह्मणानें चामड्याचा कारखाना किंवा जोड्यांचें दुकान काढलें आहे, ही वार्ता ऐकून तुकारामबोवांस आनंद न होतां, खेद झाला असता. परंतु आजकालच्या विचारी सुधारकांस या व्यवहारांत नांव ठेवण्यासारखें कांहींही दिसणार नाहीं. मागें सांगितल्याप्रमाणें बोवादि संतांनीं केवळ भगवद्भक्तीला व भूतदयेलाच भेदभावातीत मानिलें आहे. समुद्राच्या तळाशीं उच्चनीच भाव —खातोत्खात भूमिभाग—कायमच असतात, परंतु जलसंचयामुळें समुद्राचा पृष्ठभाग सारखा सपाट झालेला असतो; तद्वत् समाजांत सामान्य व्यवहारांत जातिभेद कायम असावयाचा, परंतु भगवद्भक्तीचा अपरंपार व निर्मळ लोंढा आला म्हणजे तेवढ्यापुरती विषमता दृष्टीआड होऊन सर्वत्र समता येते, असें साधुसंतांचें म्हणणें आहे. बोवा म्हणतात कीं, भगवद्भक्तीच्या क्षेत्रांत जातकुळीचा प्रश्नच करूं नये.

वाल्ह्या, विश्वामित्र, वसिष्ठ, नारद, ।
यांचें पूर्व शुद्ध काय आहे ? ॥ १ ॥
न व्हावीं तीं झालीं कर्में, नरनारी, ।
अनुतापें हरी स्मरतां, मुक्त. ॥ २ ॥

तुका म्हणे, पूर्व नाठवी श्रीहरी, ।
मूळ जो उच्चारी, नर्क त्यासी. ॥ ३ ॥

अमंगळ वाणी, । नये आइकों ते कानीं. ॥ १ ॥
जो हे दूषी हरीची कथा, । त्यासी क्षयरोग व्यथा. ॥२
याति वर्ण श्रेष्ठ, । परि तो चांडाळ पापिष्ठ. ॥ ३ ॥
तुका म्हणे, पाप । माय नावडे ज्या बाप. ॥ ४ ॥
वैष्णव तो, जया । अवघी देवावरी माया. ॥ १ ॥
नाहीं आणीक प्रमाण, । तन, धन, तृण, जन. ॥ २ ॥
पडतां जड भारीं, । नेमा न टळे निर्धारीं. ॥ ३ ॥
तुका ह्मणे, याती । हो का तयाची भलती. ॥ ४ ॥

ब्राह्मण तो, याती अंत्यज असतां, ।
मानावा तत्वतां निश्चयेंसीं. ॥ १ ॥
'रामकृष्ण' नामें उच्चारी सरळें, ।
आठवी सांवळें रूप मनीं. ॥ २ ॥
शांति, क्षमा, दया, अलंकार अंगीं, ।
अभंग प्रसंगीं धैर्यवंत. ॥ ३ ॥
तुका ह्मणे, गेल्या षड्ऊर्मी अंगें, ।
सांडुनियां मगे ब्रह्मची तो. ॥ ४ ॥

निरानिराळीं बीजें असलीं, तरी त्यांस अग्नीचा संस्कार केला, म्हणजे तीं सर्व जशीं एकच भस्माचें किंवा कोळशाचें रूप पावतात, त्याप्रमाणें निरनिराळ्या जाती व वर्ण भगवद्भक्तीच्या संस्कारानें एकभावाला येतात, असा तुकारामादि संतांचा सिद्धान्त आहे.

बोवांना शाब्दिक पांडित्याचा मोठा तिटकारा होता. ते म्हणतात:-

नाइकावे कानीं तयाचे ते बोल, ।
भक्तीवीण फोल ज्ञान सांगे. ॥ १ ॥
वाखाणी अद्वैत भक्तिभावेंवीण, ।
दुःख पावे सीण श्रोता, वक्ता. ॥ २ ॥
'अहं ब्रह्म' ह्मणुनी पाळितसे पिंडा, ।
न बोलावें भांडा तयासवें. ॥ ३ ॥
वेदबाह्य लंड बोले जो पाषांड, ।
त्याचें काळें तोंड संतांमध्यें. ॥ ४ ॥
तुका ह्मणे, खंडी देवभक्तपण, ।
वरिष्ठ त्याहुनी श्वपच तो. ॥ ५ ॥

मुसलमानी अंमलानें निस्तेज झालेल्या हिंदुसमाजांत कशी बजबजपुरी माजली होती, त्याचें वर्णन पुढील अभंगांत आहे:—

हातीं होन दावी बेना । करिती लेंकीच्या धारणा. ॥१॥
ऐसे धर्म झाले कळीं, । पुण्य रंक, पाप बळी. ॥ २ ॥
सांडिले आचार, । द्विज चाढ झाले चोर. ॥ ३ ॥
टिळे लाविती पातडी, । लेती विजारा कातडीं. ॥ ४ ॥
बैसोनियां तख्ता, । अन्नेंवीण पीडिती लोकां. ॥ ५ ॥
मुदबख लिहिणें, । तेलतुपावरी जिणें. ॥ ६ ॥
नीचांचे चाकर, । चुकलिया खाती मार. ॥ ७ ॥
राजा प्रजा पीडी, । क्षेत्री दुश्चितासी तोडी. ॥ ८ ॥
वैश्यशूद्रादिक । हे तों सहज नीच लोक. ॥ ९ ॥
अवघे बाह्य रंग, । आंत हिरवें, वरी सोंग. ॥ १० ॥
तुका ह्मणे, देवा! । काय निद्रा केली? धांवा. ॥ ११ ॥

कन्याविक्रयाचा बोवांनीं फारच कठोर शब्दांनीं निषेध केला आहे:—

**साळंकृत कन्यादान । पृथ्वीदानाच्या समान. ॥ १ ॥**
**परी तें न कळे या मूढा, । येईल कळों भोग पुढां. ॥२॥**
**आचरतां कर्म, । भरे पोट, राहे धर्म. ॥ ३ ॥**
**सत्या देव साहे, । ऐसें करूनियां, पाहें. ॥ ४ ॥**
**अन्न, मान, धन, । हे तों प्रारब्धाआधीन. ॥ ५ ॥**
**तुका ह्मणे, सोस । दुःख आतां, पुढें नास. ॥ ६ ॥**

तुकारामबोवा पुढें म्हणतात कीं, "ज्यानें कन्या विकली, त्यानें सर्व पंचमहापातकेंच केलीं. त्यानें सोन्याच्या अभिलाषानें नरमांसच खाल्लें. त्याच्या पापाचा उच्चार करतांना, माझी बोबडीच वळते. याच्यापेक्षां पोटाची खळगी भरण्यासाठीं कोरान्न मागत घरोघर फिरलेलें काय वाईट? पोटचा गोळा पैशासाठीं विकणाऱ्याचा पक्ष कोणींही घेऊं नये. त्याला राजानें दंड केला नाहीं, तरी यम करीलच करील. त्या पोरविक्याचें अन्न केवळ मद्यपानासारखेंच आहे."

असो; सामान्य नीतिपर व सुभाषितमय तुकारामी अभंग इतके उत्तम व असंख्य आहेत, कीं, ते उतरूं म्हटल्यास निबंध अपरंपार वाढेल. परंतु इतकें सांगणें भाग आहे कीं, या सर्व अभंगात ईश्वरी प्रेम, सरळ बुद्धि, निःस्पृहपणा, स्पष्टवक्तेपणा, समाज सुधारण्याची खरी कळकळ, सात्विकवृत्ति, विशाल अनुभव, निर्मत्सरता, वैराग्य व दंभाचा द्वेष, हीं ढळढळीत बिंबलेलीं आहेत. वाणी सर्वत्र साधी पण वेंचक, मार्मिक पण अकृत्रिम, भाबडी पण रसाळ, आणि भेदक पण निर्मळ, अशा प्रकारची आहे. ग्रंथकर्ता जो जो उपदेश करीत आहे, जें जें विधान करीत आहे, तो तो उपदेश व तें तें विधान करण्याचा पूर्ण अधिकार त्यास स्वानुभवानेंच

प्राप्त झालेला आहे, असें पावलोपावलीं वाचकांच्या मनांत ठसतें. सर्व अभंग फुटकळ असल्यामुळें विषयवैचित्र्य व कल्पनावैचित्र्य ओतप्रोत भरलेलें दिसतें. अभंग प्रासंगिक असल्यामुळें प्रसंगानुसार विषयप्रतिपादन करण्यांत आलेलें आहे, त्यामुळें अनेक ठिकाणीं बाह्यतः विरुद्ध दिसणारीं विधानें बोवांच्या अभंगांत दृष्टीस पडतात. एके ठिकाणीं सहनशीलतेची थोरवी गाइली आहे, तर दुसरे ठिकाणीं दुष्ट जनांना शिव्याशाप देण्यापर्यंत पाळी आली आहे; एके ठिकाणीं 'आलिया भोगासी असावें सादर' असा उपदेश केला आहे, तर दुसरे ठिकाणीं लोहगांवास परचक्राचा वेढा पडल्यामुळें बोवा आत्महत्येलाही तयार झाले आहेत; एके ठिकाणीं पांडुरंगाच्या मूर्तीचें वैभव वर्णिलें आहे, तर दुसरे ठिकाणीं 'केली कांशाची जगदंबा, । परी कांसें नव्हे अंबा.।। पूजा अंबेची अंबेला घेणें,। कांसें राहे कांसेंपणें. ।।' असे उद्गार काढले आहेत; एके ठिकाणीं 'दया, क्षमा, शांति' यांचे गोडवे गाइले आहेत, तर दुसरे ठिकाणीं शाक्त, अभक्त, पाखंडी, पैशासाठीं कथा करणारे हरिदास, इत्यादिकांवर निर्दय कठोर प्रहार केले आहेत; एके ठिकाणीं संसार निःसार म्हणून निंदिला आहे, तर दुसरे ठिकाणीं संसारांत सत्कृत्यानें प्रपंच व नामसंकीर्तनानें परमार्थ साधतां येतो म्हणून त्याची स्तुति केली आहे; एके ठिकाणीं ईश्वराच्या सर्वव्यापी विराट्स्वरूपाचें ज्ञान प्रकट केलें आहे, तर दुसरे ठिकाणीं पंढरीची वारी अंतरल्यामुळें पंढरीनाथाचें दर्शन होत नाहीं म्हणून विलाप केलेला आहे; अशा प्रकारें बाह्यतः विरोधी गोष्टी पाहिल्या-

बरोबर वाचक साधारणपणें बिचकल्यावांचून राहणार नाहींत. बोवांचे अभंग स्फुट व प्रासंगिक असल्यामुळें, ज्या वेळीं जसा बोलण्याचा ओघ आला असेल, जसा प्रसंग असेल, व जशा मनोवृत्ति क्षुब्ध झाल्या असतील, त्या मानानें अभंग रचला गेला. पुन्हां जेव्हां ह्या प्रकारचा विषय निघाला, त्या वेळीं भाषणाचा ओघ, प्रसंग व मन:स्थिति निराळी असल्यास, निराळ्या तऱ्हेचा अभंग अस्तित्वांत येणेंच शक्य आहे. बरींच नीतितत्त्वें व नीतिवचनें अंशत: खरीं असतात. 'सर्वांशीं नम्रपणें वागावें,' 'उणें कधींही बोलूं नये,' 'क्षमा व शांति नेहमीं चित्तांत ठेवावी,' 'अपकाराची फेड उपकारानें करावी,' इत्यादि नीतितत्त्वें एकांगी आहेत, म्हणजे सामान्यत: आपण वर्तन कसें ठेवावें याचीं तीं निदर्शक आहेत; पण तीं सर्व प्रसंगविशेषीं सारखींच लागू पडतील, असा निश्चय करितां येत नाहीं. या कारणास्तव तुकारामबोवांच्या स्फुट अभंगांत वर सांगितल्याप्रमाणें अंशत: परस्परविसंवादी दिसणारीं वचनें येतात. 'सारासारविचार करून कालदेशप्रसंगास साजेल असें सरळ व निर्मळ वर्तन ठेवावें,' यांत बोवांच्या नीत्युपदेशाचें संपूर्ण सार येत आहे.

बोवांच्या अभंगांत भक्ति, ईश्वरी प्रेम, करुणा व शांति, हेच रस सामान्यत: उत्कटत्वाला आलेले आढळतात. क्वचित् वीररसाचीही चमक आढळते, परंतु प्राय: त्याचें पर्यवसान करुणा किंवा शांति या रसांतच होतें. विनोदाचीं उदाहरणेंही मधून मधून दृष्टोत्पत्तीस येतात:—

(अ) **कानडीनें केला मऱ्हाटा भ्रतार, ।**
**एकाचें उत्तर एका न ये. ॥ १ ॥**

तैसें मज नको करूं, कमळापती! ।
देई या संगति सज्जनाची. ॥ २ ॥
तिनें पाचारिलें 'इल बा' ह्मणोनी, ।
येरू पळे आण जाली आतां. ॥ ३ ॥
तुका ह्मणे, येर येरा जें विच्छिन्न, ।
तेणें वाढे सीण सुखापोटीं. ॥ ४ ॥

(आ)देखोनी पुराणिकाची दाढी, । रडे फुंदे, नाक ओढी.१
प्रेम खरें दिसे जना, । भिन्न अंतरीं भावना. ॥ २ ॥
आवरितां नावरे, । खुर आठवी नेवरे. ॥ ३ ॥
बोलों नये मुखावाटीं, । ह्मणे होता 'ब्यां'चा तोटा. ॥४॥
दोन्ही सिंगें, चारी पाय, । खुणा दावी, ह्मणे होय. ॥ ५ ॥
मना आणितां बोकडा । मेला, त्याची चरफड. ॥ ६ ॥
होता भाव पोटीं, । मुखा आलासे शेवटीं. ॥ ७ ॥
तुका ह्मणे, कुडें, । कळों येतें तें रोकडें. ॥ ८ ॥

(इ) "जातों वाराणसी, । निरवीं गाई, घोडे, ह्मैसी.॥१॥
गेलों, येतों नाहीं, ऐसा । सत्य मानावा भरवसा.॥२॥
नका काढूं माझीं पेंवें, । तुह्मी वरळा भूस खावें. ॥३॥
भिकारियाचे पाठी । तुह्मी घेऊन लागा काठी. ॥४॥
सांगाल जेवाया ब्राह्मण, । तरी माझी कापाल मान. ५
बोकलिया बोका । म्यां खर्चिला नाहीं रुका. ॥ ६ ॥
तुह्मीं खावें ताकपाणी, । जतन करा तूपलोणी.॥ ७॥
नाहीं माझे मनीं, । पोरें रांडा नागवणी." ॥ ८ ॥
तुका ह्मणे, नष्ट । होतें तैसें बोले स्पष्ट. ॥ ९ ॥

(ई) पांडुरंगें पहा खादलीसे रडी, ।
परी नामसेंडी धरिली आह्मीं. ॥ १ ॥

आतां संतांनीं करावी पंचाईत, ।
कोण हा फजीतखोर येथें? ॥ २ ॥
कोणाचा अन्याय येथें आहे? स्वामी, ।
गर्जतसों आह्मी पातकीही. ॥ ३ ॥
याचें पावनपण सोडवा जी! तुह्मी, ।
पतितपावन आह्मी आहों खरे. ॥ ४ ॥
आह्मी तंव आहों अन्यायी सर्वथा, ।
याची पावन कथा कैसी आहे? ॥ ५ ॥
तुका ह्मणे, आह्मी मेलों तरी, ज़ाणा, ।
परी तुमच्या चरणा न सोडावें. ॥ ६ ॥

(उ) भक्ति ऋण घेतलें माझें, । चरण गहाण आहेत तूझे.१
प्रेम व्याज देई, हरी! । माझा हिशेब लौकर करीं.॥२॥
माझें मी न सोडीन धन, । नित्य करितों कीर्तन. ॥ ३ ॥
तुझें नाम आहे खत, । सुखें करीं पंचायत. ॥ ४ ॥
तुका ह्मणे, गरुडध्वजा! । याची साक्ष श्रीगुरुराजा.॥५॥

असो, निबंधविस्तार फार होत चालल्यामुळें येथेंच आटोपणें भाग आहे. परंतु असें करण्यापूर्वीं तुकारामी अभंगांविषयीं मोरोपंत कवींचा अभिप्राय दाखल करितों. बोवा हे शूद्र असतांही, कोणाही ब्राह्मण कीर्तनकाराचेंही कीर्तन बोवांच्या अभंगांवांचून सांगपूर्ण होत नाहीं, यावरून त्या अभंगांची थोरवी व चटकदारपणा स्वयंसिद्धच होत आहे. कांहीं हट्टवादी पंडितंमन्य जात्यभिमान्यांनीं 'शूद्रकवन' म्हणून बोवांच्या कवित्वाला बहिष्कार घालण्याचा अट्टाहास केला, परंतु कावळ्याच्या ओरडण्यानें गुरें मरून गांव ओस पडेल, असें फारच होतें आहे! त्या पंडितंमन्यांची वाहुटळ केंव्हांच बंद झाली, व

बोवांची कीर्ति मात्र दर पिढीला अधिकाधिक उज्वळ व विस्तृत होत चालली आहे. असो; पंत तुकारामबोवांच्या अभंगाविषयीं लिहितातः—

साधुसभाप्राणप्रिय, ज्याचे निर्दोष युक्तिमद्‌भंग, ।
भगवज्जनेतराचा करिती ज्यांतील युक्ति मद्-भंग. ॥
ज्याचे अभंग लागति खलहृदया जेविं बाण रामाचे, ।
ज्या परवाद न मोहिति, शर जैसे ईश्वरास कामाचे. ॥
ज्याच्या सद्‌भंगांतें सेविति जन, जेविं बाल आम्यांतें. ।
घनसा, ह्मणे, 'भरावें सुरसें' जें मुख करील आ, स्यां तें. ॥
ज्याच्या होय अभंगावांचुनि, होऊन, हरिकथा नाहीं; ।
श्रोत्यांस अभंगांहीं ती दे, जशि माय हरिक थानांहीं. ॥
शोभे कथा अभंगा पावुनियां, जेविं दीपका शाला, ।
सद्‌भंग कथेंत नको, तरि मग शालेंत दीप काशाला ? ॥
भक्तिरसिक 'शूद्रकवन' ह्मणवूनि कशास नाक वाहेल? ।
भगवत्पदप्रसादा बुध जेविं, तशास नाक वाहेल. ॥
श्री नामदेव, तुकया, तद्‌भंग प्रभुसि गोड घांस तसे; ।
गहिंवरतसे परिसतां, नाचतसे, पांडुरंग हांसतसे. ॥

आपल्या स्मरणींत पंत म्हणतातः—

बापा ! तुकोबा ! अभंगीं तुझ्या भक्ति-
वैराग्य; अन्यत्र ऐसी नसे शक्ति. ।
केली समस्तीं जनीं त्वां दया फार,
दावा मलाही भवांभोधिचा पार. ॥

आम्हीही हीच पंतांची स्मरणी गुणगुणत लेखणी खालीं ठेवितों.

REFBK-0001517
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५५८